नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १६३ * * नागपूर * शनिवार, दिनांक १३ सप्टेंबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## स्पाइसजेट विमानाचा टायर धावपट्टीवर पडला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
शुक्रवारी गुजरातमधील कांडला येथून मुंबईला येणाऱ्या स्पाइसजेटच्या विमानात मोठी दुर्घटना टळली. कांडला विमानतळावर टेकऑफ करताना बॉम्बार्डियर क्यू ४०० विमानाचा टायर धावपट्टीवर पडला. तरीही, वैमानिकाने उपस्थिती दाखवत उड्डाण सुरू ठेवले.

विमान मुंबई विमानतळावर उतरण्यापूर्वी फूल इमर्जन्सी जाहीर करण्यात आली. तथापि, विमान सुरक्षितपणे उतरले आणि स्वतःहून टर्मिनलवर पोहोचले. सर्व ७५ प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवण्यात आले. विमान कंपनीने या घटनेची पुष्टी केली आहे. घटनेची चौकशी सुरू करण्यात आली आहे आणि तांत्रिक कारणे शोधली जात आहेत.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## १० + २ = १२

गरियाबंद येथील चकमकीत दहा नक्षलवादी मारले गेले. आज छत्तीसगडमधील आणखी दोघांना ठार करून ते ज्या नरकात राहत होते त्या नरकातून दुसऱ्या नरकात पाठवण्यात आले. अशा प्रकारे दहा + दोन = बारा नक्षलवाद्यांचे पोलिसांनी आणि नक्षलविरोधी टीमने अगदी दणदणीत बारा वाजवलेले आहेत. आपल्या देशात जवळजवळ ५० वर्षांपूर्वी नक्षलवादी आंदोलनाची सुरुवात झालेली होती. सिद्धार्थ शंकर राय हे तेव्हा पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री होते, त्यानंतर देशात क्रांती करायची आहे अशी भाषा बोलून हे सगळे तथाकथित क्रांतीकर्ते जन आंदोलनाच्या नावावर पुढच्या काळात मोठ्या प्रमाणात निरपराधांचे जन-निर्दालन करायला लागले. अमुक एखादा सरपंच पोलिसांचा खबरी आहे त्याला मारून टाका, असे आदेश निघू लागले. अगदी अठरा वर्षाच्या कोवळ्या तरुणाला त्यांनी स्वातंत्र्य दिना दिवशी राष्ट्रीय ध्वज म्हणजेच तिरंगा फडकवला म्हणून त्याला मारून टाकण्याचा निर्णय झाला आणि त्याला स्वर्गयात्रेस पाठवण्यात आले. हे नक्षलवादी आपल्या महाराष्ट्रात गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया या भागातील जंगलात कार्यरत होते. ते भारतातील अनेक घनदाट अरण्यात आपल्या कारवाया करवीत असत. या नक्षलवाद्यांचा दहशतवाद इतका फोफावला होता की, बड्या बड्या कंपन्यांकडून त्यांना रसद पुरवली जात होती. खरे तर जनआंदोलनाच्या आणि चळवळीच्या नावाखाली सरळ सरळ खंडणी मागितली जात होती. ते आता निष्पन्न झाल्यामुळे चळवळीतील अग्रणी असलेल्या बऱ्याच मंडळींनी सरकारला शरण घेण्यात धन्यता मानलेली आहे. हे नक्षली आंदोलन निरपराधांना ठार करते, वाटेल त्याला वाटेल तो दंड देते, मग त्याचा मुकाबला करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पोलिसांना अधिकार देण्यात आले होते. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी २०२५ पर्यंत नक्षलवादी चळवळीला संपूर्णपणे संपवायचेच आहे आणि त्याची तयारी जोरात सुरू आहे असे अलीकडेच सांगितले होते. तेलंगणा, महाराष्ट्र आणि इतर काही भागात या चळवळीला क्रांतिकारी म्हणण्यात येते. परंतु या चळवळीचे म्होरके अत्यंत माणूसद्रोही आहेत आणि माणुसकीद्वेषी आहेत, असे बऱ्याच आदिवासी आणि नक्षलग्रस्त जनतेचे मत निर्माण झालेले आहे. एखाद्या माणसाला मारणे म्हणजे त्यांना टूथपेस्टने दात घासण्यासारखे सोपे वाटते. त्यामुळे त्या नक्षलवाद्यांनी केवळ छत्तीसगडच नाही, तर जंगलातील इतर मोठ्या भूभागावरही आपला तंबू गाडत आणला होता. आधीचा तंबू गृहमंत्री शहा यांनी नेस्तनाबूत करून टाकला आहे. तरी अजूनही हे नक्षलवादी शंभर टक्के सरकारमित्र बनलेले नाहीत. नक्षलग्रस्त अशा या दुर्गम भागातील गडचिरोली जिल्ह्यात प्रकाश आमटे आणि अभय बंग या दोन डॉक्टरांनी त्या भागातील गरीब आदिवासी आणि निरक्षर रहिवाशांच्यासाठी उघडलेले दवाखाने अलीकडच्या काळात नक्षल्यांना सुद्धा प्रिय वाटत आहेत. यावर्षीच्या शेवटपर्यंत नक्षलींना एकतर मुख्य प्रवाहात आणायचे आहे आणि त्यासाठी जे तयार नसतील, त्यांना रौरव नरकात पाठवायचे आहे. अशी देशाच्या गृहमंत्र्यांची प्रतिज्ञा आहे. गृहमंत्री अमित शहा यांच्या कठोर कारवाईमुळे नक्षलग्रस्त भागात नक्षलवाद्यांच्या मनात मोठी दहशत निर्माण झालेली आहे. हे नक्षलवादी आपल्या देशाच्या विकासाच्या आड येऊ नयेत म्हणून सरकारने मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू करून जवळपास दोन वर्षे झाली आहेत. जर महाराष्ट्राने आता मनात आणले तर ही चळवळ आपोआपच थंड बस्त्यात जाऊ शकते. नक्षलींच्या मागण्या योग्य असल्या तरी आता ही मंडळी वाट चुकलेली वाटत नाहीत. नक्षल्यांना वाट चुकलेली मंडळी म्हणणाऱ्यांना ही गोष्ट आता चांगलीच लक्षात आलेली आहे. त्यामुळे आता यापुढे कारवायांवर कारवाया होणारच आहेत. कोणे एकेकाळी हा अमुक एक भाग काही वर्षांपूर्वी नक्षलग्रस्त होता असे म्हणावे लागेल. इतक्या जोरात यापुढे कारवाया होऊ शकतात. कारण निर्धार झालेला आहे, त्यामुळे गृहमंत्र्यांच्या निर्धाराने ही बाब ही सिद्ध होईलच, यात काही शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# आत्महत्येचा मार्ग नकोच!

### आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रवीशंकर यांचे आवाहन : कृषी प्रदर्शनी व मेळावा उत्साहात





**मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांचा व्हिडिओ संदेश**
कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ध्वनिमुद्रित संदेश दाखविण्यात आल्या. या संदेशात मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांनी कृषी प्रदर्शनी व मेळाव्यास शुभेच्छा देत या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल कौतुक केले.

■ जगदिश सांगोळे
रामटेक, दि. १२ :
भारत हा आध्यात्मिक देश आहे. दैनंदिन मुलभूत गरजांबरोबरच आज मनःशांती आवश्यक आहे. परिस्थिती कायम सारखी नसते. वाईट दिवसही सरून जातात. त्यामुळे शेतकऱ्यांनी धीर ठेवून आत्महत्येसारखा मार्ग अवलंबू नये. नैसर्गिक शेतीचा जास्तीत जास्त अवलंब करावा, असे आवाहन आध्यात्मिक गुरू व आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रवीशंकर यांनी आज येथे केले.

रामटेक येथील नेहरू मैदान येथे कृषी प्रदर्शनी व मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आमदार आशीष देशमुख, कृषी व पदुम विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सुरज मांढरे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासह स्थानिक भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आज जग मानसिक तणावाखाली आहे. ४ पैकी एक व्यक्ती मानसिक तणावाखाली आहे. अमेरिकेत ४७ टक्के नागरिक एकटेपणाच्या आजाराखाली आहेत. यासाठी गाण, ध्यान आणि ज्ञान जीवनात अवलंबण्याची गरज आहे., यातून जीवनात उत्साह येईल. गोसंरक्षण आणि कृषी ही देशाची संपत्ती आहे. यास सांभाळल्यास देश पुढे जाईल, असेही श्री श्री रवीशंकर म्हणाले.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सर्व शेतकरी जेव्हा नैसर्गिक शेती करतील तेव्हा हा देश विकसित भारताकडे जाईल.

▶▶ पान ८ वर

### जिल्हा परिषद अध्यक्षपदांचे

# आरक्षण जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
राज्यातील ३४ जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदांसाठी आरक्षणाची यादी आज जाहीर करण्यात आली. विविध प्रवर्गांनुसार ठरविण्यात आलेल्या या आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तासमीकरणावर प्रभाव पडणार आहे.

जाहीर यादीनुसार, ठाणे, पुणे, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, यवतमाळ यांसह नागपूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदांसाठी सर्वसाधारण प्रवर्ग खुला ठेवण्यात आला आहे. यामध्ये ठाणे, सांगली, कोल्हापूर, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली यांसारख्या जिल्ह्यांत सर्वसाधारण (महिला) आरक्षण लागू करण्यात आले आहे.

अनुसूचित जातीसाठी बीड (महिला), हिंगोली, परभणी, वर्धा आणि चंद्रपूर (महिला) ही पदे आरक्षित करण्यात आली आहेत. तर अनुसूचित जमातीसाठी पालघर, नंदुरबार, अहिल्यानगर (महिला), अकोला (महिला) आणि वाशिम (महिला) या जिल्ह्यांतील अध्यक्षपदे राखीव ठेवली गेली आहेत.

नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) साठी रत्नागिरी (महिला), धुळे (महिला), सातारा (महिला), सोलापूर, जालना (महिला), नांदेड, धाराशिव (महिला), नागपूर आणि भंडारा या जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे.

या आरक्षण घोषणेमुळे आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांतील राजकीय गणिते ठरविण्यात महत्त्वाचा बदल होणार आहे. पक्षीय स्तरावर उमेदवार ठरविताना या आरक्षणाचा विचार करावा लागणार असून, महिला आरक्षणामुळे अनेक जिल्ह्यांत नवीन नेतृत्वाला संधी मिळणार आहे.

(जिल्हानिहाय आरक्षणाची यादी पान ८ वर)

### भारतात नेपाळसारखे अराजक घडवण्याचा

# काही लोकांच्या मनात डाव

**एकनाथ शिंदे यांचा आरोप**



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :
नेपाळमधील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. काही लोकांच्या मनात भारतात नेपाळसारखे अराजक घडवण्याचा डाव आहे. त्यामुळे अशा लोकांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी येथे पत्रकारांशी संवाद साधताना व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांच्या शपथविधीच्या निमित्ताने दिल्लीच्या दौऱ्यावर होते. तिथे शपथविधीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी वरील विधान केले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी भारतात नेपाळसारखी परिस्थिती उद्भवण्याचा इशारा दिला होता. पत्रकारांनी याविषयी प्रश्न करताच शिंदे यांनी चटकन भारतात असे काहीही शक्य नसल्याचे स्पष्ट केले.

ते म्हणाले, अशा प्रकारचे वक्तव्य करणे फार दुर्दैवी आहे. प्रत्येकाला देशाप्रती स्वाभिमान, अभिमान असला पाहिजे. देशभक्त व देशावर प्रेम करणारे लोक अशा प्रकारचे विधान करू शकत नाहीत. काही लोकांच्या मनात नेपाळसारखे अराजक किंवा तशा प्रकारची परिस्थिती निर्माण करण्याचा डाव असू शकतो. त्यामुळे तसे कारस्थान कुणी रचत नाही ना? असा प्रश्न उभा राहत आहे. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाचे संविधान लिहिले. त्यामुळे भारतात अशा प्रकारची दुर्दैवी घटना कधीही होणे शक्य नसल्याचे शिंदे यांनी सांगितले.

### राजकीय पक्षांमध्ये वाढता भ्रष्टाचार, मनी लाँडरिंगबाबत

# सर्वोच्च न्यायालयात याचिका

### निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारला न्यायालयाने बजावली नोटीस



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :
राजकीय पक्षांमध्ये वाढत्या भ्रष्टाचार आणि मनी लाँडरिंगशी संबंधित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाला नोटीस पाठवली. न्यायालयाने राजकीय पक्षांच्या कामकाजावर कठोर नियम बनवण्याबाबत उत्तर मागितले आहे.

पक्षांमध्ये वाढत्या भ्रष्टाचार, जातीयवाद, सांप्रदायिकता, गुन्हेगारीकरण आणि मनी लाँड्रिंगवर कारवाई करावी आणि नियम बनवावेत, अशी मागणी करणारी याचिका वकील अश्विनी उपाध्याय यांनी दाखल केली होती.

याचिकेत असा दावा करण्यात आला आहे की, अलिकडेच एका राजकीय पक्षाला २०% कमिशन घेऊन काळा पैसा पांढरा करताना पकडण्यात आले आहे. हे पक्ष गुन्हेगार आणि तस्करांकडून पैसे घेतात आणि त्यांना विविध पदांवर नियुक्त करतात. अनेक फुटीरतावादी पक्षही स्थापन करत आहेत आणि देणग्या घेत आहेत.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉय मल्ल्या बागची यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाला उत्तर देण्यासाठी ४ आठवड्यांचा वेळ दिला आहे. २७ ऑगस्ट रोजी एडीआरचा अहवाल प्रसिद्ध झाला. अहवालानुसार, देशभरातील ४५% आमदार आणि ४६% खासदारांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत. यापैकी २९% जणांवर गंभीर गुन्हे दाखल आहेत.

देशात नाममात्र मते मिळवणाऱ्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उत्पन्न २०२२-२३ मध्ये २२३% ने वाढले आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सच्या अहवालात ही माहिती समोर आली आहे.

▶▶ पान ८ वर

# २१ ते २४ नोव्हेंबर दरम्यान होणार १६ वे ॲग्रोव्हिजन

**भारतातील सर्वात मोठे कृषिप्रदर्शन**




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
परिवर्तनशील शेती आणि शेतकऱ्यांचे बळकटीकरण या संकल्पनेवर आधारित मध्य भारतातील सर्वात मोठे आणि बहुप्रतीक्षित कृषी प्रदर्शन अग्रोव्हिजन २०२५ यावर्षी २१ ते २४ नोव्हेंबर २०२५ दरम्यान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ कॅम्पस, अंबाझरी रोड, येथे आयोजित करण्यात येणार आहे.

ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात ॲग्रोव्हिजन फाउंडेशन व एमएम अक्टीव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होणाऱ्या या १६ व्या ॲग्रोव्हिजनमध्ये आधुनिक कृषी तंत्रज्ञान, नवीन कृषि उपकरणे कृषि प्रदर्शनात बघायला मिळतील. या नवीन उपक्रणांची प्रात्यक्षिकेही येथे बघता येतील, शेतीपूरक व्यवसाय, तसेच विविध विषयांवरील कार्यशाळा, विशेष कार्यशाळा आणि परिषदांचे आयोजन ही येथे करण्यात येणार आहे.

यंदाच्या या राष्ट्रीय कृषी प्रदर्शनात ४५० हून अधिक संस्थांचा सहभाग राहणार असून कृषि क्षेत्रातील आघाडीच्या स्थानिक तसेच बहुराष्ट्रीय कंपन्या, शासकीय विभाग, संशोधन संस्था, कृषी विद्यापीठे, बँका व विमा कंपन्या तसेच, स्टार्टअप्स आणि एमएसएमई यांचे स्टॉल्स बघायला मिळणार आहेत.

या राष्ट्रीय कृषी प्रदर्शनात शेतकऱ्यांना नवी उत्पादने व तंत्रज्ञान बघण्याची संधी, सरकारी योजनांची माहिती, कार्यशाळांमध्ये तज्ञांचे मार्गदर्शन यासह बरेच काही असणार आहे.

# मराठा - ओबीसी वाद शिगेला : भुजबळ, जरांगेची टीका सुरूच



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
मराठा आरक्षणाचा जीआर निघाल्यानंतर ओबीसी संघटनांकडून कडाडून विरोध सुरू झाला असून, ओबीसी समाजातील एका तरूणाने आत्महत्या केली. परिणामी, ओबीसी समाज अधिक संतप्त झाला आहे. मराठा आरक्षणाला ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी विरोध दर्शवत पुन्हा एकदा आपली भुमिका स्पष्ट केली.

आम्ही लहान समाजात जन्मलो हे आमचे पाप आहे का? आमच्या लेकराबाळांनी शिक्षण व नोकऱ्या करायच्या नाही का? असे उद्विग्न प्रश्न त्यांनी यासंबंधी उपस्थित केले. आरक्षणाच्या लढ्यात अगोदर आम्ही संपू, त्यानंतर तुम्हाला काय करायचे ते करा. पण आता कुणीही आत्महत्या करू नका, असेही ते यावेळी ओबीसी तरुणांना उद्देशून म्हणाले.

लातूरच्या रेणापूर तालुक्यातील वागदरी येथील भरत महादेव कराड नामक एका ३५ वर्षीय तरुणाने मराठा आरक्षणामुळे ओबीसींचे आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या निषेधार्थ मांजरा नदीपात्रात उडी मारून आत्महत्या केली. मंत्री छगन भुजबळ यांनी यांनी शुक्रवारी आपले सर्वच कार्यक्रम रद्द करत या तरुणाच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.

त्यानंतर आपल्या भावना व्यक्त करताना ते म्हणाले, आताही आम्ही आरक्षणाच्या हक्कासाठी लढत आहोत. आमच्यावर अतिक्रमण करू नका एवढेच आमचे म्हणणे आहे. आम्ही दुसरे काहीच मागत नाही. मागास म्हणजे जे सामाजिकदृष्ट्या मागास नाहीत, तर ते पैशाने व शिक्षणाने मागास आहेत, त्यांना १० टक्के आरक्षण दिले. त्यात सर्वाधिक मराठा समाजाच्या ९० टक्के लोकांना फायदा मिळाला. आम्ही त्याला विरोध केला नाही.

त्यानंतर त्यांनी आम्हाला मराठा म्हणूनच आरक्षण मागितले. आमच्याकडे केवळ १७ टक्के आरक्षण शिल्लक आहे. आता त्यांनी (मनोज जरांगे) मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी केली. मग आम्ही कुठे जायचे? आम्ही काय पाप केले? तुम्हाला वेगळे दिले ते घ्या ना... कितीही घ्या. पण आमचे आहे तेवढे राहूद्या, असेही ते म्हणाले.



**आम्ही ओबीसी येडे आहोत का?**
ज्येष्ठ ओबीसी नेते आणि माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी थेट राज्य सरकारवर तसेच मंत्री छगन भुजबळ यांच्यावर जोरदार टीका केली आहे. मराठा समाजापेक्षा बंजारा समाजाची ताकद अधिक असल्याचा दावा करत त्यांनी मराठवाड्यात बंजारा समाजाविना कोणी निवडणूक जिंकून दाखवावी, असा थेट इशाराच दिला. राठोड म्हणाले की, भुजबळ साहेब लोकशाहीबद्दल बोलतात, पण वास्तवात जरांगेशाही राज्य करते आहे. भुजबळ साहेब तुम्ही पंचवीस वर्ष ओबीसीचे नेतृत्व करत असल्याचे म्हणता, पण प्रत्यक्षात तुम्ही एका समाजापुरतेच मर्यादित आहात. फक्त एका समाजाचे नेतृत्व करणं म्हणजे उघडपणे पक्षपात आहे, असा आरोप त्यांनी भुजबळांवर केला.



**मी अशिक्षित असूनही त्यांना रडकुंडीला आणले....**
मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी शुक्रवारी मंत्री छगन भुजबळ आपल्या डावपेचांमुळे पूर्णतः वेडेपिसे झाल्याचा दावा केला. मी अशिक्षित आहे. पण त्यानंतरही छगन भुजबळांना मी सरकारकडून काढून घेतलेल्या जीआरमध्ये कोणतीही सुधारणा करता येत नाही. यामुळे ते अक्षरशः वेडेपिसे झालेत झालेत, मी अशिक्षित असूनही तुम्हाला रडकुंडीला आणले. आता आमचे सुशिक्षित लोक बोलायला लागले, तर तुझे काय होईल याचा विचार कर. मी अशिक्षित आहे की सुशिक्षित हे भुजबळांना चांगलेच माहिती आहे. मी काढलेल्या जीआरध्ये त्यांना सुधारणाही करता येत नाही. त्यामुळे पूर्णपणे पागल झालेत. जरांगे यांनी यावेळी मराठा आमदार व खासदारांना मराठा आरक्षणाच्या मुद्यावर आपली भूमिका स्पष्ट करण्याचेही आवाहन केले. मराठ्यांच्या सर्व नेत्यांना एक प्रश्न विचारण्यात आला आहे. त्यामुळे सर्वांनी सांगितले पाहिजे की, आम्हाला १० टक्के एसईबीसी आरक्षण पाहिजे, पण ते ५० टक्क्यांच्या आत ओबीसी आरक्षणात पाहिजे, असे ते म्हणाले.

## ओबीसी आरक्षणाला धक्का नाही



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
ओबीसी आरक्षणाच्या चिंतेतून लातूर जिल्ह्यातील वांगदरी (ता. रेणापूर) येथील भरत महादेवराव कराड यांनी केलेल्या आत्महत्येबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ही घटना 'अत्यंत दुःखद आणि मन हेलावणारी' असल्याचे सांगत, त्यांनी मराठा समाजाला आरक्षणाचा हक्क देतांना कोणत्याही परिस्थितीत ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, याची आम्ही पूर्ण खबरदारी घेत आहोत. त्यामुळे या संवेदनशील काळात कुणीही टोकाची भूमिका घेऊ नये, अशी विनंती केली आहे.

मराठा आंदोलन मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासंदभार्तील जीआर देखील काढण्यात आला आहे. यामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळणे सोपे झाले असून, त्यांना ओबीसीतून आरक्षणाचा लाभ घेता येणार आहे. मात्र, हैदराबाद गॅझेटच्या जीआरवरून ओबीसी समाजात तीव्र नाराजी पसरली आहे.

आपले सरकार सर्व समाज घटकांच्या न्याय व हक्कांसाठी कटिबद्ध आहे. मराठा समाजाला आरक्षणाचा हक्क देतांना कोणत्याही परिस्थितीत ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, याची आम्ही पूर्ण खबरदारी घेत आहोत. त्यामुळे या संवेदनशील काळात कुणीही टोकाची भूमिका घेऊ नये, कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही, हीच आमची भूमिका असल्याचेही ते म्हणालेत.

# सुशीला कार्की नेपाळच्या अंतरिम पंतप्रधान



■ वृत्तसंस्था, काठमांडू, दि. १२ :
सुशीला कार्की यांनी शुक्रवारी रात्री ८:४५ वाजता नेपाळच्या अंतरिम पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. त्यांच्या नावावर एकमत झाले आहे. नेपाळच्या राष्ट्रपतींनी संसद बरखास्त करण्यास सहमती दर्शविली आहे.

काठमांडूचे महापौर बालेन शाह यांच्या समर्थकांनी भास्कर रिपोर्टरला हे सांगितले आहे.

सुशीला कार्की नेपाळच्या पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश आहेत.

सुशीला कार्की यांच्या शपथविधीनंतर, नेपाळ मंत्रिमंडळाची आज रात्री पहिली बैठक झाली. या काळात, महत्त्वाच्या कामांशी संबंधित धोरणांशी संबंधित काही मोठे निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

दुसरीकडे, नेपाळमध्ये सोशल मीडिया बंदी आणि भ्रष्टाचाराविरुद्ध सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान, भारतीय पत्रकारांवर हल्ला आणि गैरवर्तनाच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. आजही दोन भारतीय पत्रकारांसोबत गैरवर्तन करण्यात आले. काठमांडूमधील परिस्थिती सामान्य होत आहे. सैन्य गस्त घालत आहे, दुकाने उघडी आहेत आणि कचरा साफ केला जात आहे. भारताने विशेष विमानांनी नागरिकांना बाहेर काढण्यास सुरुवात केली.

## ओसी नसलेल्या इमारतीतल्या रहिवाश्यांच्या समस्यांचे लवकरच निराकरण

### मंगलप्रभात लोढा यांच्या पाठपुराव्याला यश



**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत गेली अनेक वर्ष भोगवटा प्रमाणपत्र न मिळालेल्या इमारतीत राहत असलेल्या नागरिकांना होणाऱ्या त्रासाची दखल घेऊन यासंदर्भात लवकरच धोरण निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. येत्या २ ऑक्टोबर पर्यंत नगर विकास विभागाने यासंदर्भात धोरण निश्चित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मुंबई उपनगरचे सह पालकमंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी १ फेब्रुवारी २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून भोगवटा प्रमाणपत्र न मिळालेल्या इमारतीत वास्तव्यास असलेल्या लाखो रहिवाश्यांची व्यथा मांडली होती. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. बैठकीला मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार, आमदार अमित साटम, माजी खासदार गोपाळ शेट्टी उपस्थित होते. मुंबई महापालिका क्षेत्रात विकास नियंत्रण नियमावलीनुसार तसेच म्हाडा आणि एसआरएच्या नियमावलीनुसार बांधकाम झालेल्या परंतु काही इमारतींना अद्याप अंतिम भोगवटा प्रमाणपत्र अर्थात ओसी मिळालेले नाही.

## मुंबईतील २५ हजारांहून अधिक इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत धोरण तयार करणार



**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावली नुसार, म्हाडा, एसआरए आणि इतर प्राधिकरणांच्या नियमानुसार बांधकाम झालेले परंतु विविध कारणांमुळे भोगवटा प्रमाणपत्र न मिळालेल्या २५ हजारांहून अधिक इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत धोरण तयार करण्यात येणार असल्याचे सांस्कृतिक कार्य तथा पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले. मंत्रालयामध्ये यासंदर्भात आयोजित बैठकीस माजी खासदार गोपाळ शेट्टी, आमदार मनीषा चौधरी आणि उत्तर मुंबईतील स्थानिक पदाधिकारी तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यासाठी नगर विकास विभाग २ ऑक्टोबरपासून नवे धोरण लागू करणार आहे. या धोरणांतर्गत बांधकामादरम्यान झालेल्या तांत्रिक किंवा प्रशासकीय चुका दूर करून इमारतींना सुटसुटीत पद्धतीने ओसी देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे परवानगीच्या क्षेत्रफळातील फरक, सेटबॅकशी संबंधित अडचणीसारख्या कारणांमुळे ओसी रोखल्या गेलेल्या इमारतींनाही दिलासा मिळणार आहे.

## राज्यात जातीय अराजकता निर्माण होऊ शकते : संजय राऊत



**मुंबई :** मराठा समाजाला आरक्षण देताना काय गुप्त गोष्टी झाल्या ते आता हळू हळू बाहेर पडत आहे. त्यामुळे मला भीती वाटत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट सांगितले की सरसकट आरक्षण दिलेले नाही. मराठा समाजाची फसवणूक झाल्याची भावना निर्माण झाली तर राज्यात अराजकता निर्माण होईल, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे. मला असे वाटते आहे की या राज्यात जातीय अराजकता निर्माण होऊ शकते. संजय राऊत म्हणाले की,नाशिक हे पवित्र आणि धार्मिक शहर आहे. या शहरात कुंभमेळा आयोजित केला जातो. प्रभु श्रीराम यांच्यासह कुसुमाग्रज, स्वा.सावरकर यांच्या नावाने ओळखले जाणारे शहर म्हणून नाशिकची ओळख आहे. आज नाशिकमध्ये जी अवस्था आणि परिस्थिती आहे त्याविरोधात शिवसेनेने आंदोलन केले आहे. ड्रग्ज विरोधात सर्वात मोठा मोर्चा नाशिकमध्ये आम्ही काढला होता. आज नाशिकमध्ये अराजक, नाशिक मनपामध्ये घोटाळे सुरू आहेत.

## पोलीस पाटलांच्या मागण्यांबाबत सकारात्मक : अण्णा बनसोडे

**मुंबई :** राज्यातील पोलीस पाटलांच्या विविध मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यासंदर्भात निर्णय घेण्यात येतील, असे विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी सांगितले. विधानभवन येथे गावकामगार पोलीस पाटील संघटनेच्या प्रश्नांसंदर्भात बैठक झाली. या बैठकीस संबंधित विभागाचे अधिकारी, संघटनेचे पदाधिकारी यांच्यासह प्रतिनिधी उपस्थित होते. पोलीस पाटलांची सेवानिवृत्ती वयोमर्यादा ६० वरून ६५ करणे, पोलीस पाटलांसंदभार्तील तक्रारीची चौकशी उपविभागीय अधिकारी स्तरावर करणे, रिक्त पदाची भरती व अन्य मागण्यांबाबत सविस्तर चर्चा झाली.

# ऊर्जा क्षेत्रातील कामगिरीत महाराष्ट्र अव्वल

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ऊर्जा क्षेत्रातील यंत्रणांचे अभिनंदन



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :**
वीज पुरवठा आणि एकूणच ऊर्जा क्षेत्रातील कामगिरीत महाराष्ट्राने बाजी मारली आहे. देशात पश्चिम विभागातील राज्यांमध्ये महाराष्ट्राने याबाबतीत अव्वल स्थान पटकावले आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचा ऊर्जा विभाग, या क्षेत्रात कार्यरत कंपन्या, विविध यंत्रणांचे तसेच राज्यातील वीज ग्राहकांचे अभिनंदन केले आहे. या मानांकनामुळे महाराष्ट्राची ऊर्जा क्षेत्राची वाटचाल योग्य दिशेने आणि दमदारपणे सुरु आहे, यावर देखील शिक्कामोर्तब झाले आहे, असे कौतुकोद्गारही त्यांनी काढले आहेत.

भारत सरकारची आरईसी महारत्न कंपनी आणि पॉवर फाऊंडेशन ऑफ इंडिया यांनी विविध निकषांवर आधारित मानांकन जाहीर केले आहे. यात महाराष्ट्राने ९३ गुण मिळवून, अ श्रेणी पटकावली आहे.

महाराष्ट्राने वीजेबाबत २०३५ पर्यंतची मागणी लक्षात घेऊन नियोजन केले आहे. ऊर्जा क्षेत्राच्या दृष्टीने असे नियोजन करणारे राज्य म्हणून देखील महाराष्ट्राने पहिले स्थान पटकावले आहे. राज्याकडे सध्या स्थापित क्षमता ही ४२ हजार मेगावॅट इतकी आहे. यात पुढच्या पाच वर्षांमध्ये आणखी ४५ हजार मेगा वॅटची भर घालता येणार आहे. त्यातून ही क्षमता ८७ हजार मेगावॅट पर्यंत वाढविता येणार आहे.

ग्राहकाभिमुख आणि सातत्यपूर्णरित्या दर्जेदार सेवा बजावल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी ऊर्जा मंत्री या नात्याने ऊर्जा विभागाशी निगडीत सर्वच कंपन्या, क्षेत्रीयस्तरावरील कर्मचाऱ्यांपासून ते अधिकारी, अभियंते आणि संचालक मंडळांचे तसेच अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात कार्यरत यंत्रणांचेही कौतुक केले आहे. या सगळ्यात राज्यातील वीज ग्राहकांचा या सर्व यंत्रणांवरील विश्वास देखील महत्वपूर्ण असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले आहे.

आरईसी व पीएफआयने दिलेल्या गुणांकनात देशात पश्चिम विभागात महाराष्ट्र अव्वल ठरला आहे. पश्चिम विभागातील गुजरात, गोवा, मध्यप्रदेश, छत्तिसगढ, दादरा-नगर हवेली, दिव दमण या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राने सर्वच निकषांमध्ये सर्वाधिक गुण मिळविले आहेत. यात वीज पुरवठा (रिलायबिलीटी ऑफ पॉवर सप्लाय) मध्ये महाराष्ट्राला ३२ गुण, वितरणाच्या अनुषंगाने वित्तीय व्यवहार्यता - २५, इझ ऑफ लिव्हिंग, इझ ऑफ डुईंग बिझनेससाठी - १७, ऊर्जा क्षेत्रातील बदलांसाठीची अनुकूलता - १५, नियमनात्मक प्रशासन यासाठी - ५ गुण अशा रितीने महाराष्ट्राने सर्वाधिक ९३ गुण पटकावून अ श्रेणीचे मानांकन मिळवले आहे.

महाराष्ट्राने २०३० पर्यंत राज्यातील ५२ टक्के ऊर्जा ही हरित स्त्रोतातून निर्मितीचा निर्धार केला आहे. डिसेंबर २०२६ अखेर राज्यातील शेतकऱ्यांना शंभर टक्के वीज दिवसा आणि सौर ऊर्जा प्रकल्पांच्या माध्यमातून उपलब्ध व्हावी यासाठी नियोजन केले आहे. या नियोजनालाही आरईसीच्या या मानांकनामुळे प्रोत्साहन मिळाले आहे.

# पाकिस्तानसोबत खेळणे राष्ट्र आणि मानवविरोधी : आदित्य ठाकरे



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :**
आशिया कपमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणाऱ्या क्रिकेट सामन्यावरून राजकीय वातावरण तापले आहे. ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ म्हणजे बीसीसीआय आणि केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. पहेलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतरही बीसीसीआय पैशासाठी हा सामना खेळत असल्याचा आरोप त्यांनी केला. बीसीसीआयची ही भूमिका देशाच्या आणि सैनिकांच्या बलिदानाचा अपमान करणारी असल्याचेही ते म्हणाले. पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळणे हे 'राष्ट्रविरोधी' आणि 'अमानुष' असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये आदित्य ठाकरे म्हणाले, "बीसीसीआयची ही निर्लज्ज वागणूक पाहून मी हैराण झालो आहे. ही वागणूक केवळ राष्ट्रविरोधी नाही, तर अमानवी आहे." ज्या देशातील दहशतवाद्यांनी पहेलगाममध्ये आपल्या नागरिकांची निर्घृण हत्या केली, त्याच देशासोबत पैशासाठी क्रिकेट खेळणे हे अत्यंत निर्लज्जपणाचे लक्षण आहे, अशी टीका त्यांनी केली. आदित्य ठाकरे म्हणाले, "पाकिस्तानने भारतात आयोजित हॉकी आशिया चषकावर बहिष्कार टाकला. पण बीसीसीआय मात्र केवळ पैशासाठी हा सामना खेळत आहे. यापेक्षा वाईट काय असू शकते? दहशतवादाला आश्रय देणाऱ्या देशासोबत खेळण्यापेक्षा दुसरे मोठे राष्ट्रविरोधी कृत्य नाही."

याचबरोबर, त्यांनी केंद्र सरकार आणि भाजपच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उभे केले. "केंद्र सरकारचे यावरचे मौन धक्कादायक आहे," असे ते म्हणाले. जगभर शिष्टमंडळे पाठवून पहेलगाम हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचे सांगायचे आणि नंतर आपल्या शूर सैनिकांच्या कारवाईचा राजकीय फायदा निवडणुकीच्या प्रचारात घ्यायचा, हे किती योग्य आहे? असा सवाल त्यांनी केला.

आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारला थेट आव्हान दिले. "पाकिस्तान दहशतवाद्यांना आश्रय देणे थांबवत नाही, तोपर्यंत बीसीसीआयला त्यांच्यासोबत क्रिकेट खेळू नका, असा आदेश सरकार देऊ शकत नाही का?" अशी विचारणा करत "हे 'सिंदूर'चे मोल आहे का?" असा संतप्त सवाल आदित्य ठाकरे यांनी विचारले आहे.

आशिया कप स्पर्धेतील भारत-पाकिस्तान सामन्यावर देशभरातून संमिश्र प्रतिक्रिया येत असून, राष्ट्रीय भावना आणि क्रीडा यांच्यातील संबंधांवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

# अहमदनगर रेल्वेस्थानकाचे अहिल्यानगर रेल्वेस्थानक नामांतर

■ **महासागर प्रतिनिधी, अहिल्यानगर, दि. १२ :**
राज्य सरकारच्या गृह मंत्रालयाने अहमदनगर रेल्वे स्थानकाचे नाव बदलून ते आता अहिल्यानगर रेल्वे स्थानक केल्याचा आदेश शुक्रवारी काढण्यात आला आहे. या संदर्भात गृहमंत्रालयाचे सहसचिव राजेश होळकर यांनी ही अधिसूचना जारी केली आहे. केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने या संदर्भात ना हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर राज्य सरकारच्या गृह मंत्रालयाने ही अधिसूचना जारी केली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव चौंडी (ता. जामखेड) येथे आहे. अहिल्यादेवी यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त ३१ मे २०२४ रोजी मुख्यमंत्री तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौंडी येथील कार्यक्रमात अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करण्याची घोषणा केली होती.

तत्कालीन आमदार राम शिंदे, आमदार गोपीचंद पडळकर यांनी नामांतराची मागणी केली होती. तत्कालीन विधिमंडळाच्या अधिवेशनात तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी अधिवेशनात नामांतराची मागणी मान्य करत अहमदनगर महापालिकेकडे नामांतराचा ठराव करण्याची सूचना पाठवली होती. मात्र त्यावेळी महापालिकेचे सभागृह अस्तित्वात असताना नामांतराचा ठराव घेण्यात आला नाही. सभागृहाचे अस्तित्व संपून प्रशासक राजवट सुरू झाल्यानंतर प्रशासकीय महासभेत नामांतराचा ठराव करण्यात आला. त्यानंतर महसूल व वन विभागाने अहमदनगर शहर, उपविभाग व जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर केल्याची अधिसूचना ८ ऑक्टोबर २०२४ रोजी जारी केली होती.

## मराठा आरक्षणावर राजकारणी खोटं बोलतात : लक्ष्मण हाके

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १२ :**
मराठा आरक्षणाबद्दल राजकारणी लोक खोट बोलतात. ओबीसी समाजाचे काय नुकसान होणार आहे ते सांगायचे कुणाचे धाडस नाही, असे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे. तर जबाबदारीच्या पदावरील लोकांकडून जे अपेक्षित होते ते होताना दिसून येत नाही असेही त्यांनी म्हटले आहे. लक्ष्मण हाके म्हणाले की, आजपर्यंत असे अनेक जजमेंट आणि आरक्षणासंदर्भात निर्णय घेणाऱ्या आयोगाने हे वेळोवेळी सांगितले आहे. त्यामुळे परत परत त्याच गोष्टी का होत आहे महाराष्ट्रामध्ये याचे उत्तर मिळालेले नाही.

लक्ष्मण हाके म्हणाले की, महाराष्ट्रातील ओबीसी समाजाला माझं सांगणे आहे की बंधूंनो वातावरण निश्चितच काळजी करण्यासारखे आहे. पण एवढ्या टोकाचे पाऊल कुठल्याही तरुणाने उचलायचे नाही. आपण लढायचे आहे.

# पुण्यात हजारो ड्रोनचा लाईट शो

### पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग शिबीर



■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १२ :**
देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस १७ सप्टेंबरला देशभरात सेवा पंधरवड्याच्या माध्यमातून विविध उपक्रमांनी साजरा होत आहे. त्यांच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला दि. १६ रोजी पुण्यात आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त अशा हजारो ड्रोन शोसह दिव्यांग सहाय्यता शिबीर आणि संगीत रजनीचे आयोजन स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर केले आहे. याबाबतची सविस्तर माहिती पत्रकार परिषदेत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली. ज्योतीने तेजाची आरती या ड्रोन लाईट शोव्दारे पुणेकरांच्या वतीने पंतप्रधान मोदींना अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात येणार आहेत. अयोध्या आणि वाराणसीनंतर महाराष्ट्रात हा ड्रोन शो प्रथमच होणार असून यातून विकसित भारताच्या संकल्पाचे दर्शन पुणेकरांना घडणार आहे. मोहोळ म्हणाले,थ्रीडी स्वरूपात असलेला हा ड्रोन लाईट शो ४५ मिनिटे असेल. त्यात मोदी सरकारच्या कामगिरीसह पुण्याच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक मानबिंदूंचे दर्शनही पुणेकरांना घडेल. तसेच पंतप्रधान मोदींनी केलेल्या विकसित भारताचा संकल्पही याद्वारे पुणेकरांना अनुभवता येईल. हजारो ड्रोन्स जेव्हा अवकाशात झेपावतील, तेव्हा पुण्याच्या ३-४ किलोमीटर परिसरापर्यंतच्या भागातील नागरिकांना हा शो अवकाशात पाहता येणार आहे. मोदी यांच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला हजारो ड्रोन पुण्याच्या अवकाशात झेपावतील आणि त्यांच्या विविध फॉर्मेशन्समधून विकसित भारताच्या दिशेने झालेल्या प्रवासाचे नयनरम्य दर्शन पुणेकरांना घडेल.पुण्यातील ७५ हजार विद्यार्थी हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पोस्टकार्डद्वारे शुभेच्छा देणार आहेत. यात पुणे शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी दिलेले शुभेच्छा संदेश एकत्र करुन थेट पंतप्रधान मोदी यांना पाठविण्यात येणार आहेत.

मंगळवार दि. १६ सप्टेंबर या दिवशी स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर विविध कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले आहे. दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत दिव्यांगांसाठी सहाय्यता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यात १२०० हून अधिक दिव्यांगांना १७५० आवश्यक साहित्यांचे मोफत वितरण करण्यात येणार आहे. शिबिरानंतर याच ठिकाणी सायंकाळी ५ ते रात्री १० पर्यंत ख्यातनाम संगीतकार आणि गायक अवधूत गुप्ते यांची लाईव्ह कॉन्सर्ट होईल.

## ड्रग मोर्चा नाशिकला नव्हे, वांद्रेला काढा भाजपाचा राऊतांवर हल्लाबोल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :**
नाशिकमध्ये होऊ घातलेल्या ड्रग्सविरोधी मोर्चाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा गट) खासदार संजय राऊत यांच्यावर भाजपाने जोरदार टीकास्त्र सोडले आहे. नाशिकला बदनाम करण्यापेक्षा वांद्रेतून डिनो मोरियाला घेऊन मोर्चा काढा, असा हल्ला भाजपाचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत चढवला. ड्रगविरोधी मोर्चा काढायचा असेल तर तो राऊतांनी स्वतःच्या भागातून काढावा. नाशिकची पावन भूमी राऊतांच्या गोंधळासाठी नाही. राऊत मोर्चा काढताना गांजाचा नशा करून तर येत नाही ना, याची रक्तपासणी व्हायला हवी, असा बोचरा टोला बन यांनी लगावला.

राऊतांनी केलेल्या अराजकतेच्या आरोपाचा समाचार घेत भाजपाने पलटवार केला. अराजकता महाराष्ट्रात नाही, ती फक्त राऊतांच्या डोक्यात आहे. उबाठा गट आणि राऊत यांच्या विचारांची भेसळ झाली आहे. हिंदुत्वाची भाषा करून ते आज महाराष्ट्राला नेपाळसारखं बनवण्याचा विचार करत आहेत, अशी टीका त्यांनी केली. याचबरोबर राऊत हे जनतेतून कधीच निवडून आलेले नाहीत, तर राज्यसभेत केवळ अर्ध्या मतांनी पोहोचले आहेत, हेही त्यांनी अधोरेखित केले. मराठा आरक्षणावर राऊत आणि उबाठा गटाने केलेली फसवणूक, शिवाजी महाराजांच्या अपमानावर त्यांचे मौन आणि काँग्रेसच्या पाठराखणीवर भाजपाने जोरदार हल्लाबोल केला. औरंगजेबाचा उदो-उदो करणाऱ्यांना जनता जशास तसं उत्तर देईल.

# राज्यात पावसाचा जोर वाढणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :**
बंगालच्या उपसागराच्या वायव्य भागात पुन्हा एकदा कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याची नोंद हवामान विभागाने केली आहे. या प्रणालीमुळे आंध्र प्रदेश, ओडिशा तसेच महाराष्ट्राच्या विविध भागांत पावसाची तीव्रता वाढण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून मराठवाडा आणि विदर्भ या भागांत दाट ढगाळ वातावरण असून अधूनमधून सरी कोसळताना दिसत आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, कारण खरीप हंगामातील पिकांना आवश्यक असा ओलावा लाभतो आहे. मात्र काही भागात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता हवामानतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. या बदलत्या वातावरणामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

पुढील चार दिवसांत राज्यात पावसाचा जोर वाढणार असल्याचे खात्रीशीर संकेत हवामान खात्याने दिले आहेत. 12 आणि 13 सप्टेंबर रोजी मराठवाड्यात जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. परभणी, हिंगोली, बीड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यांसह संभाजीनगर आणि जालना परिसरात ढगफुटी स्वरूपाचा पाऊस होऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. यामुळे नदी-नाल्यांना पूर येण्याची शक्यता असून प्रशासनाने आपत्कालीन यंत्रणा सतर्क ठेवण्यास सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांनी या काळात पिकांच्या शेतात अनावश्यक पाणी साचू देऊ नये आणि पावसाच्या संततधारांमध्ये शेतात न जाण्याचा सल्ला दिला आहे. ग्रामीण भागात पावसाच्या थैमानामुळे वीजपुरवठा खंडित होण्याचीही शक्यता व्यक्त होत आहे.

13 आणि 14 सप्टेंबर रोजी कोकण-गोवा तसेच मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे आणि मुंबई परिसरात जोरदार पावसाची शक्यता असून समुद्रकिनाऱ्यालगत वारे अधिक वेगाने वाहतील, असे सांगण्यात आले आहे. मुंबई महापालिका आणि जिल्हा प्रशासनाने नागरिकांना समुद्र किनाऱ्यावर जाण्यापासून परावृत्त केले आहे. मध्य महाराष्ट्रात नाशिक, नगर, पुणे, सातारा, सोलापूर, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यांत मुसळधार सरींचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या भागांत धरणे आणि जलाशयांमध्ये जलसाठा वाढण्याची शक्यता असल्याने सिंचन व्यवस्थेच्या दृष्टीने ही पावसाची लाट महत्त्वाची ठरणार आहे. मात्र नद्यांना पूर येण्याचा धोका असल्याने प्रशासनाने पूरग्रस्त भागातील नागरिकांसाठी उपाययोजना तयार ठेवल्या आहेत.

# महसूल यंत्रणेने आपल्या क्षमतेचा वापर करुन गरजूंना न्याय मिळवून द्यावा : चंद्रशेखर बावनकुळे



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १२ :**
राज्य शासन पारदर्शकतेने आणि गतिमानतेने लोकाभिमुख काम करीत आहे. महसूल विभाग हा सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याच्या विषयांशी निगडित असून या विभागातील अधिकाऱ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. या क्षमतेचा वापर गरजूंना कमीत कमी वेळेत न्याय देण्यासाठी करून शासनाच्या धोरणाला पूरक कार्य करावे, असे आवाहन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत कोकण महसूल विभागाच्या कामांचा आढावा घेण्यात आला. कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, विभागातील आमदार सर्वश्री दीपक केसरकर, निलेश राणे, विक्रांत पाटील, किरण सामंत, भास्कर जाधव, अबु आझमी, भाई जगताप, राजन नाईक, अनंत नर, मुरजी पटेल, हरून खान, तुकाराम काते, मनिषा चौधरी, चित्रा वाघ, विद्या ठाकूर, सुलभा गायकवाड यांच्यासह विभागातील जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्याची क्षमता आहे. कोकण विभागाचे आतापर्यंतचे काम समाधानकारक असून अर्धन्यायिक प्रकरणांमध्ये प्रलंबित असलेल्या सुनावण्या येत्या तीन महिन्यात निकाली काढण्यात याव्यात. त्याचबरोबर विभागात सुरू असलेली नावीन्यपूर्ण कामे लोकांपर्यंत पोहोचविण्यात यावीत. यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करावा. कामाची गती राखताना अनवधानाने एखादी चूक झाली तर चालेल तथापि जाणीवपूर्वक झालेली चूक खपवून घेतली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. वाळू बाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. तथापि कोकणातील भौगोलिक परिस्थिती पाहता या विभागासाठी धोरणात बदल करावा लागणार असल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींशी चर्चा करून १५ दिवसात याबाबतची कार्यप्रणाली सादर करावी, असे निर्देश मंत्री श्री. बावनकुळे यांनी दिले. कोणत्याही परिस्थितीत वाळू चोरी होणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. येत्या १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सेवा सप्ताह राबविण्यात येणार आहे, या दरम्यान मोहीम स्वरूपात पाणंद रस्ते आणि सर्वांसाठी घरे अभियानास पूरक उपक्रम राबविले जाणार आहेत. या पंधरवड्यात महसूल यंत्रणेने सर्व लोकप्रतिनिधींना सहभागी करून घ्यावे, असे निर्देशही मंत्री बावनकुळे यांनी दिले.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी सादरीकरणाद्वारे कोकण विभागातील महसुली कामाच्या सद्यस्थितीचा आढावा सादर केला. त्याचबरोबर सेवा पंधरवड्यादरम्यान करण्यात येणाऱ्या पाणंद रस्ते आणि सर्वांसाठी घरे अभियानाच्या तयारीबाबत तसेच विविध जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांबाबतची माहिती दिली. सामाजिक साहाय्याच्या लाभाच्या योजनांपासून एकही लाभार्थी वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## मोटारीच्या धडकेत दोन वर्षांच्या बालकाचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी पुणे, दि. १२ :**
मोटारीच्या धडकेत दोन वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाल्याची घटना लोहगावमधील हवाई दलाच्या वसाहतीत घडली. या प्रकरणी मोटारचालक महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.विदार्थ विपीन मावी (वय दोन) असे मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे. याबाबत विदार्थचे वडील विपीन राजसिंग मावी (वय ३४, सध्या रा. हवाई दल वसाहत, लोहगाव) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विपीन मावी हे हवाई दलात अधिकारी आहेत. त्यांचा दोन वर्षांचा मुलगा विदार्थ गुरुवारी (११ सप्टेंबर) दुपारी साडेबाराच्या सुमारास हवाई दल वसाहतीतील घरासमोर खेळत होता. त्या वेळी वसाहतीत राहणाऱ्या एका मोटारचालक महिलेने घरासमोर खेळणाऱ्या विदार्थला धडक दिली.

# नाबार्ड अंतर्गत सिंचन प्रकल्पांची कामे कालमर्यादेत पूर्ण करावी : राधाकृष्ण विखे-पाटील



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १२ :**
नाबार्ड अंतर्गत होणाऱ्या सिंचन प्रकल्पांचे नियोजन, मंजुरी आणि कामे जलद गतीने करून या प्रकल्पांची कामे कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले.

नाबार्ड अंतर्गत प्रस्तावाच्या सद्यस्थितीचा आढावा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत घेतला. बैठकीस जलसंपदा विभागाचे सचिव संजय बेलसरे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक गुणाले, गोदावरी खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार, मुख्य अभियंता तथा सह सचिव प्रसाद नार्वेकर, संजीव टाटू, अधीक्षक अभियंता प्रवीण कोल्हे आदी उपस्थित होते.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, ज्या प्रकल्पांची कामे अंतिम टप्प्यात आहेत त्या प्रकल्पाच्या कामांना प्राधान्य द्यावे. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. तसेच २०२५-२६ व २०२६-२७ मध्ये पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांचे काम गतीने करून हे प्रकल्प एक वर्षात पूर्ण करण्याबाबत नियोजन होणे आवश्यक आहे. एका वर्षात पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांची वेगळी सूची करून त्यानुसार त्या प्रकल्पांच्या कामांना गती द्यावी. या प्रकल्पांच्या पूर्ततेमुळे सिंचन क्षेत्रात वाढ होणार असल्याने या कामांना गती द्यावी. प्रकल्पांच्या कामांसाठी उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करावा, तसेच आवश्यक निधीही उपलब्ध करून दिला जाईल.

कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे बॅरेज बंधाऱ्यात रूपांतरण करण्यासाठीचा प्रस्ताव तातडीने सादर करण्यात यावा. प्रस्तावित कामांची माहिती, सर्वेक्षण, अन्वेषण याबाबतचे सूक्ष्म नियोजन करण्यात यावे.

महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत यांच्याकडील पाणीपट्टी वसुलीबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात यावी. यासंदर्भात प्रत्येक कार्यकारी अभियंता स्तरावर टास्क फोर्स स्थापन केला जावा, असे निर्देशही विखे-पाटील यांनी दिले.

# २०२३ च्या अकोला दंगलीची होणार एसआयटी चौकशी

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १२ :

सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी अकोल्यात २०२३ मध्ये झालेल्या जातीय दंगलीची चौकशी करण्यात अपयशी ठरल्याबद्दल महाराष्ट्र पोलिसांची चांगलीच खरडपट्टी काढली. कोर्टाने या प्रकरणी पोलिसांना खाकी वर्दी अंगात घातल्यानंतर सर्व प्रकारचे पूर्वग्रह सोडून कायद्यानुसार कर्तव्य बजावण्याचा सल्ला दिला. विशेषत: या प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी करण्याचे, त्यातही या एसआयटीत हिंदू व मुस्लीम समाजाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सामावून घेण्याचे निर्देशही कोर्टाने या प्रकरणी दिलेत. २०२३ मध्ये अकोल्यात जातीय दंगल घडली होती. त्यात एका हत्येचा साक्षीदार असल्याचा दावा करणाऱ्या एका व्यक्तीने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्र पोलिसांच्या कर्तव्यपरायणतेवर सवाल उपस्थित केला. पोलिसांनी खऱ्या आरोपींऐवजी मुस्लीम समाजातील काही नागरिकांवरच



सुप्रीम कोर्टाने दिले आदेश

गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. त्यामुळे या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करून योग्य त्या तपासाचे निर्देश द्यावेत, अशी मागणी या याचिकाकर्त्याने केली होती. त्यावर न्यायमूर्ती संजय कुमार व न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या द्विसदस्यीय खंडपीठाने एसआयटी चौकशीचे आदेश दिले.

**सरकारच्या दबावाखाली चौकशी**

एखाद्या व्यक्तीने पोलिसांचा खाकी गणवेश परिधान केला की त्याने सर्व सामाजिक, धार्मिक पूर्वग्रहांपासून दूर राहून कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे कर्तव्य निष्पक्षपणे बजावणे आवश्यक आहे, असे कोर्टाने या प्रकरणी ठणकावून सांगितले. प्रस्तुत प्रकरणात पोलिसांनी एकाकी तपास केला. कोणतीही वस्तुस्थिती लक्षात घेतली नाही, असे कोर्ट म्हणाले. विशेष म्हणजे दंगलीच्या काळात अकोल्याचे पालकमंत्रिपद तत्कालीन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे होते. त्यामुळे पोलिसांनी सरकारच्या दबावाखाली या घटनेचा तपास केल्याचा आरोप आहे. दंगलीतील हिंसाचाराचा स्वत:ही बळी ठरलेल्या याचिकार्त्याने यापूर्वी या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते. पण तिथे त्यांची याचिका फेटाळून लावण्यात आली.

याचिकाकर्त्याने नियोजित वेळेत पोलिसांशी संपर्क साधला नाही. पोलिसांनी आधीच आरोपपत्र दाखल केले असून याचिका हेतुपुरस्सर दाखल करण्यात आल्याचे निरीक्षणही त्यावेळी हायकोर्टाने नोंदवले होते. खऱ्या हल्लेखोरांऐवजी पोलिसांनी दुसऱ्याच व्यक्तींना आरोपी केल्याचा कोणताही दावा दंगलीतील मृतांच्या कायदेशीर प्रतिनिधीने न्यायालयात केलेला नाही, याकडेही मुंबई उच्च न्यायालयाने या वेळी लक्ष वेधले होते. या निर्णयाला याचिकाकर्त्याने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

**आत्ता पाहू काय आहे प्रकरण?**

समाजमाध्यमावर एका आक्षेपार्ह संदेशानंतर अकोला येथे मे २०२३ मध्ये जातीय दंगल उसळली होती. त्यात विलास महादेवराव गायकवाड यांचा मृत्यू झाला होता. त्यावेळी १७ वर्षे वय असलेला याचिकाकर्ताही जखमी झाला होता.

## तहसील कार्यालयात महसूल सेवकांचे आंदोलन

**धामणगाव :** महसूल सेवकांना चौथ्या श्रेणीचा दर्जा द्यावा, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनमान, सेवा सुविधा व निवृत्तीवेतन लागू करावे, या मागणीसाठी तहसील कार्यालयात महसूल सेवकांनी गुरुवार ११ सप्टे.रोजी आंदोलन करून मागण्या मान्य न झाल्यास राज्यभर आंदोलन केले जाईल. या आंदोलनात विदर्भ महसूल सेवक संघटना शाखा, धामणगाव रेल्वेही सहभागी होईल, अश इशारा देण्यात आला. महसूल सेवक (कोतवाल) पदास चौथ्या श्रेणीचा दर्जा व शासकीय सेवकांप्रमाणे सर्व सुविधा देण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. शासनाने वारंवार आश्वासने देऊनही अद्याप कोणताही ठोस निर्णय घेतलेला नसल्यामुळे महसूल सेवक संतप्त झाले आहेत. विदर्भ महसूल सेवक संघटना तालुका शाखा, धामणगाव रेल्वे यांच्या वतीने महसूल मंत्री यांच्या कार्यक्षेत्रात तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याची घोषणा करीत, नारेबाजीही केली.

## औद्योगिक वसाहतीमधील अडचणी सोडवणार : जिल्हाधिकारी वर्षा मीना



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १२ :

औद्योगिक वसाहतीतील सुरक्षितता, अतिक्रमण व इतर अडचणी प्राधान्याने सोडविण्याची ग्वाही जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिली.त्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील विविध उद्योगांची पाहणी केली. त्यानंतर उद्योजकांसमेवत अकोला इंडस्ट्रीज असोसिएशनच्या सभागृहात बैठक झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या. संघटनेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, सचिव नितीन बियाणी, उद्योग सहसंचालक नीलेश निकम, उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बन्सोड, भागवत अनवणे, प्रसन्न रत्नपारखी, नवीन कृपलानी आदी उपस्थित होते.एमआयडीसी परिसरात उद्योग विभागाच्या सहकार्याने क्लस्टर निर्मितीसाठी प्रयत्न होत आहेत. त्या अंतर्गत 'अकोलावाला फूड प्रोसेसिंग क्लस्टर'चा शुभारंभ जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते झाला. तेथील अन्न तपासणी प्रयोगशाळा, शीत साठवणूक गृह व कार्यालयाची जिल्हाधिकारी मीना यावेळी पाहणी केली.


कार्यालय

## ग्रामपंचायत माहूरझरी

**पंचायत समिती नागपूर,ता.नागपूर .जि नागपूर**

**ई-निविदा सुचना क्र.१/२०२५/२६ (पहिली वेळ)**

जिल्हा परिषद नागपूर ग्रा.पं. **माहूरझरी** अंतर्गत करिता जि.प.वेबसाईट वर www.mahatenders.gov.inया संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून सदर संकेतस्थळ खालील नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती उपलब्ध असून शासन स्तरावरील योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून तसेच विविध योजने करिता लागणारे साहित्य पुरवठा धारक यांच्या कडून वार्षिक बांधकाम साहित्य सन २५/२६करिता निविदा खालील "बि-१" ई-निविदा मांगविण्यात येत आहे.

१) सन २५/२६ ग्रा.पं. माहूरझरी अंतर्गत सन २४/२५ मधील अ.जा.व न.बौ.घटकांच्या वस्तीचा विकास योजने अंतर्गत कामे व डी.पी.सी जन सुविधा योजने अंतर्गत कामे.(बी-वन करिता )

२) बी-वन दरपत्रक विक्रीचा दिनांक:- ११/०९/२०२५ ला दुपारी ४.०० वा प्रसिद्ध करण्यात येईल.

३) बांधकाम साहित्य दरपत्रक विक्रीचा दिनांक:- १२/०९/२०२५ ला सां. ५.०० वा प्रसिद्ध करण्यात येईल.

४) बी-वन /बांधकाम साहित्य दरपत्रक स्वीकृतीचा अंतिम दिनांक :१८/०९/२०२५ ला दुपारी ४.०० व ५.०० वा पर्यंत उपलब्ध राहील .

५) बी-वन /बांधकाम साहित्य दरपत्रक उघडण्याच्या दिनांक:-१९/०९/२०२५ला दुपारी ४.०० व ५.०० वाजता किवा सोईनुसार उघडण्यात येईल.

-स्वा-
सरपंच / उपसरपंच/ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत **माहूरझरी**
पं.स.नागपूर . जि.पं.नागपूर



## दरपत्रक सुचना

प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर), गिरीपेठ पोस्ट ऑफीस समोर, अमरावती रोड, नागपूर ४४००१० येथील विविध शाखेतील संगणक यंत्रणा (वाहन व सारथी प्रणाली वगळून) सुव्यवस्थितीत ठेवण्यासाठी खालील बाबीकरीता एक वर्ष या कालावधीकरीता जाहीर दरपत्रक आमंत्रित करण्यात येत आहेत. दरपत्रकाच्या अटी व शर्ती तसेच इतर तत्सम माहिती कार्यालयाचे लेखा शाखेतर्फे घेता येईल.

१. संगणकीय यंत्रणा (प्रिंटर्स सह) वार्षिक देखभाल व दुरुस्ती करार
२. आवश्यकते प्रमाणे Computer Networking
३. संगणकीय सुटे भाग
४. देखभाल व दुरुस्ती अंतर्गत किरकोळ तत्सम सुटे भाग व साहित्याचा पुरवठा

दरपत्रक प्रपत्र विक्री : दि. २५/०९/२०२५ ते दि. ०१/१०/२०२५ (ठिकाण : लेखा शाखा)
दरपत्रक प्रपत्र मुल्य :– रु. १९००/–
दरपत्रक स्विकारण्याचा अंतिम दिनांक:– ०३/१०/२०२५ (दुपारी २.०० पर्यंत) (ठिकाण: लेखा शाखा)
दरपत्रक उघडण्याचा दिनांक ०६/१०/२०२५ (दुपारी १२.०० पर्यंत) (ठिकाण सहा.प्रा.प.अ. यांचे कक्ष)

दरपत्रक प्रक्रीया संपूर्णपणे रद्द करण्याचा अथवा त्यामधील कोणत्याही दिनांकात व वेळेत बदल करण्याचा अधिकार प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (शहर) यांनी राखून ठेवला आहे.

(किरण बिडकर)
प्रादेशिक परिवहन अधिकारी
नागपूर (शहर)

क्र. संमावज/नाग/३७४/२०२५



# HARI GOVIND INTERNATIONAL LIMITED

REGISTERED OFFICE: 125, Wardhman Nagar Nr. Radha Krishna Mandir, Nagpur, Maharashtra, India, 440008
EMAIL: hgil.ngp@gmail.com WEBSITE: www.hgil.in PH: 09373126605 CIN: L99999MH1989PLC050528

**CORRIGENDUM TO DRAFT LETTER OF OFFER DATED MAY 28, 2025 FOR THE ATTENTION OF THE PUBLIC SHAREHOLDERS OF HARI GOVIND INTERNATIONAL LIMITED**

This corrigendum (**"Corrigendum"**) to the Public Announcement (PA) dated May 14, 2025, Detailed Public Statement (DPS) dated May 21, 2025 and **Draft Letter of Offer** dated May 28, 2025 (the **"Draft Letter of Offer"** or **"DLOF"**) is being issued by Marwadi Chandarana Intermediaries Brokers Private Limited, the manager to the Open Offer (**"Managers"** or **"Managers to the Offer"**), for and on behalf of the Acquirer, to the Public Shareholders of the Target Company.

This Corrigendum should be read in continuation of, and in conjunction with, the DLOF which has been sent to BSE Limited (**"BSE"**) (Referred to as "Stock Exchange") on which Equity Shares of Target Company are listed and to the SEBI and the Target Company in accordance with the SEBI (SAST) Regulations.

Capitalized terms used in this Corrigendum and not defined herein shall have same meaning ascribed to it in DLOF.

In relation to DLOF, the Public Shareholders are requested to take note of following modifications:

For the purposes of this Offer Opening Draft Letter of Offer and Corrigendum, the following terms would have the meaning assigned to them herein below:

1. To remove the phrase "to the best of the knowledge" mentioned in DLOF on cover page in point no 6 and page 13 in point 3.2.8.
2. **Point 1 of (Definition) of the DLOF** - Selling Shareholders / Sellers : Jugalkishore Maniyar HUF & Sunita Maniyar
3. Clause 3.1.6 shall be replaced as stated below: The prime object of this Offer is to acquire substantial Equity Shares and Expanded Share Capital accompanied by control over the Target Company. The Acquirers intend to expand the Target Company's business activities by carrying on additional business for commercial reasons and operational efficiencies. The Acquirers reserve the right to modify the present structure of the business in a manner which is useful to the larger interest of the shareholders. Any change in the structure that may be carried out, will be in accordance with applicable laws.
   The Acquirers are engaged in the business of kidswear and baby products under the well-established brand name **"Popees"**, and intend to consolidate their business operations and brand presence under a single corporate platform. Despite the Target Company (TC) having no active business operations and incurring losses over the past decade, the acquisition is a strategic move aimed at utilizing the existing corporate structure of the TC for future business expansion. The Acquirers have formulated a comprehensive business plan to revive and repurpose the Target Company, with the objective of generating long-term value for all stakeholders, including minority shareholders.
4. Clause 3.1.8 shall be added as stated *"Mr. Aneesh Kumar Kuniyil from the BoD of TC shall resign as a Director post completion of open offer or consummation of open offer whichever is earlier."*
5. Clause 7.2.9 shall be replaced as stated : The Acquirers may act upon the agreement and may complete the acquisition of shares or voting rights in, or control over the target company as contemplated subject to deposit of the fund in the escrow account equivalent to maximum offer consideration and in compliance with regulation 22 (2) of SEBI (SAST) Regulation. Further, the equity shares proposed to be allotted to Acquirers on preferential basis shall be kept in a Demat escrow account until the completion of open offer in compliance with Regulation 22(2A) of the SEBI (SAST) Regulations, 2011. Also, Manager will have the right to operate the Demat Escrow Account and the Acquirers will not exercise any voting rights over the said Equity Shares kept in the Demat Escrow Account.
6. Clause 8.2 shall be replaced as stated :
   **Locked-in Shares:** There are no locked-in shares in HGIL. The shares to be allotted under the preferential allotment shall be locked in for a period of 18 months from the date of receipt of trading approval from BSE for the Promoters and for a period of 6 months from the date of receipt of trading approval from BSE for the public shareholders. The public shareholders have however given an undertaking that they will not tender the shares allotted in the preferential allotment in the open offer. .

Except as detailed in this Corrigendum, all other terms and contents of the Draft Letter of Offer remain unchanged.

The Acquirer accept full responsibility for the information contained in this Corrigendum and for the fulfilment of their obligations under the SEBI (SAST) Regulations.

This Corrigendum will be available on the website of the Securities and Exchange Board of India at https://www.sebi.gov.in/

**ISSUED BY THE MANAGER TO THE OPEN OFFER:**

MARWADI CHANDARANA GROUP

**Marwadi Chandarana Intermediaries Brokers Private Limited**
X-change Plaza, Office no. 1201 to 1205, 12th Floor, Building No. 53E, Zone-5, Road 5E, Gift City, Gandhinagar - 382355, Gujarat, India
**Tel. No.:** 022-69120027;
**Email:** mb@marwadichandarana.com;
**Website:** ib.marwadichandaranagroup.com;
**Contact Person:** Radhika Maheshwari / Jigar Desai;
**SEBI Registration Number:** INM000013165

**For and on behalf of Acquirer**

Place : Mallapuram
Date : September 12, 2025

**Mr. Shaju Thomas**
**Mrs. Linta Purayidathil Jose**

Surjeet Comm



**THIS IS A PUBLIC ANNOUNCEMENT FOR INFORMATION PURPOSES ONLY AND IS NOT A PROSPECTUS ANNOUNCEMENT AND DOES NOT CONSTITUTE AN INVITATION OR OFFER TO ACQUIRE, PURCHASE OR SUBSCRIBE TO SECURITIES UNDER THE SECURITIES AND EXCHANGE BOARD OF INDIA (ISSUE OF CAPITAL AND DISCLOSURE REQUIREMENTS) REGULATIONS, 2018, AS AMENDED ("SEBI ICDR REGULATIONS"). NOT FOR RELEASE, PUBLICATION OR DISTRIBUTION DIRECTLY OR INDIRECTLY, OUTSIDE INDIA. INITIAL PUBLIC OFFERING OF EQUITY SHARES ON THE MAIN BOARD OF THE STOCK EXCHANGES (AS DEFINED IN THE DRHP) IN COMPLIANCE WITH CHAPTER II OF THE SEBI ICDR REGULATIONS**

**PUBLIC ANNOUNCEMENT**

(Please scan this QR code to view the DRHP)

# SHRIRAM FOOD INDUSTRY LIMITED

Our Company was originally incorporated as Shriram Rice Udyog India Private Limited, a private limited company under the erstwhile Companies Act, 1956, pursuant to a certificate of Incorporation dated January 22, 2014, issued by the Registrar of Companies, Maharashtra, Mumbai. Subsequently, pursuant to a resolution passed by our Board dated March 19, 2014, and a special resolution passed by our Shareholders dated March 20, 2014, the name of our Company was changed from 'Shriram Rice Udyog India Private Limited' to 'Shriram Food Industry Private Limited' and a fresh certificate of incorporation dated May 7, 2014, was issued by the Registrar of Companies, Maharashtra. The name of our Company was subsequently changed to 'Shriram Food Industry Limited', upon conversion to Public Limited Company, pursuant to a board resolution dated March 10, 2023 and a shareholders resolution dated April 3, 2023 and a fresh certificate of incorporation dated May 9, 2023, was issued by the Registrar of Companies, Mumbai. For details of change in the name and registered office of our Company, see ***"History and Certain Corporate Matters"*** on page 226 of the draft red herring prospectus dated September 11, 2025 (the "**DRHP**" or the "**Draft Red Herring Prospectus**").

**Corporate Identity Number:** U15118MH2014PLC252387
**Registered Office:** S.No.181/2, 182/1A, 182/2, Marodi, Mauda Tahsil, Nagpur – 441 104, Maharashtra, India.
**Corporate Office:** Mahadev Galaxy, Plot No. 16, 17, 18, First Floor, Lakadganj Near Harihar Mandir, Bagadganj, Nagpur – 440 008, Maharashtra, India
**Contact Person:** Nidhi Pradeep Vitonde, Company Secretary and Compliance Officer; **Telephone:** +91 7122997067; **E-mail:** cs@shriramfood.com; **Website:** www.shriramfood.com

**OUR PROMOTERS: ANUP RAMAVTAR GOYAL, NITESH CHAUDHARI, AMAN ANUP GOYAL, ORIENT DEALTRADE PRIVATE LIMITED AND GRETA INDUSTRIES PTE LIMITED**

**INITIAL PUBLIC OFFERING OF UP TO 2,64,00,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹10 EACH ("EQUITY SHARES") OF SHRIRAM FOOD INDUSTRY LIMITED ("OUR COMPANY" OR THE "ISSUER") FOR CASH AT A PRICE OF ₹[●] PER EQUITY SHARE (INCLUDING A SECURITIES PREMIUM OF ₹[●] PER EQUITY SHARE) ("OFFER PRICE") AGGREGATING UP TO ₹[●] LAKHS COMPRISING A FRESH ISSUE OF UP TO 2,12,00,000 EQUITY SHARES AGGREGATING UP TO ₹[●] LAKHS BY OUR COMPANY ("FRESH ISSUE") AND AN OFFER FOR SALE OF UP TO 52,00,000 EQUITY SHARES OF FACE VALUE ₹10 EACH AGGREGATING TO ₹[●] LAKHS COMPRISING UP TO 18,20,000 EQUITY SHARES AGGREGATING UP TO ₹[●] LAKHS BY ORIENT DEALTRADE PRIVATE LIMITED AND UP TO 33,80,000 EQUITY SHARES AGGREGATING UP TO ₹[●] LAKHS BY GRETA INDUSTRIES PTE LIMITED (COLLECTIVELY, THE "PROMOTER SELLING SHAREHOLDERS") AND SUCH OFFER FOR SALE OF EQUITY SHARES BY THE PROMOTER SELLING SHAREHOLDERS, THE "OFFER FOR SALE") (OFFER FOR SALE TOGETHER WITH THE FRESH ISSUE, THE "OFFER"). THE OFFER WILL CONSTITUTE [●] % OF OUR POST-OFFER PAID-UP EQUITY SHARE CAPITAL OF OUR COMPANY.**

**THE OFFER INCLUDES A RESERVATION OF UP TO [●] EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹10 EACH, AGGREGATING UP TO ₹[●] LAKHS (CONSTITUTING UP TO [●]% OF THE POST OFFER PAID-UP EQUITY SHARE CAPITAL), FOR SUBSCRIPTION BY ELIGIBLE EMPLOYEES (THE "EMPLOYEE RESERVATION PORTION"). THE OFFER LESS THE EMPLOYEE RESERVATION PORTION IS HEREINAFTER REFERRED TO AS THE "NET OFFER". THE OFFER AND THE NET OFFER SHALL CONSTITUTE [●]% AND [●]%, RESPECTIVELY, OF THE POST-OFFER PAID-UP EQUITY SHARE CAPITAL OF OUR COMPANY. OUR COMPANY, AND THE PROMOTER SELLING SHAREHOLDERS, IN CONSULTATION WITH THE BOOK RUNNING LEAD MANAGER, MAY OFFER A DISCOUNT OF UP TO [●]% (EQUIVALENT OF ₹[●] PER EQUITY SHARE) TO THE OFFER PRICE TO ELIGIBLE EMPLOYEES BIDDING UNDER THE EMPLOYEE RESERVATION PORTION ("EMPLOYEE DISCOUNT").**

**THE FACE VALUE OF THE EQUITY SHARES IS ₹10 EACH AND THE OFFER PRICE IS [●] TIMES THE FACE VALUE OF THE EQUITY SHARES. THE PRICE BAND AND THE MINIMUM BID LOT, THE EMPLOYEE DISCOUNT, IF ANY, WILL BE DECIDED BY OUR COMPANY IN CONSULTATION WITH THE BOOK RUNNING LEAD MANAGER AND WILL BE ADVERTISED IN ALL EDITIONS OF [●] (A WIDELY CIRCULATED ENGLISH NATIONAL DAILY NEWSPAPER), ALL EDITIONS OF [●] (A WIDELY CIRCULATED HINDI NATIONAL DAILY NEWSPAPER) AND ALL EDITIONS OF [●] (A WIDELY CIRCULATED MARATHI DAILY NEWSPAPER, MARATHI BEING THE REGIONAL LANGUAGE OF THE STATE OF MAHARASHTRA, WHERE OUR REGISTERED OFFICE IS LOCATED), AT LEAST 2 (TWO) WORKING DAYS PRIOR TO THE BID/OFFER OPENING DATE, AND SHALL BE MADE AVAILABLE TO THE STOCK EXCHANGES FOR THE PURPOSE OF UPLOADING ON THEIR RESPECTIVE WEBSITES IN ACCORDANCE WITH THE SEBI ICDR REGULATIONS.**

**Subject to finalisation of basis of allotment*

In case of any revision in the Price Band, the Bid/ Offer Period will be extended by at least 3 (three) additional Working Days after such revision in the Price Band, subject to the Bid/ Offer Period not exceeding 10 (ten) Working Days. In cases of force majeure, banking strike or similar circumstances, our Company may in consultation with the Book Running Lead Manager, for reasons to be recorded in writing, extend the Bid / Offer Period for a minimum of 1 (one) Working Day, subject to the Bid/ Offer Period not exceeding 10 (ten) Working Days. Any revision in the Price Band and the revised Bid/ Offer Period, if applicable, shall be widely disseminated by notification to the Stock Exchanges, by issuing a public notice, and also by indicating the change on the website of the BRLM and at the terminals of the Members of the Syndicate and by intimation to Designated Intermediaries and the Sponsor Bank, as applicable.

This Offer is being made in terms of Rule 19(2)(b) of the SCRR read with Regulation 31 of the SEBI ICDR Regulations. The Offer is being made for at least 25% of the post-Offer paid-up Equity Share capital of our Company. This Offer is being made through the Book Building Process in accordance with Regulation 6(1) of the SEBI ICDR Regulations wherein, in terms of Regulation 32(1) of the SEBI ICDR Regulations, not more than 50% of the Offer shall be available for allocation on a proportionate basis to Qualified Institutional Buyers ("**QIBs**" and such portion the "**QIB Portion**"), provided that our Company in consultation with the BRLM may allocate up to 60% of the QIB Portion to Anchor Investors on a discretionary basis in accordance with SEBI ICDR Regulations ("**Anchor Investor Portion**"). One-third of the Anchor Investor Portion shall be reserved for domestic Mutual Funds, subject to valid Bids being received from the domestic Mutual Funds at or above the Anchor Investor Allocation Price, in accordance with the SEBI ICDR Regulations. In the event of under-subscription, or non-allocation in the Anchor Investor Portion, the balance Equity Shares shall be added to the QIB Portion (excluding the Anchor Investor Portion) ("**Net QIB Portion**"). Further, 5% of the QIB Portion (excluding the Anchor Investor Portion) shall be available for allocation on a proportionate basis to Mutual Funds only, and the remainder of the Net QIB Portion shall be available for allocation on a proportionate basis to all QIB Bidders (other than Anchor Investors), including Mutual Funds, subject to valid Bids being received at or above the Offer Price. However, if the aggregate demand from Mutual Funds is less than 5% of the QIB Portion, the balance Equity Shares available for allocation in the Mutual Fund Portion will be added to the remaining Net QIB Portion for proportionate allocation to QIBs. Further, not less than 15% of the Offer shall be available for allocation on a proportionate basis to Non-Institutional Bidders ("**NIBs**") out of which (a) one third of such portion shall be reserved for applicants with application size of more than ₹2 Lakhs and up to ₹10 Lakhs and (b) two-third of such portion shall be reserved for applicants with application size of more than ₹10 Lakhs, provided that the unsubscribed portion in either of such sub-categories may be allocated to applicants in the other sub-category of NIBs and not less than 35% of the Offer shall be available for allocation to Retail Individual Bidders ("**RIBs**") in accordance with the SEBI ICDR Regulations subject to valid Bids being received at or above the Offer Price. Further, Equity Shares will be allocated on a proportionate basis to Eligible Employees Bidding in the Employee Reservation Portion, subject to valid Bids received from them at or above the Offer Price. All Potential Bidders, other than Anchor Investors, are required to participate in the Offer by mandatorily utilising the Application Supported by Blocked Amount ("**ASBA**") process by providing details of their respective ASBA Account (as defined hereinafter) and UPI ID in case of UPI Bidders using the UPI Mechanism, as applicable, pursuant to which their corresponding Bid Amounts will be blocked by the Self Certified Syndicate Banks ("**SCSBs**") or by the Sponsor Banks under the UPI Mechanism, as the case may be, to the extent of respective Bid Amounts. Anchor Investors are not permitted to participate in the Offer through the ASBA process. For details, see ***"Offer Procedure"*** on page 394 of the DRHP.

This public announcement is made in compliance with the provisions of Regulation 26(2) of the SEBI ICDR Regulations to inform the public that our Company is proposing to undertake, subject to applicable statutory and regulatory requirements, receipt of requisite approvals, market conditions and other considerations, an initial public offering of its Equity Shares pursuant to the Offer and has filed the DRHP dated September 11, 2025 with Securities and Exchange Board of India ("**SEBI**") and the Stock Exchanges on September 11, 2025.

Pursuant to Regulation 26(1) of the SEBI ICDR Regulations, the DRHP filed with SEBI shall be made available to the public for comments, if any, for period of at least 21 days, from the date of publication of this public announcement by hosting it on the website of SEBI at www.sebi.gov.in, on the websites of the Stock Exchanges i.e., BSE at www.bseindia.com, NSE at www.nseindia.com where the equity shares are proposed to be listed, the websites of the BRLM, i.e. Choice Capital Advisors Private Limited at www.choiceindia.com/merchant-investment-banking and the website of our Company at www.shriramfood.com. Our Company hereby invites the public to give their comments on the DRHP filed with SEBI, with respect to disclosures made in the DRHP. The members of public are requested to send a copy of their comments to SEBI, to the Company Secretary and Compliance Officer of our Company and/or the BRLM at their respective addresses mentioned herein below. All comments must be received by SEBI and/or our Company and/or the BRLM and/or the Company Secretary and Compliance Officer of our Company at their respective addresses mentioned herein below in relation to the Offer on or before 5:00 p.m. on the 21st day from the aforesaid date of filing the DRHP with SEBI.

Investments in equity and equity-related securities involve a degree of risk and investors should not invest any funds in the Offer unless they can afford to take the risk of losing their investment. Investors are advised to read the risk factors carefully before taking an investment decision in the Offer. For taking an investment decision, investors must rely on their own examination of our Company and the Offer, including the risks involved. The Equity Shares in the Issuer have not been recommended or approved by the Securities and Exchange Board of India ("**SEBI**"), nor does SEBI guarantee the accuracy or adequacy of the contents of the Draft Red Herring Prospectus. Specific attention of the investors is invited to ***"Risk Factors"*** on page 35 of the DRHP.

Any decision to invest in the Equity Shares described in the DRHP may only be made after the red herring prospectus ("**Red Herring Prospectus**") has been filed with the RoC and must be made solely on the basis of such Red Herring Prospectus as there may be material changes in the Red Herring Prospectus from the DRHP.

The Equity Shares, when offered through the Red Herring Prospectus, are proposed to be listed on the main board of the Stock Exchanges.

For details of the main objects of the Company as contained in its memorandum of association, see ***"History and Certain Corporate Matters"*** on page 226 of the DRHP.

The liability of the members of the Company is limited. For details of the share capital, capital structure of the Company and the names of the signatories to the memorandum of association and the number of shares subscribed by them see ***"Capital Structure"*** on page 96 of the DRHP.

| BOOK RUNNING LEAD MANAGER | REGISTRAR TO THE OFFER |
|---|---|
| Choice<br>The Joy of Earning | MUFG |
| **Choice Capital Advisors Private Limited**<br>Sunil Patodia Tower, Plot No. 156-158 J.B. Nagar, Andheri (East), Mumbai – 400 099, Maharashtra, India.<br>**Telephone:** +91 22 6707 9999 / 7919; **Contact Person:** Nimisha Joshi/ Nishant Baghmar<br>**E-mail:** sfil.ipo@choiceindia.com; **Website:** www.choiceindia.com/merchant-investment-banking<br>**Investor Grievance E-mail:** investorgrievances_advisors@choiceindia.com<br>**SEBI Registration No.:** INM000011872 | **MUFG INTIME INDIA PRIVATE LIMITED** ***(Formerly known as Link Intime India Private Limited)***<br>C-101, 1st Floor, 247 Park, Lal Bhadur Shastri Marg, Vikhroli (West), Mumbai 400 083, Maharashtra, India<br>**Telephone:** +91 810 811 4949; **Email:** shriramfood.ipo@in.mpms.mufg.com<br>**Website:** www.in.mpms.mufg.com; **Investor Grievance Email:** shriramfood.ipo@in.mpms.mufg.com<br>**Contact Person:** Shanti Gopalkrishnan<br>**SEBI Registration Number:** INR000004058 |

**COMPANY SECRETARY AND COMPLIANCE OFFICER**
**Nidhi Pradeep Vitonde, SHRIRAM FOOD INDUSTRY LIMITED**
S.No.181/2, 182/1A, 182/2, Marodi, Mauda Tahsil, Nagpur – 441 104, Maharashtra, India. **Telephone:** +91 71229 97067; **Email Id:** cs@shriramfood.com; **Website:** www.shriramfood.com

All capitalized terms used herein and not specifically defined shall have the same meaning as ascribed to them in the DRHP.

For **SHRIRAM FOOD INDUSTRY LIMITED**
On behalf of the Board of Directors
Sd/-
**Nidhi Pradeep Vitonde**
Company Secretary and Compliance Officer

**Place**: Nagpur, Maharashtra
**Date** : September 12, 2025

**SHRIRAM FOOD INDUSTRY LIMITED** is proposing, subject to applicable statutory and regulatory requirements, receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to undertake an initial public offering of its Equity Shares and has filed the DRHP dated September 11, 2025 with SEBI and the Stock Exchanges on September 11, 2025. The DRHP shall be available on the website of SEBI at www.sebi.gov.in, on the websites of the Stock Exchanges i.e., BSE at www.bseindia.com, NSE at www.nseindia.com, on the websites of the BRLM, i.e. Choice Capital Advisors Private Limited at www.choiceindia.com/merchant-investment-banking and the website of our Company at www.shriramfood.com. Potential investors should note that investment in equity shares involves a high degree of risk and for details relating to such risk, see the section titled ***"Risk Factors"*** on page 35 of the DRHP. Potential investors should not rely on the DRHP filed with SEBI for making any investment decision.

This announcement does not constitute an invitation or offer of securities for sale in any jurisdiction, including India. The Equity Shares offered in the Offer have not been, and will not be, registered under the U.S. Securities Act of 1933, as amended ("**U.S. Securities Act**") and shall not be offered or sold within the United States. Accordingly, the Equity Shares are being offered and sold only outside the United States in "offshore transactions" as defined in, and in reliance on, Regulation S under the U.S. Securities Act and the applicable laws of the jurisdictions where those offers and sales are made.

KIRIN ADVISORS

# पुन्हा हिंदी - चिनी भाई भाई

**पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तब्बल सात वर्षानंतर केलेल्या चीनच्या दौऱ्याला देशातील माध्यमांतून मोठी प्रसिध्दी मिळली. चीन व रशियाच्या राष्ट्रप्रमुखांबरोबर झालेल्या भेटींना वृत्तपत्रातून आणि वृत्तवाहिन्यांवर ठळक महत्व दिले गेले. मोदींच्या जपान भेटीपेक्षा चीनच्या भेटीकडे सर्व जगाचे लक्ष होते. तिथे मोदींनी केलेली भाषणे आणि चीनने केलेले त्यांचे आदरातिथ्य बघता दोन देशात पुन्हा जवळीक वाढत असल्याचे दिसले. सत्तर वर्षानंतर पुन्हा हिंदी - चिनी भाई भाई अशा घोषणा ऐकायला मिळतात का, असे वातावरण निर्माण झाले.**

---------------

मोदींना नेहमीच अमेरिकेचे आकर्षण राहिले आहे, अमेरिकेच्या अध्यक्षांबरोबर आपले कसे निकटचे संबंध आहेत हे बोलण्यावागण्यात नेहमी दाखवून देत असत. अमेरिकेत जाऊन मोदींनी अगोदरच्या निवडणुकीत अब की बार ट्रम सरकार अशी घोषणा दिली होती.

आता मात्र गेल्या काही महिन्यांपासून अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यापासून ते अंतर राखून आहेत व त्यांना रशिया व चीन या दोन देशांविषयी जास्त आपुलकी वाटू लागली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर मोठे आयात कर लादलेच पण भारत-पाकिस्तान युध्द आपणच थांबवले अशी फुशारकीही मारली. तेव्हापासून मोदींनी ट्रम्प यांचे नाव घेणेही बंद केले.

पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असताना १९५० च्या दशकात हिंदी- चिनी भाई भाई अशा घोषणांना उधाण आले होते. पण चीनवर विश्वास ठेवणे भारताला कठीण गेले व चीनने १९६२ मधे भारतावर अतिक्रमण करून भारताच्या पाठित खंजीर खुपसला. या युध्दात भारताला चीनकडून पराभव पत्करावा लागला.

चीनने भारताची शेकडो चौरस किमी जमीन बळकावली. बळकावलेल्या जमिनीपैकी एक इंचही जमीन चीनकडून आजतागायत भारताला परत मिळालेली नाही. १९६२ चा भारत आणि २०२५ चा भारत यात जमीन अस्मानाचा फरक आहे. आजही चीन भारतापेक्षा आर्थिक दृष्ट्या ताकदवान आहे आणि संरक्षण सिध्दतेतही अधिक सक्षम व सुसज्ज आहे.

चीनने केवळ भारताचीच नव्हे तर जगातील सर्व प्रमुख देशांची बाजारपेठ काबीज केली आहे. भारत संरक्षण क्षेत्रात शस्त्रसज्ज असला तरी चीनपुढे भारताला बचावात्मक भूमिका घ्यावी लागते हे वास्तव आहे. लडाखचे उदाहरण ताजे आहे. चार पाच वर्षे दोन्ही देशांच्या सैन्यामधे चालू असलेल्या चकमकी आणि ताणतणावानंतर आता मात्र समझौता झाला आहे. भारत चीन सरहद्दीवर आपल्या प्रदेशाचे संरक्षण करण्यासाठी भारतीय सैन्याला बारा महिने चोवीस काळ सतर्क राहावे लागते.

दोन्ही बाजुचे सैन्य दल आणि राजनैतिक पातळीवर तब्बल ३१ बैठका झाल्यानंतर दोन्ही देशांनी आपल्या सीमा रेषांची स्थिती एप्रिल २०२० प्रमाणे कायम ठेवावी असे ठरवले आहे. दोन्ही देशांनी सैन्य मागे घ्यावे असेही ठरले. दोन्ही देशांचे पन्नास हजार सशस्त्र सैन्य, तोफखाने, रणगाडे, गेली काही वर्षे एकमेकांसमोर उभे ठाकल्याने सतत तणावाचे वातावरण होते.

जून २०२० मधे गलवान खोऱ्यात चिनी सैन्याने अचानक केलेल्या हल्लयात वीस भारतीय जवान शहीद झाले. त्यानंतर भारताने केलेल्या प्रतिहल्ल्यात चीनचे पन्नास सैनिक ठार झाले. रशियासह अनेक देशांनी चीनचे सैनिक ठार झाल्याच्या घटनेला दुजोरा दिला. भारत आता संरक्षण व्यवस्थेत खूप पुढे आहे आणि भारताबरोबर युध्द करणे आता सोपे नाही हे चीनला कळून चुकले.

**स्टेटलाईन**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

डोकलाम पठारावरही चिनी सैन्याला हाच अनुभव आला. लडाखच्या सीमेवर झालेल्या चकमकीतही भारतीय सेनेने चीनच्या सैन्याला चांगलाच इंगा दाखवला. युध्दजन्य परिस्थिती ठेऊन भारताची मोठी बाजारपेठ गमावणे चीनला परवडणारे नाही.

सन २०१९ मधे तामिळनाडूतील महाबलीपुरम येथे पंतप्रधान मोदी व चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट झाली. त्यानंतर ब्रिक्स शिखर संमेनाच्या निमित्ताने पुन्हा या नेत्यांत व्दिपक्षीय चर्चा झाली. त्यानंतर दोन्ही देशाच्या सरहद्दीवरचा बर्फ वितळायला सुरूवात झाली. रशिया, चीन व भारत हे तिनही देश ब्रिक्सचे संस्थापक आहेत. या देशात सुसंवाद नसेल तर ब्रिक्सचे जागतिक पातळीवर महत्व कसे वाढणार?

गेल्या काही वर्षात पेगोंग लेक, गलवान, व्हॉट स्प्रिंग, गोगरा आदी ठिकाणांवरून भारत व चीनने आपले सैन्य मागे घेतले आहे. काही संवेदनशील ठिकाणी दोन्ही सैन्यांची गस्त कायम आहे.

मोदी व शी जिनपिंग यांची शांघाय सहयोग परिषदेच्या निमित्ताने नुकतीच भेट झाली असली तरी आजवरचा अनुभव बघता, भारताने चीनवर विश्वास ठेऊन नये आणि हिंदी- चिनी भाईभाई अशा घोषणा देण्याची घाई करू नये असे संरक्षण विषयक विश्लेषकांना वाटते. चीनमधे बेरोजगारी व अर्थव्यवस्था सुदढ ठेवण्याचे मोठे आव्हान त्या देशापुढे आहे डोनाल्ड ट्रम्प यांच्या नवीन टेरिफ धोरणानंतर चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी भारताचा दौरा केला. चिनी उत्पादनांसाठी भारताची बाजारपेठ ही चीनची गरज आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

दुसरीकडे अमेरिकेच्या दबावापुढे भारतालाही चीनबरोबर नाते बळकट करणे गरजेचे आहे. भाजपा व संघ परिवार यांना चीन हा नेहमीच भारताचा शत्रू वाटत राहीला आहे. दिवाळी व सणसुदीला सजावट व झगमगाट करणाऱ्या चिनी वस्तु विकत घेऊ , असे आवाहन करण्यापर्यंत काहींची मजल गेली होती.

काश्मीरमधील पहलगाम येथे दशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांना गोळ्या घालून त्यांची पॉइंट ब्लॅंक हत्या केली, त्यानंतर भारतीय सेनेने ऑपरेशन सिंदूर मोहीम राबवून पाकिस्तानमधे घुसून दहशतवादी तळांवर हल्ले केले. त्या लढाईत पाकिस्तानी सेनेने भारताचे लढाऊ विमान पाडल्याची चर्चा झाली.

पाकिस्तानी सैन्याने चिनी शस्त्रास्त्रे व चिनी तंत्रतज्ञानाचा वापर भारताच्या विरोधात केला. चिनी हत्यारांनी व तंत्रज्ञानाने भारतीय सेनेचे नेमके किती नुकसान झाले याची आकडेवारी पुढे आलेली नाही, म्हणूनच चीनबरोबर संबंध सुधारताना भारताने काळजी घेणेही तितकेच महत्वाचे आहे.

युध्द विराम झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गांधीनगरमधे केलेल्या भाषणात मेक ईंडियाला उत्तेजन दिले पाहिजे व स्वदेशी वस्तु खरेदी केल्या पाहिजेत असे आवाहन केले होते. जास्त नफा मिळतो म्हणून व्यापाऱ्यांनी विदेशी बनावटीच्या वस्तु विकू नयेत, असे सांगताना गणेशात्सावासाठी बारीक डोळ्यांच्या मूर्ती येतील असेही म्हटले होते. थेट नाव न घेता पंतप्रधानांचा रोख चिनी वस्तुंवर होता, हे वेगळे सांगायला नको.

शांघाय सहकार्य परिषदेची (एससीओ) स्थापना सन २००१ मधे झाली. सोळा वर्षानंतर या परिषदेत नंतर भारत व पाकिस्तान सहभागी झाले. एससीओ चे वर्णन मोदींनी सिक्युरिटी, कनेक्टेव्हिटी व अपॉर्चुनिटी अशा शब्दात केले. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ हेही परिषदेला उपस्थित होते.

तियानजिन येथे झालेल्या परिषदेच्या ठरावात २३ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्लयाचा निषेध करण्यात आला. हे भारताचे मोठे यश आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमार पुतीन, चीनचे प्रमुख शी जिपिंग व पंतप्रधान मोदी यांच्या एकत्र भेटीने साऱ्या जगाचे लक्ष वेधले गेले. या तिन नेत्यांच्या जवळकीने अमेरिका नाराज होणार याची तिघांनाही जाणीव आहे. ड्रेगन आणि हत्ती किती जवळ येणार हे नजिकच्या भविष्यातच कळेल.

# सेवानिवृतीच्या उंबरठ्यालगत 'टीईटी' ची सक्ती

शालेय शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी भारत सरकार आणि राज्य सरकार गेल्या काही वर्षांपासून अनेक सुधारणा राबवत आहेत. शालेय शिक्षण विभागाने १३ फेब्रुवारी २०१३ रोजी आदेश काढून प्राथमिक शिक्षकांसाठी 'टीईटी' (शिक्षक पात्रता परीक्षा) बंधनकारक केली. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाने त्यापूर्वी नोकरीला लागलेल्या इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी देखील 'टीईटी' चे बंधन घातले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार प्राथमिक शाळांवरील ज्या शिक्षकांचे वय ५३ वर्षे आहे, त्यांना २ वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण व्हावीच लागणार आहे.

**शब्दस्पर्शी सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ.**
**७०५७१८५४७९**

'टीईटी' परिक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय सेवेत राहू शकत नाही किंवा पदोन्नतीही मिळवू शकत नाही. अन्यथा सदर शिक्षकांना सेवानिवृत्ती स्वीकारावी लागेल. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची पात्रता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शिक्षकांना 'टीईटी' उत्तीर्ण होणे अपरिहार्य आहे. मात्र, बालशिक्षण हक्क कायदा २००९ पूर्वी नियुक्त झालेले शिक्षक आणि पाच वर्षापेक्षा कमी सेवा शिल्लक असलेल्या शिक्षकांना टीईटीतून वगळले आहे. राज्यात ५३ वर्षांवरील अंदाजे १ लाख ४९ हजार शिक्षक आहेत.

प्राथमिक शाळांवरील ५३ वर्षांपर्यंतच्या सर्वच शिक्षकांनी २ वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण करावी, अन्यथा त्यांच्यावर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कार्यवाही करावी, असेही आदेश आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे महाराष्ट्रच नव्हे, तर उत्तरप्रदेश, पश्चिम बंगालसह बहुतेक राज्य सरकारपुढे पेच निर्माण झाला आहे. शालेय शिक्षण विभागाने शासनाला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे.

दुसरीकडे शिक्षकांमध्ये संभ्रम असून २५-३० वर्षांपासून शाळेत सेवा देणा-या आणि वयाची पन्नाशी पार केलेल्या शिक्षकांना ही परिस्थिती मोठी धक्का देणारी आहे. शिक्षकांच्या जीवनात निवृत्तीपूर्व काळ शांततेने घालवण्याचा असतो. पण आता ५३ वर्षे वय असलेल्या शिक्षकांसाठी 'टीईटी' मोठं आवाहन बनले आहे.

त्यांच्या नातवंडांसोबतच त्यांनाही अभ्यास करून परीक्षा द्यावी लागेल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शिवाय, शासनाने फक्त दोनच संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. राज्यात प्राथमिक शाळांची संख्या ६५ हजार ८० तर उच्च प्राथमिक शाळांची संख्या २२ हजार ३६० इतकी आहे.

या शाळांवर सुमारे ४.०९ लाख शिक्षक असून त्यातील २०१३ पूर्वीच्या सर्व शिक्षकांना (ज्यांचे वय ५३ वर्षांपर्यंत आहे असे) देखील 'टीईटी' उत्तीर्ण व्हावी लागणार आहे. प्राथमिक शिक्षकांसाठी सर्वोच्च न्यायालयाने 'टीईटी' बंधनकारक असल्याचा निकाल दिला आहे. ११० पानांचा तो आदेश असून त्यावर अभ्यास करून शासनाकडून आदेश प्राप्त होतील. त्यानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. परंतु फेब्रुवारी २०१३ पूर्वीच्या शिक्षक सेवेत त्यांना ही अट व शर्त लागू नव्हती. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर महाराष्ट्र शासन आपले म्हणणे सादर करेल, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे शिक्षकांची पदोन्नती आता 'टीईटी' वरच आहे. शिक्षण सेवकांना ३ वर्षानंतर उपशिक्षक म्हणून संधी मिळते. त्यानंर सहशिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक आणि पुढे देखील पदोन्नती मिळतात. पदोन्नतीच्या प्रत्येक टप्प्यावर 'टीईटी' ची अट घालण्यात आल्याने सेवाज्येष्ठ शिक्षकांऐवजी 'टीईटी' उत्तीर्ण असणारे ज्युनिअर शिक्षक मुख्याध्यापक होणार आहे. यामुळे शिक्षकांमध्ये अस्वस्थता आणि नाराजी आहे.

अनेक शिक्षक संघटनांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, दीर्घकाळ सेवा दिलेल्या शिक्षकांना अशा प्रकारे परीक्षा द्यायला लावणे अन्यायकारक आहे. तसेच, फक्त दोनच संधी देण्यात आल्याने शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही संघटनांनी या निर्णयावर पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे.

आता शासन त्यावर धोरण ठरवणार आहे. त्यानुसार परीक्षेचे वेळापत्रक, अभ्यासक्रम आणि मार्गदर्शक सूचना दिल्या जातील. परंतु शिक्षकांना भीती आहे की, वय झाल्यामुळे अभ्यास पुन्हा करणे कठीण जाईल. यामुळे अनेकांना सक्तीची सेवानिवृत्ती घ्यावी लागू शकते.

अनेक शिक्षकांनी २५-३० वर्षे सेवा करून आता फक्त काहीच वर्षे निवृत्तीपर्यंत उरली आहेत. त्यांच्या मते, इतक्या वर्षांच्या अनुभवाकडे दुर्लक्ष करून अचानक परीक्षा लावणे अन्यायकारक आहे. शिक्षक संघटनांचा दावा आहे की, अनुभव आणि अध्यापन कौशल्याला महत्त्व द्यावे, केवळ टीईटीला नाही.

सरकार आणि सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे आहे की, या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगले शिक्षण मिळेल. प्रत्येक शिक्षकाला पात्रता सिद्ध करावी लागेल. त्यामुळे भविष्यात शिक्षणाची पातळी उंचावेल.

परंतु दुसरीकडे, अनुभवी शिक्षक नापास झाल्यास त्यांच्या जागी कमी अनुभव असलेले शिक्षक प्रमुख होतील, हा एक वेगळा धोका आहे. एकीकडे शिक्षणाची गुणवत्ता वाढेल, पण दुसरीकडे वृद्ध शिक्षकांसाठी ही परीक्षा मोठं आवाहन ठरणार आहे. शासनाने याबाबत संतुलित निर्णय घेऊन शिक्षकांना योग्य मदत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

# स्वरयोगिनी डॉ प्रभा अत्रे!

किराणा घराण्याच्या जेष्ठ गायिका, ज्यांनी आपल्या गायन कलेने शास्त्रीय संगीताला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले त्या स्वरयोगिनी डॉ प्रभा अत्रे यांची आज जयंती.

मागील वर्षीच १३ जानेवारी २०२४ रोजी त्यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. १३ सप्टेंबर १९३२ रोजी पुण्यात जन्मलेल्या प्रभा अत्रे यांच्या घरची परिस्थिती बेताचीच होती तरीही त्यांनी शास्त्र पदवी घेऊन कायद्याचे शिक्षण घेतले. संगीत क्षेत्रात त्या अपघातानेच आल्या.

सुरवातीच्या काळात विजय करंदीकर यांच्याकडून त्यांना रागाचा परिचय झाला पुढे जेष्ठ गायिका हिराबाई बडोदेकर व त्यांचे बंधू सुरेशबाबू माने यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेऊन त्यांनी गायनाला सुरवात केली.

ख्याल गायकीसह ठुमरी, दादरा, गझल, उपशास्त्रीय संगीत, नाट्य संगीत, भजन व भावगीत यांवर त्यांचे प्रभुत्व होते. आपल्या कार्यक्रमात त्या अनेकदा स्वतः रचलेल्या बंदिशी गात. त्यांनी स्वतःच्या स्वतंत्र शैलीत संगीतातील नवे राग निर्माण केले.

शास्त्रीय संगीताचा जगभर प्रसार व्हावा म्हणून त्यांनी डॉ प्रभा अत्रे फाऊंडेशनची स्थापना केली. या फाऊंडेशनच्या मार्फत त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीताचा जगभर प्रचार केला. भारतीय शास्त्रीय संगीताचा जगभर प्रसार करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

डॉ प्रभा अत्रे फाऊंडेशन स्थापना आणि पुणे येथे स्वरमय गुरुकुलची स्थापना करून त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. मार्गदर्शन केले. त्यांच्या अनेक शिष्यांनी पुढे संगीतात स्वतः चे स्थान निर्माण केले. त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी संगीत कलेत डॉक्टरेट पदवी मिळवली आहे.

त्यांनी आकाशवाणी पुणे व नागपूर केंद्राच्या संगीत विभाग प्रमुख म्हणून त्यांनी काही काळ नोकरी केली. त्यानंतर एस एन डी टी विद्यापीठाच्या संगीत विभागाच्या प्रमुख म्हणूनही जवळपास दहा वर्ष त्या कार्यरत होत्या.

डॉ प्रभा अत्रे या केवळ शास्त्रीय गायिका नव्हत्या तर त्या संगीत रचनाकार, लेखिका, प्राध्यापिका आणि विदुषीही होत्या. त्यांनी इंग्रजी व हिंदी भाषेत संगीतावर अनेक पुस्तके लिहिली आहेत.आपल्या सांगीतिक प्रवासाचे वर्णन त्यांनी त्यांच्या स्वरमयी या आत्मचरित्रात केले आहे. त्यांनी जवळपास दोनशेच्या वर बंदिशी लिहिल्या असून स्वरांगी, अंतस्वर ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

त्यांनी जवळपास ११ पुस्तके प्रकाशित केली आहेत. प्रभा अत्रे यांनी आपले संपूर्ण आयुष्य शास्त्रीय संगीताचा प्रचार आणि प्रसार करण्यात घालवले. त्यांच्या संगीत कलेची दखल घेऊन त्यांना अनेक संस्थांनी पुरस्कार देऊन गौरविले आहे.

आचार्य अत्रे संगीत अवॉर्ड, पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचा पुरस्कार, मुंबई दूरदर्शनचा स्वरत्न पुरस्कार, मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर पुरस्कार, दीनानाथ मंगेशकर पुरस्कार असे विविध मानाचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**


भारत सरकारनेही त्यांना पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण हे तिन्ही मानाचे पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने शास्त्रीय संगीताचे एक आयाम संपला आहे. स्वर योगिनी डॉ प्रभा अत्रे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# नवनेपाळची निर्मिती शक्य आहे का?

नेपाळमधील २४० वर्षांची राजेशाही मे २००८ मध्ये संपुष्टात आली. मात्र २००८ नंतर नेपाळला राजकीय स्थिरता कधीच लाभली नाही.गेल्या १७ वर्षांत नेपाळने १४ सरकारे पाहिली. त्यातील एकाही सरकारने पाच वर्षांची मुदत पूर्ण केली नाही.

नेपाळ मधील तीन प्रमुख राजकीय नेते, पुष्प कमल दहल (प्रचंड) के. पी. ओली आणि शेर बहादूर देऊबा हे गेल्या १७ वर्षांत आलटून पालटून सत्तेवर आले. या तिन्ही नेत्यांची राजकीय विचारसरणी वेगळी असली तरी त्यांनी सरकार स्थापन करण्यासाठी एकमेकांना मदत केली.सत्ता काबीज करण्यासाठी त्यांनी आपली विचारसरणी गुंडाळून ठेवली आणि एकप्रकारे मतदारांची फसवणूक केली.भ्रष्टाचाराच्या बाबतीत त्यांच्यात डावे उजवे असे काही नव्हते.

या भ्रष्टाचारी नेत्यांबाबत आणि त्यांच्या साथीदारांबाबत नेपाळी जनतेमध्ये असंतोष होताच परंतु तो बाहेर आला नव्हता. साधारण दोन महिन्यांपूर्वी त्या असंतोषाची बारीक? ठिणगी पडली. दोन महिन्यांपूर्वी नेपाळमध्ये फेसबुक पेजेसवर काही पोस्ट टाकण्यात आल्या होत्या. त्यांचा विषय होता, नेपाळमधील राजकीय अस्थिरता आणि वाढता भ्रष्टाचार. त्यातील एका पेजच नांव होते 'नेक्स्ट जनरेशन नेपाळ' या पोस्ट्स टाकणारे युवक साधारणपणे १९९६ ते २०१२ या काळात जन्मलेले असावेत. ते 'जनरेशन झेड' किंवा 'जेन झेड' या नावाने ओळखले जाऊ लागले. हे युवक आपला राग भ्रष्ट राजकारणी, राजकीय व्यवस्था यांच्या विरोधात फेसबुकच्या माध्यमातून व्यक्त करत होते.



**अभय गोखले**

वरिष्ठ राजकीय नेत्यांची मुले ज्याप्रकारे उधळपट्टी करतात आणि त्यांची महागडी लाईफस्टाईल यावर त्या युवकांच्या टिकेचा रोख होता. त्या मुलांचा उल्लेख त्यांनी ' नेपो बेबीज ' आणि नेपो किड्स, (नेपो म्हणजे नेपोटिझम) असा केला होता. अर्थात या प्रकरणी ठिणगी पडली ती सरकारने जेव्हा फेसबुक, व्हॉट्स अॅप, इन्स्टाग्राम, यु ट्यूब इत्यादी २६ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बंदी घातली तेंव्हा. सरकारने त्याकरता असे कारण दिले की या अॅप्सनी दिलेल्या मुदतीत नेपाळच्या माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडे आपली नोंदणी केली नाही.

मात्र जे युवक या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट्स टाकून सरकार विरोधातील आपला राग व्यक्त करत होते, त्यांचा असा समज झाला की आपली मुस्कटदाबी करण्यासाठीच अॅप्सवर बंदी घातली. त्यांचा तो समज काही अंशी खराही असेल.

अॅप्सवर बंदी घातल्यानंतर, युवकांमधील असंतोषाच्या ठिणगीचे रूपांतर वणव्यात झाले. सरकारविरोधात निदर्शने करण्यासाठी युवक रस्त्यावर उतरले. संसद भवनाच्या दिशेने युवकांना मोर्चा काढायचा होता. सुरूवातीला युवकांनी सोशल मीडियावरील बंदी उठवण्याची मागणी केली होती. नंतर सरकारने ती मागणी मान्यही केली. परंतु दरम्यान युवकांनी केलेल्या हिंसक आंदोलनात नेपाळ मधील सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

भ्रष्टाचार, सामाजिक असमानता आणि बेरोजगारी या विरोधात युवकांच्या मनात खदखदणाऱ्या असंतोषाचे रूपांतर हिंसक आंदोलनात झाले आणि ते आंदोलन आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात काही युवक मारले गेल्याने आंदोलन आणखीनच चिघळले.

युवकांनी राजकारण्यांवरील आपला संताप व्यक्त करण्यासाठी, ते कोणत्या राजकीय पक्षाचे आहेत,हे न पाहता त्यांच्यावर हल्ले केले. या हल्ल्यांत पंतप्रधान, माजी पंतप्रधान, सरकार मधील मंत्री हेही सुटले नाहीत. हे हल्ले इतके तिव्र होते की, लष्कराला काही नेत्यांची सुटका हेलिकॉप्टरच्या सहाय्याने करावी लागली. संतापलेल्या युवकांच्या जमावाने संसद भवन, उच्च न्यायालयाच्या इमारत,सरकारी कार्यालये, निरनिराळ्या राजकीय पक्षांची कार्यालये यांच्यावर हल्ला करून नुकसान केले.

पंतप्रधान के. पी. ओली, माजी पंतप्रधान पुष्प कमल दहल, माधव कुमार नेपाळ, झलानाथ खनाल आणि शेर बहादूर देऊबा या नेत्यांच्या घरांवर हल्ला करून त्यांनी तेथे मोठ्या प्रमाणात मोडतोड केली. काही नेत्यांचा पाठलाग करून, त्यांना मारहाण करण्यात आली. शेवटी लष्कराने त्यांची कशीबशी सुटका केली.आम्हाला डेन्मार्क प्रमाणे नेपाळला भ्रष्टाचारमुक्त करायचे आहे, असे युवकांचे म्हणणे आहे.

लष्कराने दंगल आटोक्यात आणली. आता पुढे काय? नेपाळी जनतेचा राजकीय पक्ष आणि राजकारणी यांच्यावरील विश्वास पूर्णपणे उडाला आहे. परंतु त्यांना पूर्णपणे बाजुला सारणे शक्य होईल का? लष्कराने पुढाकार घेऊन आंदोलन करणाऱ्या युवा नेत्यांशी चर्चा करून या प्रकरणी मार्ग काढला येईल. नेपाळमध्ये अंतरिम सरकार स्थापन करून, परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर नव्याने निवडणुका घेता येतील. अर्थात अंतरिम सरकारचा प्रयोग बांगलादेशमध्ये फसलेला दिसतोय. बांगलादेश मधील प्रमुख राजकीय पक्ष अंतरिम सरकारवर नाराज आहेत.

नेपाळच्या सर्वात मोठी समस्या ही आहे की कोणताही राजकीय पक्ष सत्तेवर आला तरी तो स्थिर सरकार देऊ शकत नाही.त्यामुळे नव्याने निवडणुका घेतल्या तरी,जो पक्ष अथवा आघाडी सत्तेवर येईल,तो स्थिर सरकार देऊ शकेल याची खात्री देता येणार नाही.

नेपाळी युवकांच्या सरकारकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत. देशात पुरेसा रोजगार उपलब्ध नसल्याने नेपाळी युवकांना परदेशी जाऊन रोजगार मिळवावा लागत आहे. आपल्या कुटुंबापासून महिनोन्महिने लांब रहावे लागत आहे. त्यांना स्वदेशात रोजगार हवा आहे. अर्थात नेपाळची भौगोलिक स्थिती पहाता तेथे प्रकल्प उभारण्यात बऱ्याच अडचणी आहेत.

नेपाळची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने पर्यटनापासून मिळणारे उत्पन्न आणि परदेशात नोकरी करणारे नेपाळी लोक जो पैसा नेपाळमधील आपल्या कुटुंबाला पाठवतात त्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. आंदोलनात भाग घेतलेल्या युवकांना नवनेपाळची निर्मिती करायची आहे. प्रस्थापित राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते या बाबतीत अडसर तर ठरणार नाहीत ना, हे पाहणे अतिशय महत्त्वाचे आहे. ■ ■ ■

# सत्यासाठी निर्भय जीवनाची आवश्यकता!

**उत्तरार्ध**

**गजानन कुसुम ओंकार हरणे**
**खडकी, अकोला.**
**9822942623**

समाजाला देशोन्नतीच्या मार्गावर नेण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या जीवनात सत्य, प्रामाणिकपणा आणि सदाचार अंगीकारणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्ती जर स्वतःच्या आचरणात पारदर्शकता ठेवली, तर भ्रष्टाचार, अन्याय, हिंसा यांसारखी समाजाची जखम आपोआप भरुन येईल.

**निर्भय जीवनाचा संदेश**

सत्यासाठी जगणे म्हणजे निर्भयपणे जगणे. कारण सत्याच्या मार्गावर चालणाऱ्याला कुठल्याही संकटाची भीती वाटत नाही. जसा सिंह जंगलात निर्भयपणे गर्जतो, तसा सत्यवादी व्यक्ती समाजात निडरपणे उभा राहतो.

सत्य परेशान हो सकता है, लेकिन पराजित नहीं हे वचन हे जीवनाचे ब्रीदवाक्य असले पाहिजे. संकटे आली तरी सत्याचा मार्ग धरलेला असेल तर विजय आपोआपच आपल्या पायाशी येतो.

सदाचाराशिवाय जीवन म्हणजे देहाशिवाय आत्मा. दुष्टपणाने मिळणारे सुख हे तात्पुरते असते, पण सज्जनतेने मिळणारे सुख हे शाश्वत असते. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या जीवनात सदाचाराचा दीप प्रज्वलित केला पाहिजे.

निर्भयपणे जगा? सत्यासाठी जगा, कारण सत्य हीच खरी शक्ती आहे, सदाचार हीच खरी संपत्ती आहे, आणि मानसिक शांती हाच खरा आनंद आहे. जीवनातले हे तीन रत्न ज्या कोणाला मिळाले, तोच ख?या अर्थान धन्य ठरतो. ■ ■ ■

# देशात राहून देश विरोधी मानसिकता बदलण्याची गरज

**वाचक लिहितात**

श्रीनगर येथील हजरत बल दर्ग्याचे नुकतेच नूतनीकरण करण्यात आले या नूतनीकरण उदघाटनाच्या दृष्टीने येथे एक शीलापट करण्यात आला या शीलापटावर अशोक स्तंभ असल्यामुळे येथे वाद निर्माण झाला. तेव्हा तेथे जमलेल्या मुसलमानांनी दगडाने या अशोक स्तंभाच्या आकृतीवर प्रहार करत त्याची मोडतोड केली. यावेळी त्यांनी 'नारा ए तकबीर अल्लाहू अकबर म्हणजेच ( अल्ला महान आहे ) अशा घोषणा दिल्या.

प्रथम मुसलमान पुरुषांच्या जमावाने दगडाने प्रहार केला आणि नंतर मुसलमान स्त्रियांच्या जमावाने अशोक स्तंभाची मोडतोड केली. मशीद मध्ये कोणताही पुतळा नको अशी मुसलमानांमध्ये धार्मिक मान्यता असल्यामुळे अशोक स्तंभ प्रदर्शित झाल्याने मुसलमानांचा जमाव प्रक्षुद झाला व अशोक स्तंभाची मोडतोड केली त्यांच्या या कृतीला काश्मीरमधील मुख्यमंत्री होमर अब्दुल्ला आणि इतर नेत्यांनी त्याला पाठिंबा दर्शविला. या दर्ग्याचे नूतनीकरण सर्व लोकांच्या कराच्या पैशातूनच केले गेले आहे.

अशोक स्तंभ हे राष्ट्रीय स्मारक आहे ते कुठल्याही धर्माचे प्रतीक नाही त्याचा मान ठेवणे सर्वांचे संविधानिक कर्तव्य आहे. धर्मनिरपेक्ष भारतात भगव्या झेंड्यावर, तिरंग्यावर इस्लाम जिंदाबाद किंवा अशोक चक्राच्या जागी उर्दूतील अक्षरे लिहिणे, हिंदूंच्या सणांच्या मिरवणुकीवर दगडफेक करणे, मंदिरांची तोडफोड करणे तसेच गौरवशाली इतिहासाच्या प्रतीकांवर अतिक्रमण करून मजार, दर्गे बांधणे असे प्रकार सध्या खूप दिसून येतात.

मुसलमानांसाठी हजरत बाल दर्गा श्रद्धेचे स्थान आहे त्याचप्रमाणे अन्यधर्मीयांना पण त्यांच्या श्रद्धेचे स्थाने, प्रतीके असल्याचा अभिमान आहे . पण इस्लाम मध्ये मूर्तिपूजन नसल्याने जे काही होते ते सगळे इस्लामच्या विरोधात आहे असे समजून त्यावर विरोध केला जातो.

त्यामुळे प्रत्येक सण मग तो हिंदूंचा असो मुसलमानांचा कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी हजारो लाखो रुपये खर्च करावे लागतात. मनुष्यबळ ही खूप लागते. प्रत्येकाने जर आपल्या धमार्चे पालन आपल्या घरातच केले आणि समाज, देश सर्वांचा आहे त्यामुळे राष्ट्रीय संपत्ती, प्रतीके यावर हल्ला केला नाही तर भारत परत एकदा सुजलाम सुफलाम होण्यास वेळ लागणार नाही

■ **लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.**

# या लोकांनी चुकूनही अननस खाऊ नये





फळे आपल्या आरोग्यासाठी नेहमीच चांगली असतात. पण काहीजणांसाठी सगळीच फळे फायदेशीर असतात, त्यांना फायदा होण्याऐवजी नुकसान होऊ शकतं. जसं की अननस. अननसाची चव अनेकांना आवडते. आजकाल वजन कमी करण्यासाठी अननस अनेकांना खायला आवडते. यासोबतच अननसात व्हिटॅमिन सी, मॅंगनीज, अँटीऑक्सिडंट्स आणि पाचक एंजाइम असतात. त्यामुळे हे फळ रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास, पचनक्रियेत मदत करण्यास, जळजळ कमी करण्यास मदत करते.

**कोणत्या लोकांनी अननस खाऊ नये**

अननस प्रत्येकासाठी फायदेशीर असेलच असे नाही. खरं तर, अननसात असलेले ब्रोमेलेन, ऑरगॅनिक अ‍ॅसिड आणि नैसर्गिक साखर काही लोकांसाठी नुकसानकारक ठरू शकतं.

**अ‍ॅलर्जी असलेले लोक**

अननसात ब्रोमेलेन हे एंजाइम असते जे प्रथिने तोडून पचनक्रियेत मदत करते. परंतु ब्रोमेलेन पचनक्रियेत आणि जळजळ कमी करण्यास मदत करत असले तरी, काही विशिष्ट लक्षणे असलेल्या लोकांना त्याची अ‍ॅलर्जी होण्याचा धोका असतो.

**अननसाचे हानिकारक परिणाम**

ज्या लोकांना पोटदुखी आणि उलट्या होण्याचा त्रास असतो. ज्या लोकांना आधीच अंगावर येणाऱ्या पित्ताचा त्रास होत असेल तसेच त्वचेवर पुरळ येत असतील तर त्यांनी अननस अजिबात खाऊ नये.

कारण अननस खाल्ल्याने त्यांना तोंड आणि ओठांभोवती खाज सुटण्याची शक्यता असते.

ज्या लोकांना दमा, अ‍ॅटोपिक डर्माटायटीस किंवा फूड अ‍ॅलर्जी आहे, जर अशा लोकांनी अननस खाल्ले तर त्यांना लगेच रिअ‍ॅक्शन होऊ शकते

**मधुमेही रुग्णांनी खाऊ नये**

अननसात नैसर्गिक साखरेचे प्रमाण खूप जास्त असते. जर असे लोक अननस खाल्ले तर त्यांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण वाढण्याचा धोका असतो. वजन वाढण्याचा आणि लठ्ठपणाचा धोका असतो. त्यामुळे मधुमेह असलेल्या लोकांनी अननस खाऊ नये.

**उच्च रक्तदाब** : जर अननस जास्त प्रमाणात खाल्ले तर रक्तदाब नियंत्रित करणे कठीण होते. काही लोक डोकेदुखी आणि चक्कर येण्याची तक्रार करतात. चेह?यावर लालसरपणा येण्याची शक्यता असते. त्यामुळे उच्च रक्तदाब असलेल्यांनी देखील खाऊ नये.

**दातांच्या समस्या** : ज्या लोकांना दातांच्या समस्या आहेत त्यांनीही अननस खाऊ नये. ब्रोमेलेन एन्झाइम तोंडाच्या पोकळीला त्रास देऊ शकते. त्यामुळे हिरड्यांमध्ये सूज येते, दातांमध्ये अल्सर आणि संवेदनशीलता येते.

**ज्यांना पचनक्रिया खराब आहे** : ज्या लोकांना गॅस्ट्रिक, अल्सर, अ‍ॅसिड रिफ्लक्सची समस्या आहे, त्यांना अननस खाल्ल्याने पोटात अस्वस्थता, छातीत जळजळ, सूज, पोटाच्या आतील भागात वेदना होतात. सतत अपचनाचा त्रास होत असतो त्यांनी अननस खाऊ नये. ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## अविचारी कृती

**मोर्चा असो की संप**
**कायदा घेतात हाती**
**सार्वजनिक संपत्तीची**
**करतात हे माती...!**

**सार्वजनिक मालमत्ता**
**जनतेची असते**
**त्याची मोडतोड जाळपोळ**
**कोणत्या तत्वात बसते?..**

**नेपाळी जनतेचा उद्रेक**
**डोळ्यासमोर आहे**
**नव्या शासकांना तर**
**पुनर्निर्माण करणेच आहे!**

# दत्ता मेघे मेडिकल कॉलेजने आयोजित केली युनिक नॅशनल इंटिग्रेटेड शवविच्छेदन कार्यशाळा

**नागपूर, १२ सप्टेंबर :** दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डिम्ड टू बी युनिव्हर्सिटी), ऑफ कॅम्पस, नागपूरचा भाग असलेल्या दत्ता मेघे मेडिकल कॉलेजच्या फॉरेन्सिक मेडिसिन अँड टॉक्सिकॉलॉजी विभाग आणि पॅथॉलॉजी विभागाने अलीकडेच संयुक्तपणे ब्रिजिंग द मॅक्रोस्कोपिक आणि मायक्रोस्कोपिक: प्रॅक्टिकल इनसाइट्स फ्रॉम ऑर्गन डिसेक्शन टू हिस्टोपॅथॉलॉजी या शीर्षकाची राष्ट्रीय एकात्मिक कार्यशाळेचे आयोजन केले होते.

कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात डॉ. अनुप मरार (डायरेक्टर, दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च ऑफ कॅम्पस), डॉ. उज्वल गजबे (डीन) आणि डॉ. बी. आर. सिंह (व्हाइस डीन) उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश मोहिते (प्रोफेसर आणि हेड, एफएमटी) आणि डॉ. प्रतिभा दावंडे (प्रोफेसर आणि हेड, पॅथॉलॉजी) यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि या कार्यशाळेच्या माध्यमातून विविध विभागांमध्ये सहकार्य घडवून आणण्याच्या अनोख्या दृष्टीकोनावर भर दिला.

या शैक्षणिक चर्चा नामवंत वक्त्यांच्या उपस्थितीत अधिक समृद्ध झाल्या. त्यामध्ये डॉ. आशिष वानखेडे (प्रोफेसर आणि हेड, जीएमसी जगदलपूर), डॉ. शैलेन्द्र धवणे (जीएमसी नागपूर), डॉ. ऋषिकेश पाठक (जीएमसी नागपूर) आणि डॉ. काजल हातगावकर (डीएमएमसी, नागपूर) यांचा समावेश होता. त्यांच्या सत्रांमधून व्यावहारिक माहिती आणि नवीन अपडेट्स मिळाले. डॉ. समीर गोलावार (ॲसोसिएट प्रोफेसर, कम्युनिटी मेडिसिन विभाग, जीएमसी) यांनी एमएमसी निरीक्षक म्हणून काम पाहिले आणि कार्यक्रमाला व्यावसायिक दृष्टिकोनातून अधिक मूल्य आणि मार्गदर्शन दिले.

या कार्यक्रमाला अनेक वरिष्ठ प्रख्यात प्राध्यापकांची उपस्थिती लाभली. त्यामध्ये डॉ. अनिल अंजनकर (माजी रजिस्ट्रार, डीएमआयएचईआर), डॉ. अजय केओलिया, डॉ. विपुल अंबाडे, डॉ. सतीन मेश्राम, डॉ. शरद कुचेवार, डॉ. सुधीर निनावे, डॉ. ए. मुखर्जी आणि डॉ. मिलिंद भातकुले यांचा समावेश होता. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिक वाढली आणि अशा आंतरशाखीय उपक्रमांना संस्थेचे भक्कम पाठबळ असल्याचेही स्पष्ट झाले.

आयोजन समितीत डॉ. शिवानंद कर्माकर, डॉ. राजेश चिंतलवार, डॉ. संदीप इंगळे, डॉ. अशोक जीवाने, डॉ. मिलिंद पांडे, डॉ. शिरीष मोदी आणि डॉ. रचना रेड्डी यांचा समावेश होता. त्यांनी कार्यशाळेच्या सर्व बाबी अत्यंत काटेकोरपणे व्यवस्थापित केल्या. कार्यक्रमाचा समारोप डॉ. संदीप इंगळे यांनी आभार प्रदर्शनाने केला. त्यांनी वक्ते, मान्यवर, सहभागी आणि संपूर्ण टीमचे मनापासून आभार मानले आणि या कार्यशाळेला यशस्वी करण्यासाठी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले.

वैद्यकीय शिक्षण आणि वैद्यकीय-कायदेशीर प्रशिक्षणातील दीर्घकाळापासून जाणवत असलेली पोकळी भरून काढत या एकात्मिक कार्यशाळेने केवळ शैक्षणिक ज्ञान समृद्ध केले नाही, तर भविष्यात पॅथॉलॉजी आणि फॉरेन्सिक मेडिसिन या दोन शाखांमधील राष्ट्रीय स्तरावरील सहकार्यासाठी एक नवा आदर्श निर्माण केला. यातून हे अधोरेखित झाले की, तरुण व्यावसायिकांची क्षमता वाढवण्यासाठी आणि वैद्यकीय-कायदेशीर क्षेत्रातील आंतरशाखीय सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी नियमित, संरचित आणि व्यावहारिक कार्यशाळांची आवश्यकता आहे.

# सॅमसंग टीव्ही प्लसवर ईटीव्ही नेटवर्कचे चार नवीन चैनल, मनोरंजन झाले आणखी मजेदार

**नागपूर, १२ सप्टेंबर :** सॅमसंग टीव्ही प्लस, भारतात उपलब्ध फ्री ॲड-सपोर्टेड स्ट्रीमिंग टीव्ही सेवा, ने आपल्या कंटेंट पोर्टफोलिओमध्ये ईनाडू टेलिव्हिजन (ईटीव्ही नेटवर्क) चे चार नवीन चैनल्स समाविष्ट केल्याची घोषणा केली आहे. या भागीदारीमुळे, सॅमसंग टीव्ही प्लसच्या मजबूत कॅटलॉगमध्ये आता १५० पेक्षा जास्त फ्री ॲड-सपोर्टेड स्ट्रीमिंग टीव्ही चैनल्स आहेत, जे भारतीय प्रेक्षकांना विविध आणि उच्च दर्जाचा नवीन मनोरंजन अनुभव देतील.

सॅमसंग टीव्ही प्लस मध्ये साउथईस्ट एशिया आणि भारतातील बिझनेस डेव्हलपमेंटचे जनरल मॅनेजर कुणाल मेहता यांनी सांगितले, आमचा उद्देश प्रेक्षकांना आणि जाहिरातदारांना सॅमसंग टीव्ही प्लस प्लॅटफॉर्मवर उत्तम प्रवेश आणि सर्वोत्तम अनुभव देणे आहे. ईटीव्ही नेटवर्कचे नवीन फ्री ॲड-सपोर्टेड स्ट्रीमिंग टीव्ही चैनल्स जोडून आम्ही दक्षिण भारतातील प्रेक्षकांपर्यंत आपली पोहोच अधिक मजबूत करू इच्छितो, जेणेकरून त्यांना तेलुगु मनोरंजनातील नवीन कंटेंट सहज मिळू शकेल. ही भागीदारी आमच्या या दृष्टीकोनाला अधिक बळकटी देते.

ईनाडू टेलिव्हिजन प्रा. लि. चे सीईओ के. बापिनीडु म्हणाले, ईटीव्ही नेटवर्कमध्ये आमचा उद्देश नेहमीच विविध आणि उच्च दर्जाचे मनोरंजन प्रेक्षकांसमोर सादर करणे आहे, जे प्रत्येक वयोगटातील प्रेक्षकांना आकर्षित करेल. कनेक्टेड टीव्हीच्या वाढत्या लोकप्रियतेला लक्षात घेऊन, आम्ही सॅमसंग टीव्ही प्लसवर आपल्या चार नवीन फ्री ॲड-सपोर्टेड स्ट्रीमिंग टीव्ही चैनल्स (ईटीव्ही न्यूज, ईटीव्ही जोश, ईटीव्ही म्युझिक आणि ईटीव्ही कॉमेडी) लॉन्च करून आपली डिजिटल उपस्थिती अधिक मजबूत करत आहोत. आमची कंटेंट-फर्स्ट धोरण नेहमी प्रेक्षकांच्या बदलत्या आवडीनिवडींचा विचार करून सतत नवकल्पना, परीक्षण आणि सुधारणा यावर लक्ष केंद्रित करते. सॅमसंग टीव्ही प्लससोबतची ही साझेदारी आम्हाला वैयक्तिक आणि क्यूरेटेड कंटेंट प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याची उत्तम संधी देते.

## यूटीआय फ्लेक्सी कॅप फंड व्यवसायाच्या शाश्वततेवर भर देणारा फ्लेक्सी-कॅप पोर्टफोलिओ

**मुंबई, १२ सप्टेंबर :** यशस्वी गुंतवणूक म्हणजे कोणत्याही गुंतवणूकदारासाठी वास्तववादी आर्थिक ध्येय निश्चित करणे होय. तुम्हाला सातत्याने फायदेशीर ठरेल असा गुंतवणूक पर्याय शोधणे महत्त्वाचे असले तरी, अपेक्षित दीर्घकालीन परिणामासाठी त्याच्याशी संबंधित जोखीम समजून घेणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. अल्पकालीन ते दीर्घकालीन अशा आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी म्युच्युअल फंडातील तसे पर्याय शोधता येतात. दीर्घकालीन संपत्ती निर्मितीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी गुंतवणूकदार निवडू शकतात असा एक म्युच्युअल फंडाचा पर्याय येथे दिला आहे.

फ्लेक्सी-कॅप फंड हे ओपन-एंडेड इक्विटी फंड आहेत जे एकूण मालमत्तेपैकी किमान ६५% गुंतवणूक लार्ज-कॅप, मिड-कॅप किंवा स्मॉल-कॅप फंड अशा विविध पर्यायांमध्ये करतात. या श्रेणीतील यूटीआय फ्लेक्सी कॅप फंड हा सर्वात जुना फंड आहे (१९९२ मध्ये सुरुवात) आणि सातत्यपूर्ण कामगिरीचा त्याचा दीर्घकालीन ट्रॅक रेकॉर्ड आहे. या फंडाचे भांडवल २५,५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे (३१ ऑगस्ट २०२५ रोजी). गुंतवणूकदारांना उत्तम परतावा मिळवून देण्याची क्षमता असलेल्या दर्जेदार व्यवसायांमध्ये गुंतवणूक करण्याची इच्छा असणाऱ्या कोणत्याही गुंतवणूकदारासाठी यूटीआय म्युच्युअल फंडाची ही ऑफर अत्यंत योग्य आहे.

यूटीआय फ्लेक्सी कॅप फंडाची गुंतवणूक ही प्रामुख्याने गुणवत्ता, वाढ आणि मूल्यांकन या तीन महत्त्वाच्या स्तंभांवर आधारलेली आहे. पोर्टफोलिओसाठी अशा व्यवसायांवर लक्ष केंद्रित केले जाईल, ज्यांच्याकडे दीर्घ कालावधीसाठी मजबूत वाढ दाखवण्याची क्षमता आहे आणि ज्याचे व्यवस्थापन अनुभवी आहे.

यूटीआय फ्लेक्सी कॅप फंड हा अशा इक्विटी गुंतवणूकदारासाठी योग्य आहे जे त्यांचा कोअर इक्विटी पोर्टफोलिओ तयार करू इच्छितात आणि आर्थिक मूल्य निर्माण करणाऱ्या उत्तम व्यवसायांमध्ये गुंतवणुकीद्वारे दीर्घकालीन वाढ शोधत आहेत. मध्यम जोखीम-प्रोफाइल असलेले आणि दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी किमान ५ ते ७ वर्षे गुंतवणूक करू इच्छित असलेले गुंतवणूकदार या फंडात गुंतवणूक करण्याचा विचार करू शकतात.

# संयुक्त अरब अमिरातीमधील महाराष्ट्र संघटनांची सहयोगी विकासावर चर्चा




**मुंबई, १२ सप्टेंबर :** संयुक्त महाराष्ट्र ही संकल्पना आयपीएफ चे संस्थापक कौन्सिलचे प्रमुख, ज्येष्ठ उद्योजक आणि सामाजिक सल्लागार/समाज मार्गदर्शक राहुल तुळपुळे ह्यांची. ही संस्था युएईमध्ये काम करणाऱ्या विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यवसायाशी संबंधित मराठी संघटनांना एकाच छत्राखाली आणि एका सामायिक व्यासपीठाखाली एकत्र आणून युएईमधील मराठी समुदायाला बळकटी देण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे. सध्या संपूर्ण संयुक्त अरब अमिरातीमध्ये कार्यरत असलेल्या ३५ वेगवेगळ्या संस्था आणि गट संयुक्त महाराष्ट्र उपक्रमाचा भाग आहेत, ज्यात गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरम, महाराष्ट्र मंडळ अबू धाबी, महाराष्ट्र मंडळ दुबई अश्या काही नामांकित संस्था सुद्धा आहेत.

रवींद्र चव्हाण ह्यांच्या हस्ते ह्या संकल्पनेचे उद्घाटन वर्षाच्या सुरवातीला दुबई इथे झाले होते. ह्यातल्या कार्यरत संस्था आज दुबई त राहणाऱ्या साधारण ४००,००० अनिवासी मराठी लोकांसाठी विविध कार्य क्षेत्रात काम करतात -घरगुती कामगारांसाठी आधार व्यवस्था, महिला गृहिणींचे सक्षमीकरण, मराठी लोकांना त्यांचे व्यवसाय सुरु करण्यास मदत करणे, इथल्या मुलांसाठी साप्ताहिक शाळा चालवणे, वाचन संस्कृती वाढवणे, महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा जपणे, प्रादेशिक उत्सव साजरे करणे आणि इतर हि बरेच कार्य करत असतात.

बैठकीत चर्चा झालेल्या प्रमुख मुद्द्यांमध्ये इथल्या अनिवासी मुलांसाठी मराठी भाषेचा एकीकृत जागतिक असे अभ्यासक्रम विकसित करणे जे मुलांना महाविद्यालयीन क्रेडिटसाठी देखील पात्र ठरू शकेल. इथे होणाऱ्या विविध स्तरांवर स्थानिक सामुदायिक उपक्रम आयोजित करण्यासाठी एक समर्पित जागेची फार आवश्यकता आहे असे देखील सर्व संस्थांनी अधोरेखित केली. डिसेंबर २०२५ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या मराठी विश्व संमेलनासाठी युएईहून सर्वसमावेशक आणि सक्षम शिष्टमंडळ पाठवण्याबाबतहि चर्चा झाली. महाराष्ट्र शासनाने द्वारे घोषित केल्याप्रमाणे ऑक्टोबरच्या आठवड्यात अभिजात भाषा साजरी करण्याच्या योजनांवरही चर्चा झाली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पाठिंबा देण्यासाठी बाजारपेठेतील संधी, नियम, अनुपालन, सर्वोत्तम पद्धतींची माहिती देणारी मार्गदर्शन पत्रिका करण्यासाठी यूएईमधील फळे आणि भाजीपाला व्यापारातील अनुभवी व्यावसायिकांचा एक कमोडिटी ट्रेडिंग टास्क फोर्स तयार करण्याचेही मान्य करण्यात आले. जेणे करून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन यूएईला निर्यात करताना मदत होईल.

श्रीमती नीलम नांदेकर यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त महाराष्ट्र उपक्रम सर्व ३५ संस्थांना व्यापणाऱ्या कार्यक्रमांचे मासिक कॅलेंडर देखील प्रकाशित करतो ज्याचे सर्व गट प्रतिनिधींनी खूप कौतुक केले. एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ- सहकार्याची ही भावना सर्व संस्थांना व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यास आणि त्यांचे उपक्रम संपूर्ण मराठी समुदायासाठी अधिक अर्थपूर्ण आणि सुलभ बनवत आहे.

# या नवरात्रीत तुम्ही नक्की वापरून पहावे असे पौष्टिक व्रत-अनुकूल घटक



**नागपूर, १२ सप्टेंबर :** नवरात्र जवळ येताच देशभरातील कुटुंबे उपवासाची तयारी करतात ही परंपरा भक्ती व संयमाशी निगडीत आहे. पारंपरेसोबतच, योग्य घटकांनी बनवलेले अन्न उपवासाला आरोग्यदायी आधार देखील देऊ शकते. साबुदाणा आणि कॅलिफोर्निया बदाम यांसारखे पोषक पदार्थ ऊर्जा टिकवून ठेवतात, पचनास मदत करतात आणि संपूर्ण नऊ दिवस निरोगी राहण्यास हातभार लावतात.

उपवास अधिक आरोग्यदायी करण्यासाठी, मॅक्स हेल्थकेअरच्या रिजनल हेड डायटेटिक्स, ऋतिका समद्दार यांनी अशा उपवासाला तज्ज्ञ मार्गदर्शन दिले आहे. त्या अशा पोषणसमृद्ध घटकांवर भर देतात जे पारंपरिक व्रतसंस्कृतीला सन्मान देतात तसेच आधुनिक पोषणाच्या गरजांनाही अनुरूप आहेत. त्या सल्ला देतात की परिष्कृत साखर व तळलेले पदार्थ टाळा आणि नैसर्गिक, संपूर्ण अन्नघटकांवर लक्ष केंद्रित करा, जे उपवासादरम्यान ऊर्जा मिळवण्यास आणि एकूण आरोग्य टिकवून ठेवतात.

आरोग्यदायी व पोषक उपवासासाठी नवरात्रीच्या जेवणात या घटकांचा समावेश करा:

**बदाम सकाळीसाठी परिपूर्ण आहार**

व्रतामध्ये सर्वाधिक सुचवले जाणारे घटकांपैकी बदाम हे पोषणमूल्यांमुळे वेगळे ठरतात. त्यामध्ये नैसर्गिक प्रोटीन, हेल्दी फॅट्स, व्हिटॅमिन ई आणि मॅग्नेशियम असते जे पोट भरलेले ठेवते, हृदयाचे आरोग्य जपते आणि उपवासादरम्यान ऊर्जा वाढवते. या फायद्यांचा पूर्ण लाभ घ्यायचा असल्यास दिवसाची सुरुवात भिजवलेल्या कॅलिफोर्निया बदामांच्या छोट्या प्रमाणाने करा, ज्यामुळे तुम्ही जास्त वेळ उत्साही व तृप्त राहाल.

**साबुदाणा पारंपरिक ऊर्जा वाढवणारा घटक**

नवरात्र साबुदाणा खिचडी किंवा वड्यांशिवाय अपूर्णच वाटते. साबुदाणा पचायला हलका असून सहज पचणाऱ्या कार्बोहायड्रेट्सने समृद्ध आहे, त्यामुळे तो ऊर्जा मिळवण्यासाठी उत्तम पर्याय ठरतो. त्यात थोडा लिंबाचा रस घातल्यास अधिक ताजेतवाने वाटते. मात्र, जेवणानंतर आळशीपणा येऊ नये यासाठी प्रमाण नियंत्रित ठेवणे महत्त्वाचे आहे.

**कुट्टू पीठ पोषणाने समृद्ध पीठ**

कुट्टूचे पीठ हे नवरात्रातील सर्वात महत्त्वाचे घटकांपैकी एक आहे. पॅनकेक, चिल्ले किंवा इतर व्रत-अनुकूल पदार्थ बनवण्यासाठी ते उत्तम आहे. परिष्कृत पिठांपेक्षा वेगळे, हे ग्लूटेन-फ्री असून फायबर, मॅग्नेशियम आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध आहे. ते पचन सुधारते आणि दीर्घकाळ ऊर्जा देते, त्यामुळे उपवासादरम्यान दैनंदिन कामे सुरळीत पार पाडण्यासाठी हा उत्तम पर्याय ठरतो.

**सामक तांदूळ हलके आणि आरोग्यदायी पर्याय**

आपण नियमित तांदूळ मिस करत आहात का? बर्नयार्ड मिलेट, म्हणजे सामक, हा एक उत्कृष्ट पर्याय आहे. हे कमी कॅलरीजचे, बी-कॉम्प्लेक्स व्हिटॅमिन्सने समृद्ध आणि कमी फॅटचे आहे. पुलाव असो वा खीर, सामक व्रताच्या जेवणात भरपूर आरामदायकपणा देते आणि अन्नाला जडपणा आणत नाही.

या नवरात्रात, आपल्या ताटात पारंपरा आणि सजग आहार (माइंडफुल ईटिंग) यांचा समतोल ठेवा, जेणेकरून नव्हा दिवसांची उपासना आणि उत्सव साजरा करताना शरीर ऊर्जेने भरलेले राहील. योग्य आहार निवडल्यास, उपवास हा फक्त आध्यात्मिक साधना न राहता शरीराची काळजी घेण्याची आणि आरोग्यदायी सवयी निर्माण करण्याची संधी ठरू शकतो, ज्या उत्सवानंतरही टिकून राहतील.

## पुष्पा इम्पॉसिबलमध्ये पुष्पाची कसोटी- दुःखद घटना आणि रहस्य तिचे विश्व उद्ध्वस्त करणार ?

**मुंबई, ११ सप्टेंबर :** चांगला बोध देणारे कथानक आणि हृदयस्पर्शी व्यक्तिरेखा यामुळे सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिका खूप लोकप्रिय झाली आहे. पुष्पा (करुणा पांडे) वकील होण्याचे आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे, पण येथेही तिच्यासमोर नवीन आव्हाने आहेत, ज्यामध्ये तिच्या दृढतेची आणि तिच्या जवळच्या नात्यांची परीक्षा होत आहे. अलीकडच्या भागांमध्ये, दीप्ती (गरिमा परिहार)ची काळजी घेण्यासाठी सोनल (भक्ती राठोड) पुष्पाच्या घरी राहायला आली आहे, पण बापोद्रा (जयेश भारभाया)शी तिचे पटत नसल्याने पुष्पा त्या दोघांच्या संघर्षात सापडली आहे.

आगामी भागांमध्ये, रजत स्वतःचा जीव घेण्याचा धक्कादायक प्रयत्न करतो, त्याने पुष्पा पार कोसळते. त्याचा ठपका तिच्याबरच येऊ लागतो आणि पोलीस तिचा हात अस्लयाबाबत चौकशी सुरू करतात. या संधीचा फायदा घेऊन मयूर रजतला कॅनडाची स्वप्नं दाखवतो पण पुष्पा त्याचे रक्षण करण्याचा प्रयत्न करते- त्याच्या वडीलांच्या दबावापासून आणि कोटकच्या फसवेगिरीपासून. त्याच वेळी, दीप्ती कादंबरीच्या तथाकथित गरोदरपणाचे सत्य जाणून घेण्यासाठी अधिक खोलात शिरते.

आसपास सारे काही कोसळत असताना आपले कुटुंब एकत्र ठेवण्याची शक्ती पुष्पाकडे आहे का?

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, पुष्पा केवळ एक व्यक्तिरेखा नाही, तर अनेक स्त्रियांचे प्रतिबिंब तिच्यात दिसते. या अशा स्त्रिया आहेत, ज्या जबाबदारी घेऊन आव्हानांना तोंड देतात आणि प्रेमाने आणि लवचिकतेने आपले कुटुंब एकत्र ठेवण्यासाठी धडपड करतात.

# बँकिंगचे भविष्य घडवण्यासाठी भारतातील हुशार तरुणांना सहभागी करून घेणारा ॲक्सिस बँकेचा मूव्हज २०२५ उपक्रम



**मुंबई, १२ सप्टेंबर :** भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठ्या बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सिस बँकेने त्यांच्या प्रमुख कॅम्पस एंगेजमेंट उपक्रमांतर्गत, मूव्हज २०२५ च्या पहिल्या आवृत्तीच्या विजेत्यांची घोषणा केली. भारतातील हुशार तरुणांना ओळखून आणि त्यांच्या हुशारीला वाव देण्यासाठी तसेच योग्य मार्गदर्शनासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत आयआयएम, आयआयटी, इंडियन स्कूल ऑफ बिझनेस, एक्सएलआरआय आणि फॅकल्टी ऑफ मॅनेजमेंट स्टडीज यासारख्या ५० प्रमुख एमबीए आणि अभियांत्रिकी संस्थांमधील २१,००० हून अधिक विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग दिसला.

ॲक्सिस बँकेसाठी मोठी धोरणात्मक संधी शोधण्याच्या संकल्पनेवर ही स्पर्धा आधारित होती. यात विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), शाश्वतता, ग्रामीण बँकिंग आणि मार्केटिंग यासारख्या क्षेत्रांसाठी धाडसी, भविष्यासाठी योग्य उपाय सादर करण्यास प्रोत्साहित केले गेले. स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना यासाठी मूल्यांकन, कॅम्पस-स्तरीय फेरी, उपांत्य फेरी, मार्गदर्शन सत्रे आणि ग्रँड फिनाले अशा अनेक टप्प्यांतून जावे लागले. यासोबतच या स्पर्धेत सर्जनशीलता, नियोजनबद्ध विचार करण्याची क्षमता तसेच नेतृत्व क्षमता तपासली गेली. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून बक्षिसे, करिअरच्या संधी तसेच व्यावसायिक मार्गदर्शन देत, ॲक्सिस बँकेने मूव्हज २०२५ ला शिक्षण आणि व्यावहारिक ज्ञान यांच्यातील एक पूल म्हणून समोर आणले आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांना वास्तविक जगाचे भान देतानाच उद्योग-संबंधित कौशल्यांनी सुसज्ज करतो.

या उपक्रमाबद्दल ॲक्सिस बँकेचे ग्रुप एक्झिक्युटिव्ह आणि ह्युमन रिसोर्सेस प्रमुख राजकमल वेम्पती म्हणाले, मूव्हज २०२५ म्हणजे कल्पना, ऊर्जा आणि नावीन्यपूर्णतेचे एक अनोखे प्रदर्शन आहे. भारतातील तेजस्वी तरुणांशी संवाद साधणे नेहमीच प्रेरणादायी ठरते. त्यांचे धाडसी, विविधांगी विचार बँकिंगच्या गतिमान भविष्यावरील आमचा विश्वास अधिक दृढ करतात. ही प्रतिभा जपण्यासाठी तसेच तिला योग्य ते मार्गदर्शन करत एकत्रितपणे अर्थपूर्ण प्रभाव पाडण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.

अंतिम फेरीतील टॉप १० संघांनी त्यांच्या कल्पना थेट ॲक्सिस बँकेचे वरिष्ठ नेते मुनीश शारदा, कार्यकारी संचालक; नीरज गंभीर, समूह कार्यकारी आणि प्रमुख ट्रेझरी, मार्केट्स आणि होलसेल बँकिंग उत्पादने; बिपिन सराफ, समूह कार्यकारी आणि प्रमुख भारत बँकिंग; राजकमल वेम्पती, समूह कार्यकारी आणि प्रमुख मानव संसाधन; समीर शेट्टी, समूह कार्यकारी डिजिटल व्यवसाय परिवर्तन आणि धोरणात्मक कार्यक्रम; विजय मुलबागल, समूह कार्यकारी आणि प्रमुख होलसेल बँकिंग कव्हरेज ग्रुप आणि शाश्वतता; प्रशांत जोशी, ग्रुप एक्झिक्युटिव्ह आणि मुख्य क्रेडिट अधिकारी तसेच प्रणव हरिदासन, एमडी आणि सीईओ, ॲक्सिस सिक्युरिटीज आदींचा समावेश असलेल्या ज्युरीसमोर सादर केल्या.

# अदाणी जेम्स स्कूल ऑफ एक्सलन्सला भारतातील सर्वोत्तम उदयोन्मुख शाळांमध्ये मान्यता मिळाली

**नागपूर, १२ सप्टेंबर :** लखनौ येथील अदाणी जेम्स स्कूल ऑफ एक्सलन्सला भारतातील (इंडियन करिक्युलम) तिसऱ्या क्रमांकाची सर्वोत्तम उदयोन्मुख शाळा आणि लखनौमधील नंबर १ उदयोन्मुख शाळा म्हणून मान्यता मिळाली आहे. शाळेच्या पहिल्याच वर्षात मिळालेला हा सन्मान त्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाबद्दलच्या वाढत्या प्रतिष्ठेला अधोरेखित करतो.

ही मान्यता सीफोर या बहुआयामी संशोधन संस्थेने केली. त्यांनी संपूर्ण देशभर सर्वेक्षण करून सर्वोत्तम उदयोन्मुख खासगी शाळांची यादी जाहीर केली. या सर्वेक्षणात पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षणतज्ज्ञ आणि विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. त्यांनी शाळांचे मूल्यमापन १० गुणांच्या श्रेणीवर १४ वेगवेगळ्या निकषांवर केले, ज्यामध्ये अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, पायाभूत सुविधा, नवनवीन उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा समावेश होता.

या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन १० सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथे होणार आहे, जिथे देशातील नामांकित शिक्षणतज्ज्ञ आणि संस्थांचा सन्मान केला जाईल.

आपल्या स्थापनेपासूनच अदाणी जेम्स स्कूल ऑफ एक्सलन्सने नवीन शैक्षणिक पद्धती, जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करून वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या यशाबद्दल बोलताना डॉ. प्रीती अदाणी, चेअरपर्सन, अदाणी जेम्स एज्युकेशन म्हणाल्या:

ही मान्यता आम्हाला पुन्हा एकदा खात्री देते की शिक्षण हे फक्त अभ्यासापुरते मर्यादित न राहता सामाजिकदृष्ट्या जबाबदार, आत्मविश्वासू आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व घडविणारे असले पाहिजे. लखनौमधील सर्वोत्तम उदयोन्मुख शाळा आणि भारतातील सर्वोत्तम शाळांपैकी एक म्हणून निवड होणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे आणि पुढे प्रगत शिक्षणाच्या दिशेने नवे आदर्श निर्माण करण्याची जबाबदारी देखील आहे.

हा पुरस्कार शाळेची परिवर्तन घडवणारी संस्था म्हणूनची भूमिका अधोरेखित करतो, जी विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, चिकित्सक विचार करण्याची क्षमता आणि जागतिक स्तरावरील जबाबदार नागरिक म्हणून प्रगती करण्यासाठी आवश्यक मूल्ये रुजवण्यास कटिबद्ध आहे. या मान्यतेमुळे, अदानी जेम्स स्कूल ऑफ एक्सलन्सने तरुण पिढीला प्रेरणा देणे, समाजाशी नाते अधिक मजबूत करणे आणि उज्ज्वल भविष्य निर्माण करणे हे आपले ध्येय अधिक बळकट केले आहे.

# राशीभविष्य

**मेष :** कामाच्या ठिकाणी मेहनत केल्यास परिस्थिती सुधारेल. खाजगी व्यवसाय करणाजयांना अचानक नफा मिळण्याची शक्यता आहे. सुरक्षा क्षेत्रात काम करणाजया लोकांना शौर्याच्या जोरावर लक्षणीय यश मिळेल.

**वृषभ :** आज, अतिरिक्त परिश्रम तुमच्या व्यवसायात आणि उपजीविकेत सुधारणा करतील. लपलेल्या शत्रूंपासून सावध रहा. ते तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेऊ शकतात. प्रकृतीला जपा.

**मिथुन :** आज कुटुंबात काही कारणास्तव तणाव निर्माण होऊ शकतो. तुम्ही तुमचा राग आणि कठोर शब्दांवर नियंत्रण ठेवावे. अन्यथा, हे प्रकरण गंभीर भांडणाचे रूप धारण करू शकते.

**कर्क :** आज तुम्हाला मिश्रित परिणाम मिळतील. तुमचे वर्तन सुधारण्याचा प्रयत्न करा. समाजात तुमची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करा. तुमचे महत्त्वाचे काम इतरांवर सोपवू नका.

**सिंह :** आज तुम्ही क्रीडा स्पर्धेत यशस्वी व्हाल. न्यायालयीन प्रकरणांमध्ये यशस्वी व्हाल. शेतीच्या कामात लोकांना सरकारी मदत मिळेल. नोकरीत तुम्हाला काही महत्त्वाची जबाबदारी मिळू शकेल.

**कन्या :** तुम्हाला रोजगाराच्या संधी मिळतील. राजकारणातील उच्चपदस्थ व्यक्तीशी तुमची जवळीक वाढेल. ज्यामुळे राजकीय क्षेत्रात तुमचा प्रभाव वाढेल. कुटुंबात आनंदाचा संचार होईल.

**तुळ :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना त्यांच्या बॉसच्या जवळचा फायदा होईल.शिक्षण, आर्थिक आणि कृषी क्षेत्रात काम करणाजया लोकांना फायदेशीर संधी मिळतील.

**वृश्चिक :** व्यवसायात कठोर परिश्रम केल्यास नंतर यश मिळेल. एखादे अपूर्ण काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे. तुम्हाला कामगार म्हणून नोकरी मिळेल.


**धनु :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना त्यांच्या कार्यक्षम कामामुळे पदोन्नती मिळेल. सरकारी मदतीने नोकरीशी संबंधित समस्या सोडवल्या जातील. बौद्धिक आणि शारीरिक कामांमध्ये यश मिळेल.

**मकर :** व्यवसायात तुमचा आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. तुमच्या विरोधकांपासून सावध रहा. ते तुमच्या भावनिकतेचा फायदा घेऊ शकतात. कामाच्या ठिकाणी तुमच्या वरिष्ठांशी अनावश्यक संघर्ष होऊ शकतो.

**कुंभ :** कामाच्या ठिकाणी संयमाने काम करा. तुम्हाला काही महत्त्वाच्या कामात यश मिळेल. व्यवसायात नवीन करार होतील. कोणतेही अपूर्ण काम पूर्ण केल्याने तुमचे धैर्य आणि मनोबल वाढेल.

**मीन :** अनेक वर्षापासूनची मनातील इच्छा पूर्ण झाल्याने अचानक आनंदाश्रू येतील. मनावरचा ताण कमी झाल्यासारखं वाटेल. कुटुंबामध्ये आज अत्याधिक आनंदाचे वातावरण असेल.

# शब्दकोडे क्रमांक २२१६



**आडवे शब्द :-**

१) मुंज, मौंजीबंधन
५) अतिशय खोल तळाचा ठाव लागत नसलेला
८) पोलिस चौकी
९) उद्याच्या नंतरचा दिवस
१०) योग्य, उचित
११) अस्थिर होणे, हलणे
१४) जाणे
१५) स्वत:बद्दलची कमीपणाची भावना
१६) लाकूड तासण्याचे हत्यार
१७) चांदी
१९) वाद्य वाजविण्याची कला
२०) विश्व
२१) नारळ सुपारीच्या पात्यामधील उभा दांडा नाश पावणारे
२२) पदार्थाचा सूक्ष्म भाग, अणु
२४) उद्दिष्ट, नियम
२७) मध
२९) भेग वाढविणारी खुंटी
३०) *** गाडगे
३२) जगाचे कालचक्र
३३) वाहणारी हवा
३५) जपजाप्य
३७) अंत:करण
३८) बारीकसारीक
४१) मालक
४२) पुरुष
४४) नाचणी
४५) शंभर
४८) कथिल व तांबे यांचा मिश्र धातू
५०) सरसकट
५२) हवेतील गारवा
५५) जंगलातील प्राणी
५७) बासरी
५८) केस कापणे
६०) रंग (इं.)
६२) पोलिस
६३) मीठ
६४) थोडक्यात सामोपचार
६६) मान खाली घातलेला
६७) रुपेरी मुलामा

**उभे शब्द :-**

१) मेहेरबानी
२) पंख
३) नव प्रवेशित
४) नजरेचा तीर
५) निरर्थक
६) विपुल, पुरुन उरेल इतके
७) यज्ञ
८) ठाण्याचा रहिवासी
१२) केळवण
१३) साक्ष (हिं.)
१८) माय बाप
२२) कदर करणारा
२३) अनुमती
२५) गावातील विद्वान, सावकार
२६) गुरांचा घोळका
२८) वर्ण
२९) गावाचा कारभार पाहणारा -- एक पद
३१) गाडीचे छत
३४) ढीग
३६) त्रास, बडबड
३७) मधुमक्षिका
३९) मोठी टोपली
४०) सोने
४३) मातीचा कण
४५) मंदवासर
४६) कारस्थान
४७) देवापाशी मागीतलेला निर्णय
४९) पवित्र, शुद्ध
५०) पावसाची झड
५१) पत्र
५३) पायाचा खालचा भाग
५४) खिडकीची पातळ काच
५६) छोटी लढाई
५९) पुन्हा
६०) वाळवी, उणीव
६१) चिव चिव करणारा छोटा पक्षी
६२) सीमा
६३) योग्य, वाजवी
६४) प्रामाणिक

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# फुलसावंगीच्या शेतकऱ्यांचे संकट दूर होईना




**महासागर प्रतिनिधी, फुलसावंगी, दि. १२ :** फुलसावंगी आणि परिसरात ऑगस्ट महिन्यात ढगफुटी सदृश पावसाने हाहाकार माजवला. हजारो हेक्टर शेतीतील खरीप पिके पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून यंदाच्या हंगामातून एक दाणाही हाती येणार नाही, अशी भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. या संकटाला एक महिना उलटून गेला, तरी शासनाकडून कोणतीही ठोस मदत जाहीर झालेली नाही. शेतकऱ्यांमध्ये निराशा आणि संताप वाढत आहे. फुलसावंगी परिसर हा शेतीप्रधान असून, येथील बहुतांश कुटुंबांचे अर्थकारण शेतीवर अवलंबून आहे. कर्ज काढून, वर्षभर राबून केलेली शेती आता वाया गेली आहे.

ओल्या दुष्काळाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून, कर्जाचा बोजा आणि भविष्याची अनिश्चितता यामुळे ते हतबल झाले आहेत. अनेक शेतकऱ्यांना बंदा खर्च तरी निघेल, अशी आशा होती, पण तीही धुळीला मिळाली. पूरानंतर काही नेत्यांनी या भागाचे दौरे केले, मात्र हे दौरे केवळ फोटोसेशनपुरते मर्यादित राहिले. शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकण्याऐवजी आणि त्यांना तातडीची मदत देण्याऐवजी, या दौऱ्यांमधून कोणताही ठोस निर्णय घेतला गेला नाही.

पूरग्रस्त शेतकऱ्यांनी सरकारकडे तातडीने आर्थिक मदत, कर्जमाफी आणि पुनर्वसनाच्या उपाययोजनांची मागणी केली जात आहे. शेतीचे नुकसान भरून काढण्यासाठी तत्काळ अनुदान, बियाणे आणि खतांसाठी सहाय्य, तसेच पुढील हंगामासाठी कर्जमाफी यासारख्या ठोस पावलांची गरज आहे. या पुरात तालुक्यातील ५२७ घरात पुराचे पाणी शिरल्याने नुकसान झाले. तर २०६ घराची पडझड व ५ घरे पूर्णपणे वाहून गेले आहेत. असे केवळ महागाव तालुक्यातच थेट पुराचा फटका बसलेले जवळपास हजार कुटुंब आहेत. एका महिन्याचा कालावधी लोटूनही शासनाने कोणतीही ठोस मदत जाहीर न केल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढत आहे. पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई तातडीने जाहीर करण्याची मागणी जोर धरत आहे. या पुरामुळे विधानसभेत शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.

खरीप हंगामाचा एक दाना ही शेतकऱ्यांच्या हाती येणार नाही. शिवाय दळणवळणाचे रस्ते वाहून गेले आहेत. असंख्य नागरिकांचे डोक्यावरील छत्र या पुराने हिरावले आहे.

## कर्जबाजारी शेतकऱ्याची विहिरीत उडी घेत आत्महत्या

**आष्टी(श)दि.१२:** येथील पो.स्टे.हद्दीत येणाऱ्या कारंजा (घा.)तालुक्यातील बोटोणा येथील शेतकरी रामाजी जानराव ठाकरे वय(६५) यांनी कर्ज परत फेडीच्या व आर्थिक विवानचनेतून स्व मालकीच्या शेतात असलेल्या विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि. ११रोजी दुपारी दोन वाजता घडली. आष्टी पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या बोटोणा येथील शेतकरी रामाजी ठाकरे यांच्याकडे पाच एकर शेती असून शेतात तूर, कपाशी व भाजीपाला पिके लागवड केली.सतत होणारी नापिकी, खर्च जास्त उत्पन्न कमी या विवंचनेत दि.११रोजी शेतकरी रामाजी हे शेतात फवारणी करण्यासाठी पत्नीला सोबत घेऊन बोटोणा मौजा मध्ये असलेल्या शेतात सकाळी नऊ वाजता गेले. फवारणी केल्यावर दुपारी दीड वाजता पत्ना सोबत जेवण केले.

# अनुकंपा तत्वावरील १० हजार जागा भरणार
## स्पर्धा परीक्षा समन्वय समितीचा आक्षेप

**महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १२ :** राज्य सरकारच्या भरती प्रक्रियेत दुर्लक्षित असलेल्या अनुकंपा तत्वावरील भरतीचा अनुशेष भरून काढण्याचा निर्णय सरकारने घेतला असून विविध विभागांमध्ये सुमारे १० हजार जागा भरण्यात येणार आहेत. मात्र, स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने सरकारच्या या निर्णयावर आक्षेप नोंदवला आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचे निधन झाले, तर सरकारने त्या कुटुंबासाठी पर्यायी व्यवस्था करावी, पण आमच्या लाखमोलाच्या नोकऱ्या का म्हणून फुकट द्याव्या?, असा सवाल स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने केला आहे. सोबतच शासनाने याबाबत लवकरच निर्णय जाहीर करावा, अशी विनंतीही समितीने केली आहे. राज्यभरात जवळपास ९ हजार ६५८ रिक्त जागा आहेत. या सर्व जागा भरण्यात येणार आहेत. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर अनुकंपा तत्त्वावर भरती होत असल्याने हजारो उमेदवारांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेष म्हणजे, यावेळी चतुर्थ श्रेणीतील जागाही भरल्या जाणार आहेत. आतापर्यंत या श्रेणीतील बहुतेक पदे खासगी कंत्राटदारामार्फत भरण्यात येत होती. मात्र आता अनुकंपा वरील जागा थेट पात्र वारसांना मिळणार आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक स्थैर्य आणि नोकरीच्या माध्यमातून सुरक्षितता मिळेल. ही नियुक्ती प्रक्रिया जिल्हा प्रशासनाच्या देखरेखीखाली पार पडणार आहे. १५ सप्टेंबर २०२५ पासून जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही भरती सुरू होईल. यासोबतच सरकारने प्रक्रियेत काही महत्त्वपूर्ण सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे मृत शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना अर्जापासून ते नियुक्ती पर्यंतच्या टप्प्यातील अडचणी कमी होणार आहेत. सरकारने अनुकंपा तत्त्वावरील सर्व रिक्त पदे भरण्याचा निर्णय घेतल्यामुळे सुमारे दहा हजार कुटुंबांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. ही भरती प्रक्रिया पारदर्शक, वेगवान आणि कुटुंबीयांसाठी न्याय्य ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पण, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संघटनेने यावर आक्षेप नोंदवला आहे.

# आगामी निवडणूक मविआ म्हणून लढण्याचा संदेश द्या!

## राकाँ प्रदेशाध्यक्ष आ. शिंदे ; पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी संवाद



**महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १२ :** मतांचे विभाजन न झाल्यास आपली सत्ता येईल. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महाविकास आघाडी म्हणून लढण्यात येतील, असा संदेश जनतेमध्ये जाण्यासाठी प्रयत्न करा, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे बुधवारी म्हणाले. आ. शिंदे प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर प्रथमच अकोल्यात आले. त्यांनी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी संवाद साधला. जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील पोलिस लॉनमध्ये आ. शिंदे यांनी महानगर व ग्रामीण अशा दोन्ही भागातील पदाधिकाऱ्यांची चर्चा केली. जिल्ह्यात होऊ घातलेल्या निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांनी भाष्य केले. कितीही मतचोरी होऊ द्या; ९० टक्के मतदान होण्यासाठी प्रयत्न करा. सध्या समाजात वाद निर्माण करण्याचे, धर्मात फूट पाडण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे म्हणत यांनी थेट नाव न घेता सत्ताधारी महायुतीच्या कारभाराचा समाचार घेतला. विरोधी पक्षाच्या आमदारांनी सांगितलेली जनहिताचे काम करायची नाहीत, अशी प्रवृत्ती निर्माण होत आहे. मात्र कोणी सत्तेचा ताम्रपट घेऊन आला नसल्याचे म्हणत यांनी महायुती सरकारच्या कारभारावर टीकास्त्र डागले. व्यासपीठावर माजी राज्यमंत्री गुलाबराव गावंडे, डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ. संतोष कोरपे, शामबाबू अवस्थी, प्रा. विश्वनाथ कांबळे, जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे, महानगराध्यक्ष रफिक सिद्धीकी, पिंटू वानखडे, पंकज गावंडे आदी होते.

# लम्पीमुळे १० तालुक्यांत ३८ गोवंशांचा मृत्यू



**महासागर प्रतिनिधी, खामगाव , दि. १२ :** जिल्ह्यात गत दोन तीन महिन्यापासून लम्पी या आजाराने पुन्हा डोके वर काढले आहे. या आजाराने ग्रासलेल्या जिल्ह्यातील लोणार, मोताळा व नांदुरा वगळता उर्वरित १० तालुक्यातील ३८ गोवंश जनावरांचा बळी घेतला आहे. तर जिल्ह्यातील सद्य:स्थितीत या आजाराने ग्रासलेल्या २२९ गोवंश वर उपचार करण्यात येत आहेत.

या गोवंशाची प्रकृती हळूहळू सुधारणा होत आहे. सद्य:स्थितीत या आजाराने ग्रासलेल्या गोवंशा पैकी एकाही गोवंशाची प्रकृती गंभीर नसल्याची माहिती मिळाली आहे.

लम्पी या आजाराला आळा घालण्यासाठी जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातर्फे प्रयत्न करण्यात येत असले तरी अद्याप पावेतो या विभागाला जिल्हा लम्पी मुक्त करण्यास यश मिळालेले नाही. जिल्ह्यातील १३३७ गावातील ३ लाख ६० हजार गोवंशापैकी १३०० गोवंशाना या आजाराने ग्रासले होते. यामुळे गोवंशमालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले दिसून येत होते परंतु हे वातावरण आज काही प्रमाणात कमी दिसून येत आहे.

लम्पी हा चर्मरोग केवळ गोवंश वर्गातील जनावरांना होणारा विषाणूजन्य त्वचारोग आहे. हा आजार जनावरांपासून मानवांना आजार संक्रमित होत नाही. या आजारातून गोवंशांना १०४ ते १०५ फॅरेनहाईट ताप येतो. त्यांचे खाण्याचे प्रमाण कमी होते. अंगावर मोठ मोठ्या गाठी येतात, अशी लक्षणे दिसून आल्यास त्वरित त्या गोवंशावर त्वरित उपचार करून घ्यावे.

# गणेश विसर्जन मिरवणुकीत नियमभंग
## १७ डीजे जप्त, गुन्हे दाखल



**वाशीम :** शहरात श्री गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान ध्वनीप्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांनी कडक कारवाई करत तब्बल १७ डीजे जप्त केले. यासह संबंधित चालक व मालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून ही कारवाई चर्चेचा विषय ठरली आहे. प्रत्येक वर्षी गणेशोत्सवात डीजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे ध्वनीप्रदूषणाचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. लहान मुले, वृद्ध नागरिक तसेच महिलांच्या आरोग्यावर या अमर्याद आवाजाचा विपरीत परिणाम होत असल्याच्या नोंद वारंवार करण्यात आली आहे. काही वेळा अशा प्रचंड आवाजामुळे नागरिकांना बहिरेपणा किंवा इतर आरोग्य समस्या निर्माण होण्याची उदाहरणेही आढळून आली आहेत. यामुळे राज्य शासनाच्या आदेशानुसार पोलिस विभागामार्फत जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. समितीने यावर्षी गणेश मंडळांना ध्वनीप्रदूषण टाळण्याचे आवाहनही केले होते.मात्र, प्रत्यक्षात विसर्जन मिरवणुकीदरम्यान अनेक मंडळांनी या सूचनांकडे दुर्लक्ष केले. डीजेचा आवाज मर्यादेपेक्षा जास्त ठेवत नियमांचे उल्लंघन करण्यात आले. परिणामी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत १७ डीजे वाहनांसह संपूर्ण साहित्य जप्त केले. वाशीम पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे पुढील काळात गणेश मंडळे अधिक जबाबदारीने व पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कठोर भूमिकेमुळे नागरिकांमध्ये जागरूकता चालक व मालकांविरुद्ध गुन्हे नोंदवण्यात आले. या कारवाईमुळे गणेशोत्सव साजरा करताना नियमांचे पालन करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. पोलिसांच्या या कठोर भूमिकेमुळे नागरिकांमध्ये ध्वनीप्रदूषणाबाबत जागरूकता वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. विसर्जन मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी योग्य पावले उचलल्याचे नागरिकांनी सांगितले.

# 'राहुल बोंद्रे यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घ्या



**महासागर प्रतिनिधी, खामगाव , दि. १२ :** जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, माजी आमदार राहुल बोंद्रे व पदाधिकाऱ्यांवर सुडबुध्दीने राजकीय दबावाखाली दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत अशी मागणी खामगाव विधानसभा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात अप्पर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा यांच्या मार्फत जिल्हा पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांना निवेदन देण्यात आले. प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या वाढदिवसानिमित्त ३१ ऑगस्ट रोजी 'मी धावतो वोट चोरी रोखण्यासाठी' या मॅरेथॉन कार्यक्रमाचे आयोजन संपूर्ण बुलडाणा जिल्ह्यात करण्यात आले होते. मात्र, चिखली येथे राजकीय सुडबुध्दीने जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व माजी आमदार राहुल बोंद्रे तसेच इतर १३ शहर व तालुका काँग्रेस पदाधिकाऱ्यांवर स्फोटक व ज्वालाग्राही पदार्थांचा वापर करुन सरकारी मालमत्तेचे नुकसान केल्याचे खोटे व अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिस प्रशासनाची ही कृती म्हणजे लोकशाहीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारी आणि संवैधानिक मूल्यांचा अपमान करणारी आहे. तरी राहुल बोंद्रे व सहकारी काँग्रेस पदाधिकाऱ्यांवर दाखल करण्यात आलेले सर्व खोटे व अजामीनपात्र गुन्हे त्वरित मागे घेण्यात यावेत व चिखली येथील ठाणेदारांना तात्काळ निलंबित करावे अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन देताना ज्ञानेश्वर पाटील, तालुका अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहाण, शेख जूलकर शेख चांद, स्वप्निल ठाकरे पाटील, अजय तायडे, किशोरअप्पा भोसले, डॉ.विप्लव कविश्वर, शफी भाई, वसीम भाई, अस्लम पटेल, कॉ. जितेंद्र चोपडे, रवि महाले, श्रीराम खेलदार, रवी जैन, कैलास फाटे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व महाविकास आघाडीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यापीठातील धनंजय पाटील आचार्य पदवीने सन्मानित



**महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १२ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील भांडार विभागात अधीक्षक पदावर कार्यरत धनंजय प्रभाकर पाटील यांना मानव विज्ञान विद्याशाखेतील मराठी विषयात आचार्य (पीएचडी) पदवीने सन्मानित करण्यात आले आहे . धनंजय पाटील यांनी आचार्य पदवी प्राप्त केल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देवून कुलगुरू कार्यालयात सन्मान केला. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, भांडार विभागातील श्री नरेंद्र घाटोळ व कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक श्री रमेश जाधव उपस्थित होते.

धनंजय पाटील हे गत ३३ वर्षापासून विद्यापीठात कार्यरत आहेत. 'सुधा मूर्ती यांच्या अनुवादीत मराठी कथात्म साहित्यातील जीवनमूल्यांचा शोध ' असा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. डॉ बाबासाहेब आंबेडकर मवि या संशोधन स्थळावरून त्यांनी पीएच.डी. केली असून तक्षशिला मवि येथील डॉ.पी.जी. राठोड यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. सुधा मूर्ती यांच्या साहित्यातील जीवनमूल्ये व आधुनिक काळातील त्यांची उपयुक्तता ही त्यांनी संशोधनातून सिद्ध केली आहे .

# मुख्यमंत्री ग्रामीण पंचायतराज अभियानांतर्गत कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी, सेलू, दि. १२ :** सेलू पंचायत समितीत मुख्यमंत्री ग्रामीण पंचायतराज अभियानांतर्गत कार्यशाळा संपन्न ग्रामपातळीवर विकासाचे नवे शिल्प उभे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री ग्रामीण पंचायतराज अभियानांतर्गत विशेष कार्यशाळेचे आयोजन पंचायत समिती सेलूच्या वतीने करण्यात आले. हा उपक्रम स्वाभिमान विरासत – स्वावलंबी ग्रामविकास या ध्येयवाक्यासह राबविण्यात येत असून घोराड येथील यमुना सभागृहात कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेचे अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी देवानंद पाणबुडे होते. ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थाचे मोठे योगदान असून त्रिस्तरीय पंचायत राज संस्थेमार्फत ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे हे मुख्य ध्येय या अभियानाचे आहे.

**CHANGE OF NAME**

MY OLD NAME IS **SAJID HANIF MEMON.** NOW MY NEW NAME IS **SAJID HANIF CHHOTANI.**
**ADD:-**ABOVE JANTA MARKET,2ND FLOOR, WARDHAMAN BANK, BHALDARPURA, MAHATMA FULE MARKET,NAGPUR-440018,MAHARASHTRA, INDIA.
**MOBILE NO.:-**
09638686168 / 07228085146
**email id.:-**
sajidchhotani@gmail.com

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MOHAMMAD UMAR TAJMOHAMMAD SHEIKH**. NOW MY NEW NAME IS **UMAR TAJ MOHAMMAD SHEIKH.**
**ADD :** PLOT NO. 288 HIWARI LAYOUT WARDHAMAN NAGAR NAGPUR 440008

MY OLD NAME WAS **KAPILKUMAR PARYANI.** NOW MY NEW NAME IS **KAPIL PARYANI.**
**ADD :** SAI COLONY KANHARTOLI GONDIA
**MOB :** 8128918626

MY OLD NAME WAS **PRABHAKAR SINGH**. NOW MY NEW NAME IS **PRABHAKAR YADAV.**
**ADD :** WARD NO. 3 P NO.199 KAMPTEE ROAD SUMAN VIHAR BHILGAON NAGPUR - 440026

MY OLD NAME WAS **MUSTAQ BABA KHAN**. NOW MY NEW NAME IS **MUSHTAQUE AHMAD KHAN.**
**ADD :** 14/3, AAKAR BUILDERS, BYRAMJI TOWN, CHITNIVIS LAYOUT, NAGPUR

MY OLD NAME WAS **NIKHAT KHAN.** NOW MY NEW NAME IS **NIKHAT ARA KHAN.**
**ADD :** 14/3, AAKAR BUILDERS, BYRAMJI TOWN, CHITNIVIS LAYOUT, NAGPUR

MY OLD NAME WAS **SHAMEN AKHTAR**. NOW MY NEW NAME IS **SHAMIM AKHTAR ULLALA KHAN.**
**ADD :** F.NO.101,SAWRAS CROWN, RAJARAM SOCIETY, RING ROAD, NR RAUT SABHAGRUH, JAFAR NAGAR, NAGPUR - 440030

MY OLD PASSPORT NO. M7857498. MY OLD NAME WAS **AFROZ BANO ABID ALI.** NOW MY NEW NAME IS **AFROJA BANO ABID ALI.**
**ADD :** PLOT NO, 3 GAUSIYA COLONY TAJBAGH NAGPUR 440024

# ग्रामीण जनतेला गतीमान प्रशासन देण्यासाठी समृद्ध पंचायतराज अभियान : पालकमंत्री डॉ. भोयर



**महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १२ :** स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत गावांमध्ये विकासाच्या विविध योजना राबविण्यात येतात. ग्रामीण जीवनाशी संबंधित या संस्था अधिक गतिमान आणि लोकाभिमुख झाल्या पाहिजे, यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी या अभियानात पुर्ण क्षमतेने सहभागी झाले पाहिजे, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले. चरखा सभागृह, सेवाग्राम येथे अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी पालकमंत्री बोलत होते. कार्यक्रमास आ. दादाराव केचे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पंचायतचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ स्वप्निल बेले आदी उपस्थित होते. विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे. ग्रामीण भागात विविध योजना राबवितांना लोकांचा सहभाग देखील तितकाच महत्वाचा ठरतो. त्याशिवाय योजना पुर्ण होऊ शकत नाही. अभियान राबवितांना संस्थांनी पुर्ण क्षमतेने सहभागी झाले पाहिजे. अभियानात स्थानिक नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग घ्या आणि आपल्या गावाला, ग्रामपंचायतींना अधिकाधिक पुरस्कार कसे मिळतील यासाठी प्रयत्न करा, अशा सूचना पालकमंत्र्यांनी यावेळी केल्या.

## शैक्षणिक साहित्य वाटप करुन वाढदिवस साजरा



**आर्वी,दि.१२:** मिर्झापूर नेरी हे विदर्भातील नाव रूपास आलेले सौर ऊर्जा ग्राम असुन येथील सरपंच बाळा सोनटक्के यांनी आपल्या मुलीचा वाढदिवस शाळेतील मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करुन साजरा केला. मिर्झापूर नेरी येथील जिल्हा परिषद शाळेत कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच बाळा सोनटक्के प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक मंगेश कोल्हे , शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अंगणवाडी सेविका प्रियंका काळपांडे यांनी तर आभार सहाय्यक शिक्षक विवेक कहारे यांनी मानले. कार्यक्रमाला गावातील पुरुष व महिला यांची उपस्थिती होती. मुलीचा वाढदिवस स्वत:च्या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलांसोबत केक कापून व शैक्षणिक साहित्य वाटप करून साजरा करण्याचा विचार वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातून आलेल्या विचारांची प्रेरणा असल्याचे सरपंच बाळा सोनटक्के म्हणाले.

**सायटेशन/पब्लिक जाहीर नोटीस**

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील**
एम.जे.सी. क्र. ३२/२०२५
पेशी दिनांक : ०३-१०-२०२५ प्रोसेस क्र. १०४८/२०२५ दि. ०८/०९/२०२५
अर्जदार : १. श्री. राजेंद्र डोमाजी बागडे, वय-५८ वर्षे, रा. वायगांव, पो. मोर्गांव, तह. मौदा, जि. नागपूर
२. श्री. अशोक डोमाजी बागडे वय-६९ वर्षे, रा. वार्ड नं. ०७, प्लॉट नं. ३०१/११-ए, राशन दुकानाजवळ, कम्पसरी बाजार कॅन्ट एरिया, कामठी, तह. कामठी, जि. नागपूर
३. श्री. राजू अंतुजी बागडे, वय-६३ वर्षे, रा. वायगांव, पो. मोर्गांव, तह. मौदा, जि. नागपूर
विरुद्ध
गैरअर्जदार : कोणीही नाही
मयतदार : श्री. लहानु बक्षी बागडे

सदरहू अर्जदारांनी कायदेशीर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या कलम VIII १८२७ अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. श्री. लहानु बक्षी बागडे हे मौजा-वायगांव, तह. मौदा, जि. नागपूर येथे वास्तव्यास होते. अर्जदारांनी मयतदार श्री. लहानु बक्षी बागडे द्वारा कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. श्री. लहानु बक्षी बागडे यांचा मृत्यु दि. ०१.०७.२००८ रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क. स्तर मौदा, जि. नागपूर यांनी दिनांक ०३.१०.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक/जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा. जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टिफिकेट (कायदेशीर वारसान प्रमाणपत्र) मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
आज दि. ३०-०८-२०२५ रोजी माझ्या सहनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर

**कार्यालय नगर परिषद सावनेर**
**ता. सावनेर, जि. नागपूर**
E-mail : municipalcouncilsaoner@gmail.com
संपर्क : ०७११३-२३२२१७, टोल-फ्रि.क्र. :१८००२७४०१००
क्रमांक – नपसा/कर.वि/३४२७/२०२५
दिनांक १२/०९/२०२५

**-: जाहिर सूचना :-**

या जाहीर सूचनेद्वारे सूचित करण्यात येते की, न.प. सावनेर हद्दीत सरकारी जागा वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. १७०००५० (४२) व १७०००५१ (४३) वर श्याम नामदेव गोलाईत यांच्या नावाची नोंद भोगवटदार म्हणून न.प. कर आकारणी सूचीवर आहे.
सदर मालमत्तेवर भोगवटदार म्हणून श्री. प्रीतम उमाजी सोमकुंवर व श्रीमती पुष्पा नामदेव वागडे यांच्या नावाची नोंद घेण्याकरिता विनंती अर्ज प्राप्त झाला आहे.
सबब श्री. प्रीतम उमाजी सोमकुंवर व श्रीमती पुष्पा नामदेव वागडे यांच्या नावाची नोंद न.प. कर आकारणी सूचीवर भोगवटदार म्हणून नोंद घेण्याकरिता आक्षेप/हरकती मागवित आहे.
सबब सदर मालमत्ता हस्तांतरण नोंद घेणेकरिता आक्षेप/हरकती दस्ताऐवज सदर लेखीस्वरूपात सादर करावे मुदतीअंती कोणताही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

प्रशासकीय अधिकारी तथा कर निरीक्षक
नगर परिषद सावनेर

**जाहीर सूचना**

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रामटेक यांच्या न्यायालयातील सक्सेशन. नं. ०९/२०२५**
पेशी दिनांक : १५-१०-२०२५ प्रोसेस क्र. २०७४
अर्जदार : १. कु. वंशिका श्यामलाल वरकडे, वय-१७ वर्षे, शिक्षण
२. नैति पु. श्यामलाल वरकडे वय-१५ वर्षे, शिक्षण
३. कु. वैधवी दि. श्यामलाल वरकडे वय-१२ वर्षे, शिक्षण
वरील अर्जदारांचे नैसर्गिक पालक व आजोबा श्री. लच्छीराम होल्या वर्कडे, वय ६४ वर्षे, व्यवसाय-मजुर, रा. महाराजपुर, पोस्ट मुरसेवाडी, ता. रामटेक, जि. नागपूर
प्रतिवादी : नाही
मृत व्यक्तीचे नाव : दिवंगत भारती श्यामलाल वरकडे (मृत्यु दिनांक : २८/०५/२०२५)
दोघेही रा. महाराजपुर, पोस्ट मुसेवाडी, ता. रामटेक, जि. नागपूर

वरील अर्जदारांनी भारतीय उत्तराधिकारी अधिनियम, १९२५ मधील कलम ३७२ अंतर्गत या माननीय न्यायालयाकडे उत्तराधिकारी प्रमाणपत्र देण्याबाबतअर्ज केला आहे.
मृत भारती श्यामलाल वर्कडे यांच्या खालील ठेव/सिक्युरिटीज संदर्भात :
बचत खाते क्र. ४६११०१०००७४१८, बँक ऑफ बडोदा, शाखा रामटेक, खाते शिल्लक – रु. ५४,६५५/- (रुपये चौपन्न हजार सहाशे पंचावन फक्त)
ही जाहीर सूचना सर्वांना कळविण्यात येत आहे की, ज्यांना या अर्जदारांच्या हक्काबाबत हरकत असेल त्यांनी दिनांक १५/१०/२०२५ रोजी, वेळ ११ वा., सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रामटेक यांच्या न्यायालयात हजर राहून आपली हरकत दाखल करावी.

अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, रामटेक

**सायटेशन/पब्लिक जाहीर नोटीस**

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मौदा यांच्या न्यायालयातील**
एम.जे.सी. क्र. ३०/२०२५
पेशी दिनांक : १६-१०-२०२५ प्रोसेस क्र. ११००/२०२५ दि. १०/०९/२०२५
अर्जदार : १. श्री. चंद्रमणी तुकाराम चव्हाण, वय-५१ वर्षे, रा. महालगाव, पो. मोरगाव, तह. मौदा, जि. नागपूर
२. श्री. शीलम तुकाराम चव्हाण, वय-४६वर्षे, रा. महालगाव, पो. मोरगाव, तह. मौदा, जि. नागपूर
३. श्री. प्रकाश तुकाराम चव्हाण (मृत्यु). यांचे वारसदार
३-अ) विशाल प्रकाश चव्हाण, वय- ३४ वर्षे
३-ब) रश्मी प्रकाश चव्हाण, वय- ३६ वर्षे
३-क) स्वाती प्रकाश चव्हाण, वय- ३८ वर्षे
३-ड) किरण प्रकाश चव्हाण, वय-५८ वर्षे
अनु.क्र. ३-अ ते ३-ड रा. महालगाव, पो. मोरगाव, तह. मौदा, जि. नागपूर
४. सौ. सुनंदा प्रमोद सवाईतुल, वय-६२ वर्षे रा. नागपूर
५. सौ. वनिता भिमराव फुले, वय-५३ वर्षे रा. भिलाई, जि. दुर्ग (छत्तीसगड)
विरुद्ध
गैरअर्जदार : सौ. चंदा अशोक वहाले, वय-५६ वर्षे, रा. २८१-ई, राजनाथ कॉलनी, नवापुरा होलर रोड, नगर निगम ऑफीस जवळ, भोपाळ (म.प्र.)
मयतदार : श्रीमती मीराबाई तुकाराम चव्हाण

सदरहू अर्जदारांनी कायदेशीर वारसान प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टच्या कलम VIII १८२७ अन्वये या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. श्रीमती मीराबाई तुकाराम चव्हाण, हे मौजा – महालगांव, पो. मोरगांव, तह. मौदा, जि. नागपूर येथे वास्तव्यास होते. अर्जदारांनी मयतदार श्रीमती मीराबाई तुकाराम चव्हाण द्वारा कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. श्रीमती मीराबाई तुकाराम चव्हाण यांचा मृत्यु दि. २५/११/२०१० रोजी झालेला आहे. सदर अर्जाच्या सुनावणीची तारीख कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क. स्तर मौदा, जि. नागपूर यांनी दिनांक १६/१०/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या पब्लिक/जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर कायदेशीर वारसान प्रमाणपत्र अर्जदारास देण्यास कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा. जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला लिगल हेअर सर्टीफिकेट (कायदेशीर वारसान प्रमाणपत्र)मंजूर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
आज दि. १०-०९-२०२५ रोजी माझ्या सहनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मौदा, जि. नागपूर

**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका – नागपूर शहर, जिल्हा – नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१२-२५६११७४
प्र.क्र. ७/३स्तु-३/तह.ना(शहर)/जवि-४८/२०२५ दिनांक : १२/०९/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार.
२. मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-१ अ.दि. १७/०३/२०२५
३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अस्था/डी-१/जन्म-मृत्यु आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५
४. अर्जदार श्री/श्रीमती शिवशंकर हुवराज शाहू, वय ४८ वर्षे, रा. हनुमान मांच मंदीर जवळ, कोलबास्वामी नगर, बिनाकी, नागपूर यांचा अर्ज दिनांक ०६/०५/२०२५

**-: जाहिरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार शिवशंकर हुवराज शाहू, वय ४८ वर्षे रा. हनुमान मांच मंदीर जवळ, कोलबास्वामी नगर, बिनाकी, नागपूर यांनी वडिल यांच्या मृत्युची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.
सदरहू हुवराज सितराम शाहू यांचा मृत्यु दिनांक ०२/०९/२०१३ रोजी मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्युचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्यांची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.
त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वत: जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहिरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.
उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



# बालांगण

जिज्ञासा

## कृष्णविवर म्हणजे नेमकं काय?



**हे** विश्व निर्माण झालं तेव्हा केवळ हायड्रोजन आणि हेलियम ही दोनच मूलद्रव्ये प्रचंड प्रमाणात अवकाशातत तयार झाली असं मानलं जातं. इतर मूलद्रव्यं म्हणजे ऑक्सिजन किंवा नायट्रोजन वगैरे ताऱ्यांमुळे निर्माण झाले. हायड्रोजनच्या अणूकेंद्रकांचं रुपांतर हेलियममध्ये करण्यामुळे ताऱ्यांना त्यांची उर्जा मिळते. तारा कित्येक हजार अब्ज वर्षे प्रकाशाची आणि उर्जेची निर्मिती करीत राहतो. तारे जन्माला येतात तसाच त्यांचा मृत्यूही होतो. अवकाशात एखाद्या ताऱ्याचा जन्म होण्यासाठी कित्येक अब्ज वर्षे लागतात. ताऱ्यांचे आयुष्यही कित्येक अब्ज वर्षांचे असते. आपला सूर्य सुमारे ४.५ अब्ज वर्षांपूर्वी निर्माण झाला आणि त्याचा अंत अजून सुमारे ५.५ अब्ज वर्षांनी होईल. ताऱ्याच्या अंतर्भागात असलेल्या हायड्रोजन वायूच्या प्रमाणावर त्याचं आस्तित्व अवलंबून असतं. हायड्रोजनपासून हेलियम तयार होणे त्याची उर्जा अवकाशात फेकली जाणे हे सलुरू आहे तोवर तारा जीवित असतो. त्याच्या अंतर्भागातील हायड्रोजन कमी कमी होतो तसा त्याचा प्रकाश अंधूक होत जातो. अखेर हायड्रोजन पूर्णपणे संपून जातो आणि ता-याचा अंत होतो. तोच ताऱ्याचा मृत्यू. त्याजागी न दिसणारे काळे टिंब उरते तेच कृष्णविवर. कृष्णविवर म्हणजेच ब्लॅकहोल ही ताऱ्याची अंतिम स्थिती आहे.

## जग रेडिओ जॉकींचं



**रे**डिओ जॉकी म्हणजे आर जे होण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आकर्षक आणि स्पष्ट आवाज,लोकांशी संवाद साधण्याची कला आणि हजरजबाबीपणा. या क्षेत्रात करिअर करायचं असल्यास किमान १२ वी उत्तीर्ण असणं आवश्यक आहे. त्यानंतर कोणत्याही विषयात पदवी घेता येते. मात्र मीडियामध्ये करिअर करायचं असेल तर मास कम्युनिकेशन, जरनॅलिझम किंवा मीडिया स्टडीज यामध्ये पदवी किंवा डिप्लोमा केल्यास जास्त संधी मिळतात. यासाठी विशेष अभ्यासक्रम जसे की डिप्लोमा इन रेडिओ जॉकींग किंवा ३ ते ६ महिन्यांचे सर्टिफिकेट कोर्सेस, डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन किंवा बी. ए. इन मास मीडिया करता येतात. भारतात झेवियर इंस्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन, मुंबई , इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन, दिल्ली, रेडिओ सिटी स्कूल ऑफ ब्रॉडकास्टिंग, जामिया मिलिया इस्लामिया दिल्ली आणि एफ टी आय आय, पुणे अशा संस्थांमध्ये प्रशिक्षण घेता येते. याशिवाय अनेक प्रायव्हेट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट्स आणि ऑनलाइन कोर्सेस देखील उपलब्ध आहेत. सुरुवातीला कॉलेज फेस्ट, स्टेज अँकरींग किंवा इव्हेंट होस्टिंग करून अनुभव घ्या. तसेच स्वतःचे पॉडकास्ट, युट्यूब किंवा इंस्टा रील्स बनवण्याचा प्रयत्न करून पाहा. रेडिओ चॅनलमध्ये इंटर्नशिप करून व्यावसायिक अनुभव घेतल्यास पुढे रेडिओ जॉकी म्हणून करिअरची सुरुवात सहज करता येते.

वेगळ्या वाटा

## लक्झेंबर्ग युरोपचे हृदय

सफर देशांची



**ल**क्झेंबर्ग हा पश्चिम युरोपमधील एक लहान पण अत्यंत महत्त्वाचा देश आहे. या देशाची राजधानी लक्झेंबर्ग शहर असून येथे ग्रँड ड्यूक हा राज्यप्रमुख असतो. सध्या ग्रँड ड्यूक हेन्री हे राज्यप्रमुख आहेत. लक्झेंबर्ग हे संविधानिक राजेशाही पद्धतीवर चालते. देशाचे भौगोलिक क्षेत्रफळ फक्त २५८६ चौ. कि.मी. आहे. पण आर्थिक व राजकीय महत्त्वामुळे या देशाला जागतिक नकाशावर विशेष स्थान आहे. जगभरातील मोठ्या कंपन्यांची मुख्यालये किंवा युरोपियन ऑफिसेस लक्झेंबर्गमध्ये आहेत कारण इथे चांगल्या करसवलती मिळतात आणि इथली बँकिंग प्रणाली सुरक्षित आहे. लोखंड व पोलाद उद्योग हा लक्झेंबर्गचा पूर्वीचा मुख्य व्यवसाय होता. परंतु आता बँकिंग, वित्तीय सेवा, गुंतवणूक, विमा,माहिती तंत्रज्ञान हा लक्झेंबर्गच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधारआहे. पर्यटनातूनही या देशाला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते. या देशाची अधिकृत भाषा तीन आहेत. लक्झेंबर्गिश, फ्रेंच आणि जर्मन. शिक्षण व प्रशासकीय कामकाजात सर्व भाषांचा वापर होतो. लोकसंख्या अंदाजे ६.८ लाख आहे.त्यात परदेशी नागरिकांची संख्या जास्त आहे. इथली आरोग्यसेवा, सार्वजनिक सुविधा आणि राहणीमान अत्यंत उच्च दर्जाचे आहे. जगातील सर्वांत श्रीमंत व विकसित देशांमध्ये लक्झेंबर्गचा समावेश आहे. युरोपियन युनियनच्या अनेक महत्त्वाच्या संस्था इथे आहेत, त्यामुळे लक्झेंबर्गला 'युरोपचे हृदय' म्हटले जाते. लक्झेंबर्ग शहरातील प्राचीन किल्ले आणि किल्ल्याभोवतीची वास्तुकला युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट आहे.

## रंजक फुटबॉल

फन टाईम



**फु**टबॉलपटू लियोनल मेस्सीला जगातल्या सर्वोकृष्ट फुटबॉलपटूचा पुरस्कार मिळाला आहे. त्याने हा पुरस्कार सहाव्यांदा पटकावला आहे. या पुरस्काराला 'बॅलॉन डी ओर' (गोल्डन बॉल) असं म्हटलं जातं. हा किताब सहाव्यांदा पटकावणारा मेस्सी हा जगातला पहिलाच फुटबॉलपटू. मेस्सी अर्जेंटिनाकडून फुटबॉल खेळतो. त्याला २००९ मध्ये पहिल्यांदा या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. त्यानंतर २०१०, २०११, २०१२ आणि २०१५ मध्येही त्याला हा पुरस्कार देण्यात आला.

ख्रिस्तियानो रोनाल्डोने हा पुरस्कार पाच वेळा पटकावला आहे. फिफा विश्वचषकात सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूला 'गोल्डन बूट' किंवा 'गोल्डन शूज' हा पुरस्कार दिला जातो. १९८२ पासून या पुरस्काराला सुरुवात झाली. त्यावेळी हा पुरस्कार 'गोल्डन शू' या नावाने ओळखला जायचा. २०१० मध्ये या पुरस्काराचं नाव बदलून 'गोल्डन बूट' असं करण्यात आलं.

फुटबॉल या खेळाचा शोध चीनमध्ये लागल्याचं बोललं जातं. चीनी भाषेत या खेळाला 'कुजू' म्हटलं जायचं. २००२ मध्ये ऑलिव्हर कान या खेळाडूला 'गोल्डन बूट' पुरस्कार देण्यात आला होता. तो हा पुरस्कार मिळवणारा पहिला आणि एकमेव गोलकिपर होता. १९०० मधल्या पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेपासून फुटबॉलचा समावेश करण्यात आला. १९७३ मध्ये पहिल्यांदा फुटबॉल सामन्याचं थेट प्रक्षेपण करण्यात आलं.

## कोणे एके काळी orkut

स्मार्ट ग्यान

**दो**स्तांनो, जगभरात फेसबुक, व्हॉटस ॲप वापरणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. तुमच्या पिढीला फेसबुक, व्हॉट्स ॲप शिवाय करमतच नाही. यासोबतच ट्विटर, इंस्टाग्रामसारख्या साईट्सही आहेत. या साईट्सच्या लोकप्रियतेमुळे बऱ्याच सोशल नेटवर्किंग साईट्सना गाशा गुंडाळावा लागला. अशाच काही डब्यात गेलेल्या साईट्सविषयी...

■ २०११ मध्ये धूमधडाक्यात सादर करण्यात आलेली गूगल प्लस ही साईट बंद झाली. फेसबुक, व्हॉट्स अपसारख्या सोशल नेटवर्किंग साईट्सशी स्पर्धा करणं गूगल प्लसला काही जमलं नाही. या साईटची लोकप्रियता घटत गेली. इतकंच नाही, तर ही साईट फार सुरक्षितही नव्हती. त्यामुळे एप्रिल २०१९ मध्ये ती बंद करण्यात आली.

■ साधारण दहा वर्षांपूर्वी तरुणाईमध्ये ऑर्कुट ही साईट खूप लोकप्रिय होती. फेसबुक आल्यानंतर लोकांनी ऑर्कुट वापरणं बंद केलं. यामुळे या कंपनीनेही २०१४ मध्ये गाशा गुंडाळला. ऑर्कुट आता इतिहासजमा झालं आहे.

■ ब्लॅकबेरीने आपली मेसेंजर ही इंस्टंट मेसेजिंग सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला.

■ ट्विटरची वाईन नावाची सेवा होती. कंपनीने ही सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला. ही व्हिडिओ लूप सेवा होती. याद्वारे युजर्स फक्त सहा सेकंदांचा व्हिडिओ बनवू शकत होते. मात्र स्पर्धेत ही सेवा मागे पडली.

■ १९९० मध्ये लोकप्रियतेच्या शिखरावर असणाऱ्या याहू मेसेंजरनेही गाशा गुंडाळला. याहू मेसेंजर स्पर्धेत टिकून राहू शकली नाही.




## बना टी टेस्टर

कोण होणार?



**दो**स्तांनो, तुमच्या घरातही आई–बाबांना, आजी–आजोबांना उठल्या उठल्या चहा लागतो का? भारतात चहाबाजांची कमतरता नाही. दररोज एकापेक्षा अधिक चहा पिणारेही बरेच आहेत. चहाशिवाय अनेकांचा दिवसही सुरू होत नाही. बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे चहा उपलब्ध आहेत. या चहाची चव बघून तुम्ही भरपूर पैसे कमवू शकता, हे माहीत आहे का! यासाठी तुम्ही टी सोमिलियर किंवा टी टेस्टर बनायला हवं. या क्षेत्रात करीअर केल्यानंतर चहाच्या वेगवेगळ्या प्रकारांबद्दल तुम्ही माहिती देऊशकता. तसंच कोणत्या चहासोबत काय खायला हवं हे सुद्धा सांगू शकता. देशातल्या मोठमोठ्या हॉटेल्सना अशा टी टेस्टर्सची गरज असते. तसंच आता कॉफी शॉप्सप्रमाणे टी शॉपही सुरू झाले आहेत. या ठिकाणीसुद्धा तुम्ही काम करू शकता.

बॉटनी, फूड सायन्स तसंच हॉर्टिकल्चरचे विद्यार्थी हे क्षेत्र अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतात. बिर्ला इन्स्टीट्यूट ऑफ फ्युचरिस्टिक स्टडीज, इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ प्लांटेशन मॅनेजमेंट आणि आसाम ॲग्रीकल्चरल युनिव्हर्सिटीमध्ये या विषयाशी संबंधित अभ्यासक्रम शिकवले जातात. हा अभ्यासक्रम सहा महिने ते एक वर्षापर्यंतचा असतो. आसाम, पश्चिम बंगालमध्ये चहाचे मळे आहेत. चहाची लागवड कशी करायची, रोपट्यांची निवड कशी करायची, याबाबतचे सल्ले तुम्ही देऊ शकता. या क्षेत्रात सुरूवातीला ७ हजार ते ५० हजार रूपयांपर्यंत उत्पन्न मिळू शकतं. पुरेशा अनुभवानंतर यात वाढ होते. वेगळा पर्याय म्हणून तुम्ही टी टेस्टींगची वाट निवडू शकता.

ठिपके जुळवा



## सियाचिनविषयी...

गंमत जंमत

**दो**स्तांनो, तुम्ही ग्लेशियर्सबद्दल ऐकलं आहे का? ग्लेशियर्स म्हणजे हिमनदी. आपल्या देशात सियाचिन हे ग्लेशियर आहे. सियाचिनमध्ये आपले सैनिक अहोरात्र पहारा देत असतात. इथलं तापमान खूप कमी असतं. मात्र अशा वातावरणातही आपले सैनिक डोळ्यात तेल घालून आपल्या सीमांचं रक्षण करतात. हिमालयातल्या पूर्व काराकोरम पर्वतरांगांमध्ये सियाचिन वसलं आहे. सियाचिन ही जगातली सर्वात उंचावरची युद्धभूमी आहे.



सियाचिनवर पाकिस्तानचा डोळा आहे. त्यामुळे आपल्या सैनिकांना हुडहुडी भरवणाऱ्या थंडीतही तिथे रहावं लागतं. सियाचिन परिसरातलं तापमान उणे साठ अंश सेल्सियसच्या खालीही जाऊ शकतं. आपल्याला थंडी वाजू लागल्यावर आपण लगेच स्वेटर घालतो. आपल्याला थोडी थंडीही सहन होत नाही. पण सैनिक देशासाठी लढत असतात. इतकंच नाही, तर इथे ऑक्सिजनचं प्रमाणही कमी असतं. या भागात फक्त दहा टक्के ऑक्सिजन असल्यामुळे सैनिकांपुढे मोठं आव्हान असतं. सियाचिनमध्ये भारताचे तीन हजार सैनिक नेहमी तैनात असतात. प्रत्येक सैनिक साधारण तीन महिने या भागात रहतो. प्रतिकूल तापमानामुळे कोणीही तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ सियाचिनमध्ये राहू शकत नाही. तिथे एक बादली पाणी गरम करण्यासाठी सुमारे तीन तास लागतात. पाणी पिण्यासाठी सैनिकांना बर्फ स्टोव्हवर वितळून घ्यावा लागतो. मशिन गन्स जाम होऊन नयेत म्हणून उकळत्या पाण्यात बुडवून ठेवल्या जातात!

भरा रंग



जिज्ञासा

## ओळखा पाहू

१) जगातलं पहिलं वर्तमानपत्र कोणत्या देशात सुरू झालं?
२) 'अल खझ्नेह' ही ऐतिहासिक वास्तू कुठे आहे?
३) काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर सुभाषचंद्र बोस यांनी कोणत्या पक्षाची स्थापना केली?
४) 'बुद्ध चरिता' या ग्रंथाचा लेखक कोण?
५) चीनी प्रवासी हियुइन टी सँगने कोणत्या विद्यापीठातून शिक्षण घेतलं?
६) कापड उद्योगासाठी कापसाची लागवड सर्वप्रथम कुठे करण्यात आली?
७) संपूर्ण भारतावर राज्य करणारा पहिला भारतीय राजा कोणता?
८) थोर संस्कृत व्याकरणकार पाणिनी यांचा काळ कोणता?
९) देशात मुघल साम्राज्याची सुरूवात खऱ्या अर्थाने कोणत्या लढाईनंतर झाली?
१०) २०२० मध्ये २०–२० क्रिकेटचा विश्वचषक कोणत्या देशात झाला?

उत्तर : १) चीन २) पेत्रा ३) फॉरवर्ड ब्लॉक ४) अश्वघोष ५) नालंदा ६) इजिप्त ७) चंद्रगुप्त मौर्य ८) ख्रिस्तपूर्व सहाव्या आणि पाचव्या शतकादरम्यान ९) पानिपतची दुसरी लढाई १०) ऑस्ट्रेलिया

दोस्त हे मस्त

### प्राण्यांची अजब दुनिया



छोट्यांनो, प्राण्यांच्या जगात बरंच काही घडत असतं. प्राण्यांचं जगही अनोखं आहे. आता हत्तीचंच बघा. हत्तीला उडी मारता येत नाही. उडी मारता न येणारा हत्ती हा एकमेव प्राणी आहे. आपल्या आसपास दिसणाऱ्या मुंग्या कधी झोपत नाहीत. शिवाय त्यांना फुफ्फुसही नसतं. ब्लू व्हेलच्या जिभेचं वजन एखाद्या कारएवढं किंवा हत्तीच्या पिल्लाएवढं असतं. गाय आपल्या आयुष्यात जवळपास दोन लाख ग्लास दूध देते.

खादाडी

### स्टफ्ड रोटी



मुलांनो. उरलेल्या पोळीपासून स्टफ्ड रोटी बनवता येईल. यासाठी दोन ते चार पोळ्या, एक वाटी उकडलेल्या भाज्या, एक बारीक चिरलेली काकडी, बारीक चिरलेले दोन टोमॅटो आणि एक कप किसलेलं चीज असं साहित्य घ्या. आता एक पोळी घ्या. त्यावर उकडलेल्या भाज्या घाला. त्यावर टोमॅटो आणि काकडी घाला. त्यावर चीज घाला. यानंतर पोळी दुमडून घ्या. आता ही पोळी तव्यावर भाजून घ्या. गरमागरम खा.

स्टडी टिप्स

### गोडी गणिताची



मुलांनो, गणितात चांगले गुण मिळवायचे असतील तर आपल्या आयुष्यातली गणितं सोडवायला सुरूवात करा. आपल्या वाढदिवसापासून सुरुवात करा. वाढदिवसाच्या खर्चाचा हिशेब तुम्हीच मांडा. वाढदिवसाला किती मित्रमैत्रिणी येणार, त्यांच्यासाठी किती वस्तू लागतील, कोणते गेम्स खेळावे लागतील हे सगळं तुम्हीच ठरवा. अशा छोट्या छोट्या गोष्टींमधून तुम्ही गणित शिकत जाल आणि पुढे गणिताची गोडी लागेल.

योगा टाईम

### करा उदानमुद्रा योग



दोस्तांनो, योगासनांमुळे आपलं सर्वांगिण आरोग्य उत्तम राहतं. आपण तंदुरुस्त राहतो. इतकंच नाही, तर आरोग्यविषयक समस्याही दूर होतात. चेहरा तजेलदार दिसण्यासाठी तुम्ही उदानमुद्रा योग करू शकता. मुद्रेमुळे चेहरा खूप छान, उजळ दिसतो. हे आसन करण्यासाठी तुम्हाला पद्मासनात बसावं लागेल.

# वर्धा जिल्ह्यात पावसाने हाहाकार!

## तिघे वाहून गेले : भिंत कोसळून एकाचा मृत्यू : आमदार घटनास्थळी : पंचायत वास्तू पाण्यात





■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. १२ :

गुरुवारी रात्री पासून कोसळणाऱ्या पावसाने जिल्ह्यास बेदम झोडपून काढले आहे. पाणीच पाणी चहुंकडे, गेला रस्ता कुणीकडे अशी ग्रामीण भागातील रस्त्यांची दुर्दशा झाली आहे.

शहरात शासकीय कार्यालये ओस पडली असून जनजीवन ठप्प पडले आहे. आज पण बारा वाजतापासून पावसाने रिपरिप लावली आहे. अद्याप धरण भागात धोकादायक स्थिती नसल्याचे सांगण्यात आले आहे.

धुवाधार पावसाने कच्ची घरे कोसळून पडली आहेत. देवळी तालुक्यातील नाचणगाव येथे किरण बुजाडे या ३२ वर्षीय युवकाचा घराची भिंत अंगावर पडल्याने जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे. दहेगाव स्टेशन गावातील नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला. परिणामी गावातील बोगद्यात तलाव झाला. त्याचवेळी काही गावकरी वायफड येथून दवाखान्यात उपचार आटोपून परत येत होते. तेव्हा रात्री १२ वाजताच्या सुमारास घाई करीत ऑटो चालकाने बोगद्यातून ऑटो टाकला.

पाण्याचा अंदाज न आल्याने ऑटो पाण्यात वाहू लागला. पाच गावकऱ्यापैकी तीन उतरू शकले.

ते गावात परतले. त्यांनीच दोघे वाहत गेल्याचे पोलीस पाटील संजय खोब्रागडे यांना कळविले. लगेच धाव घेत गौरव गावंडे व अन्य लोकांनी ऑटो चालक व प्रभाकर पंचभाई हे वाहत जात असतांना त्यांना पुरातून बाहेर काढले. आता सर्व सुखरूप आहेत. यशोदा नदीला पूर आल्याने आलमडोह ग्रामपंचायत इमारत पाण्यात गेली आहे. तसेच आलमडोह ते अल्लीपूर वाहतूक बंद पडली आहे. तसेच वर्धा राळेगाव मार्ग ठप्प पडला आहे.

आमदार राजेश बकाने हे म्हणतात की पुरामुळे स्थिती फार खराब झाली आहे. भिंत पडून मृत्यू झालेल्या कुटुंबासोबतच मी आता आहे. टिन पडल्याने हा अपघात झाला. मृत व्यक्तीचे आईवडील यांना अन्यत्र आश्रय दिला. तसेच शिधा भांडी पुरविली.

शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर शासनाची चार लाख रुपयाची सानुग्रह मदत लवकरच मिळेल. या पावसाने शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. रस्ते पण उखडले.

शेतकरी मोठ्या संकटात सापडल्याचे दुर्दैवी चित्र आहे.

आपण पालकमंत्री डॉ. पंकज राजेश भोयर यांना भेटून विशेष मदतीची मागणी करणार आहोत. सर्व मार्गी लागेपर्यंत मी गावातच थांबणार. दोन दिवसातील पावसाने जिल्ह्यात सार्वत्रिक हजेरी लावली असून काही तालुक्यात माहिती घेणे सूरू असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, मुसळधार पावसाने जीनजीवन विस्कळीत झाले आहे.

# सरकारकडून ओबीसींचा विश्वासघात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील वांगदारी गावातील भरत कराड या ३५ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याचे वृत्त आहे. हे वृत्त धक्कादायक आहे. ओबीसी आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या निराशेने या तरुणाने टोकाचे पाऊल उचलल्याचे समजते. गेले काही दिवस मुख्य मंत्र्यांपासून ते ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष सांगतात की सरकारच्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजाच्या हक्कावर गदा येणार नाही पण हाच सरकारचा विश्वासघात आहे, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.



मराठा समाजासाठी काढण्यात आलेल्या जी आरमध्ये आधी पात्र हा शब्द होता आणि अवघ्या काही तासात दुसरा जी आर काढून त्यातून पात्र हा शब्द वगळण्यात आला,इथेच ओबीसी समाजाचा घात सरकारने केला. सरकार आणि त्यांचे मंत्री वारंवार ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही अशी भाषा करत असले तरी सत्य मात्र वेगळ आहे. आणि हे आता जनतेला कळले आहे यातूनच निराशा येत आहे.

अनेक ठिकाणी तर मंत्र्यांपासून संत्र्यानी ओबीसी प्रमाणपत्र मिळवल्याची चर्चा सुरू आहे. आता जर धनाढ्य मंत्र्यांनी पण ओबीसी आरक्षणात घुसखोरी केली तर सामान्य ओबीसींच्या अधिकाराला हा धक्का नाही का? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

**सरकारला जाग येणार आहे का?**

वडेट्टीवार म्हणाले की, लातूर इथे ऐन उमेदीतील तरुण भरत कराड याची आत्महत्या ही सरकारसाठी धोक्याची घंटा आहे. सरकारच्या शासन निर्णयामुळे मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर कुणबी प्रमाणपत्र वाटप होणार आहे. यामुळे ओबीसींच्या आरक्षणात घुसखोरी वाढणार असून मराठवाड्यात तर एकतर्फी मराठा समाज ओबीसी आरक्षणात प्रवेश करण्याचा धोका आहे.

लातूर येथील तरुणाची आत्महत्या हे तेच दर्शवत आहे, अस वडेट्टीवार म्हणाले. मराठवाड्यातील तरुणाने टोकाचे पाऊल उचल्यावर तरी सरकारला जाग येणार आहे का? ज्या शासन निर्णयाने ओबीसी समाजाचे नुकसान होईल त्या शासन निर्णयाला स्थगिती दिली पाहिजे अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवर यांनी केली.

**कराडचे बलिदान वाया जाणार नाही**

वडेट्टीवार म्हणाले की, लातूर जिल्ह्यातील भरत कराड या ३५ वर्षीय तरुणाने ओबीसी समाजाचे आरक्षण हिरावून घेऊ नये म्हणून आत्महत्या केली. सरकारने काढलेला जी आर ओबीसींना उध्वस्त करणारे आहे असे पत्र लिहून ओबीसींच्या लढ्यासाठी स्वतःचे बलिदान दिले आहे.

हा जी आर काढून सरकारने ओबीसींवर अन्याय केला आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही सांगते पण सरकार दिशाभूल करत आहे. या आत्महत्येला महायुती सरकार जबाबदार आहे.

सरकारने काढलेला जी आर रद्द करा नाहीत तरुणांमध्ये जो राग निर्माण झाला आहे त्याचा उद्रेक होऊ देऊ नये.कराडचे बलिदान वाया जाणार नाही, जोपर्यंत जी आर रद्द होत नाही आणि घुसखोरी थांबत नाही त्यासाठी लढत राहू! तरुणांना आवाहन करत आहे आत्महत्या करू नये, असेही ते म्हणाले.

### मराठवाड्यात अतिवृष्टीने पिकांचे नुकसान

वडेट्टीवार म्हणाले की, लातूर येथील भरत कराड याची ही आत्महत्या नाही तर सरकारने विश्वासघात केल्याने त्याचा जीव गेला आहे, त्यामुळे याची जबाबदारी महायुती सरकारला घ्यावी लागणार आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर आले आहे. मराठवाड्यात अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाले आहे,त्यात शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी या सरकारने दोन समाजात भांडण लावले आहे. लोकांच्या मनात द्वेष पसरवला आहे.

महायुती सरकारच्या काळात शेतकरी, कष्टकरी , कंत्राटदार आणि आता ओबीसी समाजातील तरुण आत्महत्या करत आहे. त्यामुळे परिस्थिती चिघळण्याआधी सरकारने तातडीने यातून मार्ग काढावा आणि जी आर मागे घ्यावा. राज्यातील ओबीसी समाजातील तरुणांना आवाहन आहे की त्यांनी कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये. ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी एकीकडे न्यायालयीन लढाई तर दुसरीकडे शासन पातळीवर पाठपुरावा करण्यात येत आहे त्यामुळे आपल्या हक्कासाठी आपल्याला एकत्र लढायचे आहे यात कोणीही जीवावर बेतेल अस कृत्य करू नये अस आवाहन विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केले.

## महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणीचा
# होमिओपॅथिक डॉक्टर्सच्या मार्ग मोकळा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

होमिओपॅथी डॉक्टरांनाही ॲलोपॅथी प्रॅक्टिस करण्याची परवानगी द्यावी, यासाठी मागील अनेक वर्षांपासून लढा सुरू होता. अखेर महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

राज्यात ९० हजार होमिओपॅथी डॉक्टर्स आहेत. यापैकी १५ हजार डॉक्टरांनी सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकोलॉजी हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. त्यांचा लगेच ॲलोपॅथी प्रॅक्टिस सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यातील होमिओपॅथिक डॉक्टर्सना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी करण्याचा मार्ग अखेर खुला झाला आहे. या निर्णयामुळे होमिओपॅथिक क्षेत्रातील

### ९० हजार डॉक्टरांचा तिढा अखेर सुटला

डॉक्टर्सना नवे दालन खुले होणार असून रुग्णसेवेला नवी दिशा मिळणार आहे. महाराष्ट्र होमिओपॅथिक परिषदेचे प्रशासक डॉ. बाहुबली शाह, डॉ. रजनी इंदुलकर आणि डॉ. बाळासाहेब पवार यांच्या नेतृत्वात झालेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे यश आले आहे.

या प्रक्रियेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसेच वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांचे सहकार्य मिळाले, असे प्रशासक म्हणाले. राज्यातील होमिओपॅथिक संघटनांचे पदाधिकारी व अनेक अग्रणी डॉक्टर्स सुरुवातीपासून सक्रिय राहिले. यामध्ये डॉ. अरुण भस्मे, डॉ. प्रकाश झांबड, डॉ. हरीश नागतकर यांचा महत्त्वाचा सहभाग आहे.?

**दरवर्षी ५० डॉक्टरांना देता येईल प्रशिक्षण?**

या विषयावर सातत्याने प्रभावी भूमिका बजावणारे डॉ. प्रकाश झांबड (माजी उपाध्यक्ष, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी) यांनी महाराष्ट्र मेडिकल काउंसिलमध्ये नोंदणीचा फायदा डॉक्टर्स आणि रुग्णांना कसा होईल, याबद्दल सातत्याने मुद्दा पटवून दिला. दरवर्षी प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयात ५० डॉक्टरांना हे प्रशिक्षण देता येणार आहे.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर धडक मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. १२ :

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर तोडगा काढावा, या मागणीसाठी आज शुक्रवारी शहरात शेतकरी चळवळ व संभाजी ब्रिगेडच्या नेतृत्वात धडक मोर्चा काढण्यात आला.

संविधान चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून निघालेला हा मोर्चा घोषणाबाजीसह जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. मोर्चाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मूलभूत व तातडीच्या मागण्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे सादर करण्यात आल्या.

यामध्ये इ पिक पाहणीतील त्रुटी दूर करून कालावधीवाढ, कापूस व सोयाबीनला हमीभाव,कापूस आयातबंदी, किसान ॲपमधील त्रुटी दूर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत, ओला दुष्काळ जाहीर करणे, कर्जमाफीची अंमलबजावणी,, सीसीआय व नाफेडच्या खरेदी व्यवस्थेत सुधारणा अशा मागण्या आहेत.

या मोर्चामध्ये संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अभिलाश खंडारे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षा वर्षा निकम, शहर काँग्रेस अध्यक्ष प्रा.डॉ.बबलू उर्फ अनिल देशमुख, ॲड.सीमा तेलंगे, शेतकरी आंदोलक सचिन मनवर, प्रा.पंढरी पाठे, शेतकरी नारायण बेंडे, शुभम बेंडे, विद्या परचाके, यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# एआय द्वारे कर्करोगाचे निदान अधिक सोपे

## : साप्ताहिक संवाद :

लोकरंग

मागील काही महिन्यापासून सर्वच क्षेत्रात सातत्याने एआय चा सातत्याने उल्लेख होताना दिसतो आहे. एआय अर्थात आर्टिफिशिअल इंटीलीजेंस म्हणजेच कृत्रिम प्रज्ञा.

विज्ञानाची क्रांती इतक्या झपाट्याने होतेय कि ती आता ए आय तंत्रापर्यंत येऊन पोहचलेली आहे. याच एआय च्या माध्यमातून सर्वच क्षेत्रातील कठीण गोष्टी या सुलभ होणार आहेत. वैद्यकीय क्षेत्रात देखील याच एआय तंत्राच्या द्वारे कर्करोगासारख्या जीवघेण्या आजाराचे निदान करणे अगदी सोपे होणार आहे. याच अनुषन्गाने स्पेशालिटी सर्जिकल ऑन्कोलॉजी कॅंसर हॉस्पिटलचे डॉ. संकेत मेहता यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**एआय आधारित कॅन्सरचे निदान नेमके कसे सोपे झालेले आहे ?**

■ एआय आधारित कॅन्सरचे अगदी सहज निदान करणे आता शक्य झालेले आहे. क्युअर ए आईचे ए आय आधारित इन्सिडेंटल पल्मोनरी नोंदूल डिटेक्शन टूल कॅंसर उपचार प्रक्रियेत वापरले जाणार आहे.

हे साधन फुप्फुसातील ६ मिमी एवढ्या लहान गाठीहि छातीच्या सध्या एक्स रे मधून शोधू शकते. त्यामुळे फुफ्फुसाचा कर्करोग लवकर ओळखता येऊन वेळीच उपचार करता येणे शक्य होणार आहे. गाठीचे निदान होताच रुग्णला शल्यविशारद, फुफ्फुसरोग तज्ञ आणि कॅंसर तज्ञांशी सहज जोडता येणार आहे.

**हे निदान साधन कशा प्रकारे मदत करते?**

■ फुफ्फुसातील गाठी म्हणजे बहुदा लहान ठिपके असतात जे बहुदा यासंबंधित कारणामुळे रुग्णाच्या छातीचा एक्सरे किंवा सिटी स्कॅन केल्यावर योगायोगाने आढळतात.

अनेक गोष्टी निरुपद्रवी असतात. परंतु काही सुरवातीच्या टप्प्यातील फुफुसाचा कर्करोग असू शकतो. या गाठी लवकर शोधणे आणि त्यांचे निरीक्षण करणे महत्वाचे आहे. कारण फुफुसाच्या कर्करोगाचे दुसऱ्या किंवा तिसऱ्या टप्पायचे निदान हे पहिल्या टप्पयात आढळलेल्यया कर्करोगाला सुधारण्यास मदत करते. एकदा कर्करोग आल्यानंतर रुग्णाला थोरॅसिक सर्जन, फुफुसशास्त्रज्ञ आणि कर्करोगतज्ञाशी जोडून लवकरात लवकर उपचार सुरु करता येतात. निदान आणि उपचार जलद गतीने करून रुग्णाचे प्राण वाचविण्यासाठी हे ए आय तंत्र फायद्याचे ठरणार आहे.

**याच तंत्राच्या आधारे इतर प्रकारचे कर्करोग देखील शोधता येणार आहेत का?**

■ होय फुफ्फुसाच्या कर्करोगाप्रमाणेच ए आय तंत्राचा वापर करून अन्न नलिकेच्या किंवा तोंडाच्या कर्करोगाचे देखील निदान करता येणे शक्य होणार आहे. तसेच पुरुषांमध्ये आढळणाऱ्या अंडकोशाच्या कर्करोगाचे, महिलांमधील स्तनाच्या कर्करोगाचे, रक्ताच्या कर्करोगाचे देखील निदान आता सहज शक्य होणार आहे. निदान आणि शस्त्रक्रियेची आखणी यात ए आय चा वापर केल्याने आता रुग्णाच्या आजाराचे वेळीच निदान होऊन योग्य उपचारांद्वारे रुग्णाला जीवदान मिळणार आहे. ■ ■ ■

## लडाख मॅरेथॉनच्या १२ व्या आवृत्तीसाठी स्निकर्स, पुमा, बिस्लेरी यांच्याशी हातमिळवणी



जगातील सर्वात उंच एआयएमएस-प्रमाणित मॅरेथॉन असलेल्या लडाख मॅरेथॉनने या सप्टेंबरमध्ये विक्रमी सहभागासह १२ व्या आवृत्तीत प्रवेश करत सात भागीदारांसह आपला कॉर्पोरेट पाठिंबा बळकट केला आहे.

११ ते १४ सप्टेंबर दरम्यान नियोजित या मॅरेथॉनमध्ये भारत आणि इतर ३० देशांमधून ६,६०० हून अधिक धावपटू एकत्र येतील, जे त्याच्या इतिहासातील सर्वात मोठे क्षेत्र आहे, तसेच लक्षणीय व्यावसायिक रस आकर्षित करत राहतील आणि जागतिक स्तरावर एक प्रमुख धावण्याच्या कार्यक्रम म्हणून आपले स्थान मजबूत करत राहतील.

या प्रयत्नाचा एक भाग म्हणून खात्री करण्यासाठी, प्रशासकीय समर्थक, लडाख केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासन विशेषतः लडाख पोलिस आणि लेहचे आरोग्य विभाग लडाख स्वायत्त टेकडी विकास परिषद, भारतीय हवाई दल, भारतीय लष्कर, भारतीय लष्कराचे अग्निशमन आणि फ्युरी कॉर्प्स, सीमा रस्ते संघटना आणि २७ स्थानिक समुदाय यांच्याकडून महत्त्वाची ऑन-ग्राउंड मदत पुरवली जाईल. त्यांच्या लॉजिस्टिक समर्थनामुळे लेह, खारदुंग ला आणि नुब्रा येथे सुरक्षित आणि अखंड अंमलबजावणी होईल.

या पायावर उभारलेले, २०२५ साठी कॉर्पोरेट रोस्टर कार्यक्रमाची प्रतिष्ठा आणखी वाढवते. स्निकर्स हंगर पार्टनर म्हणून सामील होत आहे , तर पुमा अपॅरल पार्टनर म्हणून त्यांची भूमिका मजबूत करणार आहे आणि बिस्लेरी हायड्रेशन पार्टनर म्हणून सुरू राहणार आहे.

एनरझल एनर्जी पार्टनर म्हणून, हॉटेल ग्रँड ड्रॅगन, लेह हॉस्पिटॅलिटी पार्टनर म्हणून, अकॉर्ड हॉस्पिटल हेल्थ पार्टनर म्हणून आणि बजाज अलियान्झ इन्शुरन्स पार्टनर म्हणून काम करेल. एकत्रितपणे, या भागीदारी लडाख मॅरेथॉन जागतिक दर्जाच क्रीडा आव्हान आणि प्रभावी ब्रँड सहकार्यासाठी एक व्यासपीठ कसे विकसित झाले आहे ते अधोरेखित करतात. ■ ■

# ऐतिहासिक पुणे



पुणे म्हटलं कि महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटन स्थळ. पुणे शहराला विद्येचं माहेर घर आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखलं जातं. पुणे शहरात अनेक पर्यटन स्थळं आहेत. ज्यामुळे अनेक पर्यटक विकएन्डला पुण्याला फिरायला जाण्याचा बेत आखतात. पुणे शहर मुंबई शहरापासून जवळ असल्याने शनिवार आणि रविवार पुण्यातील पर्यटन स्थळांना भेट देण्यास काहीच हरकत नाही. पुणे शहराला स्वतःची एक ओळख, संस्कृती आणि इतिहास आहे. पुणे शहरात कोणत्याही ऋतूत आल्हाददायक वातावरण असते..

शनिवार वाडा म्हणजे पुणे शहरातील एक ऐतिहासिक वास्तू. शनिवार वाडा ही पेशवेकालीन वास्तू आहे. या ठिकाणी पेशव्यांचे निवासस्थान होते. पहिले बाजीराव पेशवा यांनी सन १७३६ साली हा राजवाडा बांधला होता. त्या काळी या वाडा पुण्याच्या वैभवशाली संस्कृतीचे प्रतिक मानले जायचा.

मात्र इंग्रजांनी या वाड्यावर कब्जा केला आणि हा वाडा जाळून टाकला. आता या वास्तूंमधील सर्व अवशेष नष्ट झाले आहेत. वाड्याचा पाया आणि तटबंदीचा भाग अजूनही कायम आहे. हा वाडा पाहताना एक ऐतिहासिक वास्तू पाहण्याचा आनंद तुम्हाला नक्कीच मिळू शकतो.

गांधी मेमोरिअल सोसायटीचा हा आगा खान पॅलेस इटालियन बनावटीचा आहे. ब्रिटीश राजवटीमध्ये या पॅलेसचा उपयोग भारत छोडो आंदोलनात महात्मा गांधी, कस्तूरबा गांधी,महादेव भाई यांच्यासाठी तुरूंगासाठी करण्यात आला होता.

असं म्हणतात की महादेव भाई आणि कस्तूरबा गांधी यांनी याच पॅलेसमध्ये अखेरचा श्वास घेतला होता. या पॅलेसमध्ये त्यांचे स्मारकदेखील आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## पान १ वरून...

### आत्महत्येचा मार्ग...

अत्यंत कौतुकास्पद असे कृषी प्रदर्शनी आणि मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री बळीराजा रस्ते विकास योजना राज्यात आणण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, शेतीमध्ये बदल केले पाहिजे. रासायनिक खते आणि कीटकनाशके यावर अवलंबून तात्पुरते उत्पादन घेण्यात येते. मात्र, दीर्घकाळासाठी वापर जास्त केल्यास जमिनीची सुपीकता कमी होते. नैसर्गिक शेती ही काळाची गरज आहे. राज्यात सेंद्रीय शेती मिशन, जमिनीची आरोग्य पत्रिका, पाणी बचत आदी उपक्रम राबवण्यात येत आहेत. एआय कृत्रिम बुद्धिमत्तेचा अवलंब कृषी क्षेत्रात राबविण्याचा निर्णय घेतला असून शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी कृषीशी संबंधित अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. यात पीक विमासह नुकसान भरपाई, स्मार्ट प्रकल्प, नानाजी देशमुख कृषी संजीवन योजनेत जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. विविध प्रकारचे लाभ शेतकऱ्यांना देण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. उर्वरित शेतकऱ्यांनाही लवकरच लाभ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले . शेतकऱ्यांच्या आत्महत्या संपाव्यात यासाठी विविध प्रकल्प कृषी क्षेत्रात सुरू केले आहेत. त्यामुळे शेतकरी आत्महत्या कमी होत असून या आत्महत्या शुन्यावर आणायच्या आहेत. शेतकऱ्याप्रमाणेच शेत मजुरांसाठीही लवकरच योजना आणणार असल्याचे ॲड. जयस्वाल यावेळी म्हणाले.

**विविध सामंजस्य करार**

आर्ट आफ लिव्हिंग आणि जिल्हाधिकारी नागपूर यांच्यादरम्यान फिरते माती परीक्षण प्रयोगशाळेचा सामंजस्य करार करण्यात आला. या माध्यमातून आर्ट ऑफ लिव्हिंग कडून फिरते माती परीक्षण प्रयोगशाळा उपलब्ध होणार आहेत. सेंद्रीय शेती प्रमाणीकरण व शेतमाल विकत घेण्याचा करार करण्यात आला. यात रामटेक अग्रोव्हिजन फार्म प्रोड्युसर कंपनी आणि आर्ट आफ लिव्हिंग यांच्यात सामंजस्य करण्यात आला.

१५०० किलोमीटर नाला व तलाव खोलीकरण व रुंदीकरणाचा करार जिल्हाधिकारी नागपूर आणि आर्ट आफ लिव्हिंग यांच्यादरम्यान करण्यात आला. तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांच्या माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे, सेंद्रीय शेती आणि शाश्वत शेती या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. काही प्रगत शेतकऱ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. रामटेक येथे कौशल्य विकास केंद्र उभे करण्यात येणार असून याचीही माहिती कार्यक्रमादरम्यान देण्यात आली.

### राजकीय पक्षांमध्ये वाढता भ्रष्टाचार...

अहवालानुसार, देशात २७६४ मान्यताप्राप्त नसलेले पक्ष आहेत. यापैकी ७३% पेक्षा जास्त (२०२५) पक्षांनी त्यांचे आर्थिक रेकॉर्ड सार्वजनिक केलेले नाहीत. उर्वरित ७३९ नोंदणीकृत मान्यताप्राप्त नसलेले पक्षांनी त्यांचे रेकॉर्ड शेअर केले आहेत. या पक्षांचे विश्लेषण अहवालात करण्यात आले आहे.

देशातील ४७% मंत्र्यांवर गुन्हेगारी खटले आहेत.देशभरातील ३०२ मंत्र्यांनी (सुमारे ४७%) त्यांच्याविरुद्ध गुन्हेगारी खटले असल्याचे कबूल केले आहे. त्यापैकी १७४ मंत्र्यांवर खून, अपहरण आणि महिलांवरील गुन्हे असे गंभीर आरोप आहेत. केंद्र सरकारच्या ७२ मंत्र्यांपैकी २९ (४०%) मंत्र्यांनी त्यांच्याविरुद्ध फौजदारी खटले असल्याचे कबूल केले आहे.

### जि. प. आरक्षणाची जिल्हानिहाय यादी

| | |
|---|---|
| ठाणे | सर्वसाधारण (महिला) |
| पालघर | अनुसूचित जमाती |
| रायगड | सर्वसाधारण |
| रत्नागिरी | नामाप्र (महिला) |
| सिंधुदुर्ग | सर्वसाधारण |
| नाशिक | सर्वसाधारण |
| धुळे | नामाप्र (महिला) |
| नंदूरबार | अनुसूचित जमाती |
| जळगाव | सर्वसाधारण |
| अहिल्यानगर | अनु. जमाती (महिला) |
| पुणे | सर्वसाधारण |
| सातारा | नामाप्र (महिला) |
| सांगली | सर्वसाधारण (महिला) |
| सोलापूर | नामाप्र |
| कोल्हापूर | सर्वसाधारण (महिला) |
| छ. संभाजीनगर | सर्वसाधारण |
| जालना | नामाप्र (महिला) |
| बीड | अनुसूचित जाती (महिला) |
| हिंगोली | अनुसूचित जाती |
| नांदेड | नामाप्र |
| धाराशिव | नामाप्र (महिला) |
| लातूर | सर्वसाधारण (महिला) |
| अमरावती | सर्वसाधारण (महिला) |
| अकोला | अनुसूचित जमाती (महिला) |
| परभणी | अनुसूचित जाती |
| वाशिम | अनुसूचित जमाती (महिला) |
| बुलढाणा | सर्वसाधारण |
| यवतमाळ | सर्वसाधारण |
| नागपूर | नामाप्र |
| वर्धा | अनुसूचित जाती |
| भंडारा | नामाप्र |
| गोंदिया | सर्वसाधारण (महिला) |
| चंद्रपूर | अनुसूचित जाती (महिला) |
| गडचिरोली | सर्वसाधारण (महिला) |

# सकल हिंदू समाजाचा अकोल्यात मोर्चा



■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १२ :

१६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर चाकूच्या धाकावर अत्याचार प्रकरणाने अकोला शहर हादरले असून संतापाची लाट उसळली आहे. आरोपीला फाशी देण्याच्या मागणीसाठी सकल हिंदू समाजाच्यावतीने शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हजारो लोकांनी सहभाग घेऊन प्रकरणाचा निषेध केला. विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाकडे सादर करण्यात आले आहे.

शहरातील डाबकी रोड परिसरातील एका अल्पवयीन मुलीवर नराधमाने चाकूच्या धाकावर अत्याचार केला. या प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. शहराचे आराध्य दैवत श्री राजराजेश्ववर मंदिरातून मोर्चाला प्रारंभ झाला. प्रमुख मार्गावर मार्गक्रमण करून मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. याठिकाणी मोचार्चे जाहीर सभेत रुपांतर झाले. मोर्चात खासदार अनुप धोत्रे, अहिल्यानगर शहराचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांच्यासह विविध हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

संग्राम जगताप यांनी मोर्चाला संबोधित केले. प्रशासनाने झोपेचे सोंग घेतले होते. सकल हिंदू समाज एकत्र आल्याने पोलिसांनी आरोपीला परराज्यात अटक केली. आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, असे संग्राम जगताप म्हणाले.

अत्याचाराचे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवावे, नराधमाला फाशीची शिक्षा द्यावी, आरोपीचे घर उद्ध्वस्त करावे, आरोपींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करणारा समाज किंवा धर्मगुरूंनाही सहआरोपी म्हणून गुन्हे दाखल करावेत, पीडित मुलीसह तिच्या कुटुंबाला तातडीने २५ लाख रुपयांची आर्थिक मदत देऊन कायदेशीर मार्गदर्शन आणि पोलीस संरक्षण देण्यात यावे यासह अनेक मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.

# महासागर वृत्तसागर

नागपूर

■ शनिवार, दि. १३, सप्टेंबर २०२५ ■


## एमडी पावडर सेवन करणाऱ्या दोघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, कळमेश्वर, दि. १२ :

कळमेश्वर पोलिसांनी मिशन झीरो ड्रग्ज मोहिमेंतर्गत मोठी कारवाई करत कळमेश्वर एमआयडिसीतील पुरुषोत्तम लॉज या ओयो हॉटेलचा चालक व त्याच्या साथीदाराकडून तब्बल ४५ हजार रुपये किमतीचा एवज १.७० ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी ड्रग्ज) जप्त केले. सोमवार दिनांक ९ सप्टेंबरच्या सायंकाळी ७.३० वाजताचे दरम्यान सापळा रचून केलेल्या या कारवाईत आरोपी सचीन पुरुषोत्तम रोकडे वय ३५ रा.एमआयडीसी चौक,कळमेश्वर व आरोपी नियाज मोहम्मद अंसारी वय ३३ वर्ष राहनार टेका नाका नागपुर या दोघांना अटक करण्यात आली. आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी सूनावली असून या कारवाईमुळे कळमेश्वर आणि परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. शहरातील काही बार व हॉटेल्समध्ये हा व्यवसाय प्रचंड फोफावलेला बघायला मिळतो आहे.

पोलिस उपनिरिक्षक प्रवीन घोडाम यांना गुप्त बातमीदारामार्फत पुरुषोत्तम लॉजचा मालक व त्याचा साथीदार हा एमडी ड्रग्ज सेवन करत असल्याची माहिती मिळाल्याने सदरची कारवाई करण्यात आली. आरोपींची पोलीसांनी झडती घेतली असता त्यांच्याकडूण १.७० ग्रॅम एमडी पावडर व एक मोबाईल असा एकूण ४५ हजारांचा एवज जप्त केला. आरोपींची दोन दिवसांची पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली असून एमडी अॅक्ट द्वारे गुन्हे दाखल करण्यात आला. सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी सागर खरडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक मनोज काळबांडे, उपनिरीक्षक मनोज शेंडे यांच्या पथकाने केली.

# कंत्राटदाराला काम देण्यासाठी दबाव : नितीन गडकरी

## इंडियन बिल्डिंग कॉंग्रेसच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशनल सेंटर येथे वार्षिक परिषदेचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :

प्रत्येकाने चांगले काम करायलाच हवे. त्याचे श्रेय निश्चित मिळते. पण आम्ही मंत्री, राजकारणी यांच्या जवळचे कंत्राटदार, आर्टिटेक्ट असतात. याला काम द्या, त्याला देऊ नका असा, सरकारी अधिकाऱ्यांवर दबावही असतो. त्यावर मार्ग काढत चांगल्या दर्जाचे काम करायला हवे, असे प्रतिपादन केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी केले.

इंडियन बिल्डिंग कॉंग्रेसच्या नागपुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशनल सेंटर येथे झालेल्या वार्षिक परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमात गडकरी



बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव आबासाहेब नागरगोजे,आयबीसी चे अध्यक्ष सी देबनाथ, आय.बी.सी. राज्य अध्यक्ष सुभाष चांदसुरे, आय.बी. सी.चे राष्ट्रीय अध्यक्ष चिन्मय देबनाथ, व्ही.आर. बन्सल, सचिव व्ही.आर. बन्सल, उपाध्यक्ष अविनाश गुल्हाने उपस्थित होते.

नितीन गडकरी पुढे म्हणाले, बांधकाम क्षेत्रामध्ये गुणवत्ता पूर्ण दृष्टिकोन बाळगून कमी बांधकाम खर्चामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा तसेच किफायतशील बांधकाम सामग्रीचा वापर करून गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता चांगले बांधकाम करायला हवे.

इंडियन रोड कॉंग्रेसच्याच धरतीवर इंडियन बिल्डिंग कॉंग्रेसचे एक कार्यालय स्थापन करून त्यामध्ये निरंतर संशोधन आणि प्रशिक्षण कार्यक्रम राबवून गुणवत्तापूर्ण आणि दर्जात्मक संशोधन केले पाहिजे असे त्यांनी यावेळी सांगितले. बांधकाम क्षेत्रात चांगल्या काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन मिळणे गरजेचे आहे असे सांगताना गडकरी यांनी जे अधिकारी कामकाजात हलगर्जीपणा करतात त्यांच्यावर कठोर कारवाई करणार असा, इशारा दिला.

कोणतेही बांधकाम करताना त्यामध्ये लँडस्केपिंग, पर्यावरण पूरक बांधकाम, दिव्यांगांसाठी अनुकूल सुविधा असल्या पाहिजे. त्याचबरोबर जलसंधारणा करिता तसेच सांडपाणी व्यवस्थापनाकरिता देखील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. असेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले. याप्रसंगी इंडियन बिल्डिंग कॉंग्रेसच्या वार्षिक अहवालाचे देखील प्रकाशन केले तसेच गुणवंत अभियंतांचा तसेच अधिकाऱ्यांचा देखील सत्कार केला.

इंडियन बिल्डिंग कॉंग्रेस ही प्रशासक, वित्तपुरवठादार, नियोजक, वास्तुविशारद, स्थापत्य अभियंते, सार्वजनिक आरोग्य अभियंते, विद्युत अभियंते, ऊर्जा अभियंते, यांत्रिक अभियंते, पर्यावरणशास्त्रज्ञ, बागायतदार, बांधकाम साहित्याचे उत्पादक, संशोधक, शिक्षक इत्यादी संबंधित सर्व व्यावसायिकांना एकाच मंचावर एकत्र आणून देशात शाश्वत बांधकाम तसेच निर्मितीसाठी काम करणारी एक संस्था आहे.

## स्कुल व्हॅन व बसची धडक

### आठ विद्यार्थी जखमी, एकाची प्रकृती चिंताजनक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :



नागपूर मानकापूर स्टेडियम रोडवर नारायण विद्यालय आणि भवन्स कोराडी विद्यालयाच्या स्कुल व्हॅनमध्ये झालेल्या धडकेत आठ विद्यार्थी जखमी झाले. तर एक गंभीर जखमी झाला. या रस्त्यावर एकी कडील भाग खराब झालेला असल्याने दुरुस्तीसाठी बंद असल्याने, गेल्या काही महिन्यांपासून उड्डाणपुलाच्या एकाच लेनवर वाहतूक दुतर्फा सुरू आहे.

यातच हा अपघात झाला.रस्त्यावरून जाणाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मुलांना अपघातग्रस्त व्हॅनमधून बाहेर काढले आणि जवळच्या रुग्णालयात नेले. जखमी मुलांना वाचवले तेव्हा फक्त दोनच मुले शुद्धीवर आली होती, तर काही मुले गाडीत बेशुद्ध पडली होती. जागरूक असलेल्या एका मुलाला फक्त मोठा आवाज ऐकू आला आणि नंतर काय घडले ते कळले नाही. काही पालकही काही मिनिटांतच घटनास्थळी पोहोचले. अपघातादरम्यान स्टिअरिंग व्हीलवर आदळल्याने व्हॅन चालकाच्या डोक्याला आणि पोटाला गंभीर दुखापत झाली. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले, परंतु कोणतीही जीवितहानी झाली नाही.

बोखारा येथील नारायण विद्यालमची ही बस शहरातून विद्यार्थ्यांना घेण्यासाठी जात होती. बसचा चालक आणि दोन महिला सहकाऱ्यांना कोणतीही इजा झाली नाही. व्हॅनचा चालक वेगाने जात होता आणि अचानक त्यांच्या लेनमध्ये वळवल्यामुळे समोरासमोर टक्कर झाली.

### सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्यावर पोलिसांची धाड

## दोन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान , दि. १२ :

कन्हान पोलीसांच्या डीबी पथकाने आंबेडकर चौक येथे एस.बी.आई एटीएमच्या मागे सुरु असलेल्या सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्यावर पोलीसांनी धाड टाकुन ११,२८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन दोन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

गुरुवार (दि.११) सप्टेंबर रोजी सायंकाळ च्या दरम्यान कन्हान पोलीस डीबी पथक पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा मार्गदर्शनात अवैध धंद्यावर कारवाई करणे कामी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना आंबेडकर चौक येथे एस.बी.आई एटीएम च्या मागे सट्टापट्टी जुगार खेळत असल्याची गुप्त माहिती मिळाली. या आधारे पोलीसांनी सापळा रचुन धाड टाकली असता आरोपी सौरभ पंजाब वासे (२६ वर्ष) रा.कन्हान हा लोकां कडुन पैसे घेऊन कागदावर सट्टापट्टीचे आकडे घेतांना दिसुन आला. पोलीसांनी आरोपीला ताब्यात घेऊन अंगझडती घेतली असता नगदी १२८० रुपये, अँन्ड्राईड मोबाइल किंमत १०,००० रुपये, पेन ५ रुपए असा एकुण ११,२८५ रुपयांचा मुद्देमाल मिळुन आला. विचारपुस केली असता आरोपी ने मयुर हटवार रा.घोरपडे ले आऊट कन्हान यांचा सांगण्यावरुन ३०० रुपए रोजीने लिहतो असे सांगितले. या प्रकरणी कन्हान पोलीसांनी आरोपी सौरभ वासे आणि मयुर हटवार यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करुन पुढील तपास पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे. सदरची कारवाई पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा मार्गदर्शनात, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण हारगुडे, आदि पोलीस कर्मचारी यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली.

## प्राचार्य राम शेवाळकर आधारवड पुरस्कार वितरण समारंभ

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :

प्राचार्य राम शेवाळकर हे विचारवंत होते. 'वक्तादशसहस्रेषु' म्हणून जगभर त्यांचा लौकिक होता. प्राचार्य राम शेवाळकर उत्तम साहित्यिक होते व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे योगदान मोलाचे आहे.

त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ प्राचार्य राम शेवाळकर प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात ज्यांनी त्या क्षेत्रातील इतर नवोदितांना मोठे करण्याची संधी दिली असेल किंवा अनेकांना लाभ होईल अशा पद्धतीने काही काम केले असल्यास अशा व्यक्तिंवा प्राचार्य राम शेवाळकर यांच्या नावाचा एक लक्ष रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे स्वरुप असलेला प्राचार्य राम शेवाळकर पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात येत असतो.

२०२४ चा पुरस्कार ८५ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा.श्री. वसंत आबाजी डहाके यांना त्यांच्या साहित्य क्षेत्रातील केलेल्या कार्याबद्दल व २०२३ चा पुरस्कार शून्यातून विश्व निर्माण करणारे तसेच ६५० कर्मचारी व १३०० दैनिक प्रतिनिधी कार्यरत असणाऱ्या 'आदित्य अनघा' या संस्थेचे संस्थापक समीर सराफ यांना देण्यात येणार आहे शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर, २०२५ रोजी सायं. ५.३० वाजता अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सोमेश्वर पुसतकर सभागृहात प्रदान करण्यात येईल.

हा पुरस्कार प्रदान सोहळा प्रसिद्ध समीक्षक, विचारवंत व डोंबिवली येथील ९० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा.डॉ. अक्षयकुमार काळे यांच्या शुभहस्ते व महाराष्ट्रातील पहिल्या मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ. अविनाश आवलगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील अग्रगण्य कार्यकर्ते संजय खोडके राहतील.

या प्रसंगी जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्राचार्य राम शेवाळकर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे.

## एचएसआरपी नंबरप्लेट शुल्काविरोधातील याचिका कोर्टाने फेटाळली


■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

एचएसआरपी नंबरप्लेटसाठी महाराष्ट्रात इतर राज्यांपेक्षा अधिकचे शुल्क घेतले जात असल्याचा आरोप करत, एका तरुणाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, हायकोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे.

केवळ वृत्तपत्राच्या कात्रणांवर आधारित जनहित याचिका दाखल करत येत नाही, त्यासाठी ठोस पुरावे आणि संशोधन आवश्यक असल्याचे म्हणत उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना फटकारले आहे.

न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश व्यास यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. सुदर्शन बागडे यांनी ही याचिका दाखल केली होती. महाराष्ट्रात HSXRYP साठी इतर राज्यांच्या तुलनेत जास्त दर आकारले जात आहेत. तसेच, २०१९ पूर्वीच्या वाहनांना या प्लेट्स न लावल्यास १० हजार रुपयांचा दंड आकारला जातो, असा आरोप करण्यात आला होता.

गेल्या सुनावणीत न्यायालयाने याचिकाकर्त्यांना




आरोपांच्या समर्थनासाठी पुरावे, माहिती, किंवा संशोधनात्मक सर्वेक्षण सादर करण्याचे आदेश दिले होते. यासाठी चार आठवड्यांची मुदतही दिली होती.

मात्र, याचिकाकर्ते कोणतेही ठोस पुरावे सादर करू शकले नाहीत. न्यायालयाने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आणि मौखिक स्वरूपात प्रश्न विचारला, 'एखाद्या वृत्तपत्राचे कात्रण घेऊन जनहित याचिका दाखल केल्यास जनहित याचिका चालवणे अवघड होईल.' तुम्ही खरंच जनहितासाठी याचिका दाखल केली की प्रसिद्धीसाठी असा परखड सवाल न्यायालयाने याचिकाकर्त्यांना विचारला.

यावेळी, याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी पुरावे सादर न करण्यामागचे कारण 'आम्ही गरीब माणसे आहोत' असे सांगितले. यावर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करत, 'हे न्यायालय आहे, इथे कुणीही लहान किंवा मोठे नसते. तुम्ही नीट युक्तिवाद केला नाही, तरीही तुम्हाला एक संधी दिली होती,' असे सुनावले.

अखेरीस, आवश्यक पुरावे आणि माहिती सादर न केल्याने न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. याचिकाकर्त्यांच्या वतीने अॅड. संतोष चव्हाण तर राज्य सरकारच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ सुनील मनोहर आणि अॅड. ऋषिकेश मराठे यांनी बाजू मांडली.

## चोरीचा माल विकण्यापूर्वीच चोरटे जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

चोरीचा माल विकण्याच्या तयारीत असतानाच इमामवाडा पोलिसांनी त्यांना पकडले. विनानंबर प्लेटच्या दुचाकीने फिरत असल्यामुळे पोलिसांना त्यांच्यावर संशय आला. दोघांनाही ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांच्याकडून २ वाहन चोरी आणि १ घरफोडीचा गुन्हा उघडकीस आला. आरोपींपैकी एक अल्पवयीन असल्याने त्याला ताब्यात घेऊन दुसऱ्याला अटक करण्यात आली. रितेश उर्फ दद्दू अश्वजित वानखेडे (२१) रा. पाचनल चौक, रामबाग असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. तो अभिलेखावरील गुन्हेगार असून अजनी ठाण्यात नोंद घरफोडीच्या गुन्ह्यात तो वॉन्टेड होता.

फियार्दी जयंता ज्ञानेश्वर दरवेकर (३१) रा. बालकृष्णनगर, मानेवाडा, बेसा रोड यांनी गत २९ ऑगस्टच्या रात्री त्यांची एमएच-४९/एव्ही-२३१९ क्रमांकाची दुचाकी घरासमोर लॉक करून ठेवली होती. मध्यरात्रीला अज्ञात आरोपी त्यांची दुचाकी चोरी करून पसार झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर अजनी ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. अजनी पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला होता.

बुधवारी दुपारी २ वाजताच्या सुमारास इमामवाडा पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान टीबी वॉर्ड परिसरात दोनजण विनानंबर प्लेटच्या दुचाकीने जाताना दिसले. त्यांच्याजवळ लॅपटॉप आणि टीव्ही सुद्धा होता.

## आता नखांच्या इमेजवरून शोधता येणार आजार

### अॅप तयार करून नेहाने रचला इतिहास



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

नखांची निगा राखणे हे ब्युटी वा नेल सलॉनला जाण्यापेक्षा खूप जास्त महत्त्वाचे आहे. शरीराचा हा अवयव तुमच्या आरोग्याविषयीचे संकेत देतो आणि अनेक आरोग्य समस्यांची लक्षणे वेळेआधीच दर्शवतो. म्हणूनच नखांचा रंग आणि त्यात होणाऱ्या बदलांवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. नखांवर डाग पडणे किंवा इतर काही होणे हे कदाचित एखाद्या आजाराचे लक्षण असू शकते. जेव्हा असे होते तेव्हा त्वचारोगतज्ञाला दाखवण्याचा सल्ला दिला जातो, जेणेकरून रक्ताची तपासणी करून आणि इतर प्रकारे डॉक्टर त्यांच्या रुग्णांची परिस्थिती समजून घेऊ शकतात. स्थिती गंभीर आहे असे जाणवले तर विशेषज्ञ बायोप्सी करण्यास सांगू शकतात.

नागपूरच्या तरुणीने जागतिक पातळीवर इतिहास रचला आहे. नेहा इंगोले-साबळे यांनी नुकत्याच क्वालालंपूर (मलेशिया) येथे झालेल्या आयईईई येसिस्ट-१२ (युथ एन्डेव्हर्स फॉर सोशल इनोव्हेशन युजिंग सस्टेनेबल टेक्नॉलॉजी) या आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या स्पेशल ट्रॅक गटात जगभरातील स्पर्धकांना मागे टाकून पहिला क्रमांक पटकावला आहे. नेहा इंगोले-साबळे या रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॉलेजच्या इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विभागातील संशोधन विद्यार्थिनी आहेत. ही प्रतिष्ठेची स्पर्धा क्वालालंपूर येथे २४ ऑगस्ट २०२५ रोजी झाली. यंदा या स्पर्धेत ८ देशांतील ५०८ संघांनी आपले प्रकल्प सादर केले. प्रकल्पांमधून निवडलेल्या केवळ ३६ संघांना अंतिम फेरीत संधी मिळाली. जगभरातील ९ देशांतील १८ तज्ज्ञ परीक्षक मंडळाने मूल्यांकन केले. त्यात नेहाचा प्रकल्प ठळक ठरला आणि जागतिक विजेतेपद पटकावले. नेहाच्या या अद्वितीय यशाबद्दल त्यांना १,००० अमेरिकन डॉलर्सचे पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या संशोधन प्रवासात डॉ. रिचा खंडेलवाल यांनी मार्गदर्शन केले. नेहा या विद्यापीठात कार्यरत असलेल्या सुनील इंगोले यांच्या कन्या व एका बहुराष्ट्रीय कंपनीत कार्यरत प्रताप साबळे यांच्या पत्नी आहेत. त्यांच्या या अभूतपूर्व यशामुळे नागपूर, महाराष्ट्र आणि भारताचाही मान जगभर उंचावला आहे. नेहा आणि त्यांच्या टीमने सादर केलेला प्रकल्प फंगरनेल इमेजेसच्या सहाय्याने यकृत विकार व सोरायसिसचा लवकर शोध घेण्यासाठी स्मार्टफोन ॲप्लिकेशन हा होता.

# विभागात तीन टप्प्यात सेवा पंधरवडा

## अनुकंपा व सरळसेवेतील २ हजार उमेदवारांना नियुक्तीपत्र : विभागीय आयुक्त बिदरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये विविध उपक्रम राबवून तीन टप्प्यात सेवा पंधरवाडा साजरा होणार आहे. विभागातील अनुकंपा तत्वावरील गट क आणि गट ड पदांसाठी १२५० तर सरळसेवेद्वारे लिपीक पदावरील ६७५ उमेदवरांना पंधरवडया दरम्यान नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे.सेवा पंधरवडयातील उपक्रमांची प्रभावी अमंलबजावणी करणाऱ्या तीन सर्वोत्तम जिल्ह्यांची निवड करण्यात येणार असल्याची माहिती, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिली.

सेवा पंधरवडया निमित्त विभागात



राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती विभागीय आयुक्त बिदरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. लोकाभिमुख,पारदर्शक व कार्यक्षम महसूल प्रशासनाच्या माध्यमातून नागरिकांना दिलासा देण्याच्या उद्देशाने महसूल व वने विभागामार्फत विभागात १७ ते २२ सप्टेंबर, २३ ते २७ सप्टेंबर आणि २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर अशा तीन टप्प्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यात पांदण रस्त्यांबाबत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. याअंतर्गत गावांच्या पांदण किंवा शिवरस्त्यांचे सर्वेक्षण करणे व त्यांना क्रमांक देण्याचे काम प्राधान्याने करण्यात येणार आहे.यासोबतच नोंद नसलेल्या रस्त्यांची नोंद घेण्याचे आणि शेतरस्त्यांच्या सीमांकन व रस्त्यांविषयीच्या तक्रारींचे निराकरण करण्याकरिता सीमांकन व रस्ता अदालतांचे आयोजन करण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात सर्वांसाठी घरे उपक्रम राबविण्यात येणार आहे. उपक्रमांतर्गत सर्वांसाठी घरे या शासकीय निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून बेघरांना घर देण्याचे उद्दिष्टय ठेवण्यात आले आहे. शासकीय जमिनीवर गृहनिमार्णासाठी कब्जा हक्काने जमीन वाटप करणे, झोपडपट्टी व इतर अनधिकृत बांधकामांचे नियमशीरकरण करणे आणि पात्र लाभार्थ्यांना पट्टेवाटप करण्यात येणार आहे.

पंधरवाड्याच्या तिसऱ्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्याला नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे उद्दिष्टय देण्यात आल्याचे बिदरी यांनी सांगितले. याअंतर्गत नागपूर जिल्ह्यात १ व २ ऑक्टोबर रोजी शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी समाधान दिवस आयोजित करण्यात येणार आहे. तर २९ व ३० सप्टेंबर रोजी प्रत्येक गावांमध्ये संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना डिबीटीचा लाभ देण्यात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी शबीर आयोजित करण्यात येणार आहे.

### २ हजार उमेदवारांना पालकमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्र

नागपूर विभागातील ६ जिल्ह्यांमधील अनुकंपा तत्वावरील रिक्त जागा भरण्याची महत्वाची कार्यवाही सेवा पंधरवडयामध्ये २५ ते ३० सप्टेंबर दरम्यान होणार आहे. यानुसार गट क च्या ४२४ आणि गट ड च्या ८२६ अशा एकुण १२५० तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या विभागातील ६७५ लिपीक प्रवगार्तील उमेदवारांना पालकमंत्री यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात येणार आहे.

# अमरावती येथे खाजगी शिक्षक मेळावा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. १२ :



शिक्षक क्रांती विचार मंच, अमरावती यांनी खाजगी शिक्षकांचा मोठा मेळावा यशस्वीरित्या आयोजित केला. विनाअनुदानित, स्वयं-वित्तपुरवठा शाळांचे शिक्षक शिक्षक क्रांती विचार मंचच्या बॅनरखाली एकत्र आले. खाजगी शिक्षक विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष आशिष अंबुलकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. उपाध्यक्षा विद्या बानोकर यांनी कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे राजेंद्र मिश्रा, वरिष्ठ प्राचार्य साई इंटरनॅशनल स्कूल यांनी केले. निवृत्त शिक्षिका अमिता चोपडे, राजेंद्र टाटस्कर, राजेंद्र लव्हाडे हे देखील यावेळी प्रमुख्याने उपस्थित होते. संजय पवार यांनी प्रास्ताविक केले. संस्थापक अध्यक्ष आशिष अंबुलकर यांनी खाजगी शिक्षक विचार मंचच्या स्थापनेचे उद्दिष्टे आणि उद्दिष्टे अधोरेखित केली. खाजगी शिक्षक आता शिक्षण क्षेत्राचा कणा बनले आहेत. आज गरीब ते गरीब लोकांना त्यांच्या मुलांना योग्य शिक्षण मिळावे असे वाटते आणि ते त्यांच्या मुलाला खाजगी शाळेत घालण्यासाठी काहीही करतील कारण सरकारी शाळा "आजारी" पातळीवर आहेत आणि त्यांची संख्या देखील दिवसेंदिवस कमी होत आहे. सरकारी अनुदानित शाळा फार कमी आहेत, ज्या उत्कृष्ट आहेत पण त्यांची संख्या "थोडी" आहे.

याशिवाय सर्व शालेय शिक्षण खाजगी शाळेच्या मजबूत खांद्यावर आणि त्या बदल्यात आपल्या खाजगी शिक्षकांच्या खांद्यावर चालते. खाजगी शिक्षकांचे योगदान उल्लेखनीय आहे परंतु त्यांना योग्य मोबदला मिळत नाही. त्यांना जे काही वेतन मिळत आहे ते खूप कमी आहे आणि इतक्या कमी पगारात कुटुंब चालवणे खूप कठीण आहे. प्रमुख पाहुणे राजेंद्र मिश्रा, कार्यकारी परिषदेचे सदस्य, युनायटेड स्कूल्स ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया यांनी मोठ्या मेळाव्याला संबोधित करताना सांगितले की, सरकारी कडून खाजगी शिक्षकांना आर्थिक मदत करण्याबाबत राज्य आणि केंद्र सरकारला आमची विनंती सांगण्याची वेळ आली आहे. खाजगी शिक्षकांचे प्रश्न सोडवणे हे सरकारचे नैतिक कर्तव्य आणि जबाबदारी आहे. त्यांनी शाळेच्या कल्याणासाठी शाळा व्यवस्थापनाचे योगदान देखील अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पेरी लुईस, राजेश मस्कोल्हे, शिशिर कावरे, अविनाश खैराकर, शैलेश पोहेकर, चेतन कल्याणकर, जयप्रकाश आडे, शितल वर्मा, श्रुतिका मॅम यांनी परिश्रम घेतले. सुश्री श्रुतिका यांनी आभार मानले.

# डोळे आणि कान यावर नियंत्रण प्राप्त केल्यास मनुष्य वाईट विचारांपासून अलिप्त राहील : युगल शरणजी महाराज

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. १२ :



भगवंताने आपल्याला डोळ्यांमधून बघण्याची आणि कानांमधून ऐकण्याची अलौकिक शक्ती प्रदान केली आहे. पण डोळ्यांनी काय बघावे आणि काय बघू नये कानांनी काय ऐकावे व काय ऐकू नये याचा आपण स्वतः निर्णय करायचा आहे आपल्या स्वतःचे जर आपल्या कानांवर आणि डोळ्यांवर नियंत्रण असलं तर आपल्या शरीरात आपल्या मनात वाईट विचार कदाचित प्रवेश करू शकणार नाही. आपल्याला दिलेल्या बघण्याच्या आणि ऐकण्याच्या शक्ती तुन आपण समाज कल्याणाचे देखावे स्वप्न रूप बघावे व सनातन धर्माच्या प्रसार प्रचार आणि संस्कृतीला जोपासनारे मंत्रपुष्प ऐकावे. असे श्री बालाजी कथेच्या माध्यमातून कथेच्या तिसऱ्या दिवशी कथा व्यास युगाल शरणजी महाराज आपल्या अमृतवाणीतून श्रोत्यांना उपदेशित करीत होते.

तिसऱ्या दिवशीच्या कथेची राज्यसभेचे माजी खासदार अजय संचेती यांच्या हस्ते ग्रंथ पूजा व आरती करून सुरुवात करण्यात आली. यावेळी माजी मंत्री रमेशचंद्र बंग, निमेश माहेश्वरी, वीरेंद्रप्रसाद धोका, भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, माजी नगरसेवक संजय बंगाले, संपादक श्रीपाद अपराजित, संपादक रमेश कुलकर्णी, दीपेन अग्रवाल, हार्दिक पारेख, डॉ निलेश अग्रवाल, मेघा वाकडीया, मनीष तारावाला, पुखराज बंग, नारायण पालीवाल, तिसऱ्या दिवसाचे यजमान विश्वजीत मोहनकुमार जोशी, राधेश्याम चांडक, पुनमचंद पुरुषोत्तम मालू, संजय बन्सीलाल पालीवाल प्रामुख्याने उपस्थित होते.

बालाजी कथेच्या तिसऱ्या दिवशी कथा व्यास युगल शरणजी महाराज यांनी कथापुष्प श्रोत्यांना ऐकवताना सांगितले की जगातील कोणतही नातं हे चिरकाल नाही तर ते परिस्थिती व व्यक्ती स्वरूप असते परंतु भगवंत आणि भक्त यांचं नातं मात्र हे चिरकाल असते त्यामुळे कोणत्या नात्याला किती वेळ आणि आपल्या भगवंताला किती वेळ द्यायचा याचा ताळेबंद आपण जीवनात ठेवायला पाहिजे. तसेच जगातील प्रत्येक गोष्ट ही जिंकण्याकरिता माणसाला प्रेम अंगीकारावे लागते आणि सेवा, समर्पण त्याग यातून प्रेम प्रगट केल्या जातो तेव्हा सेवा, समर्पण आणि त्यागाला पर्याय नाही प्रेमाची जननीच ही सेवा आहे म्हणून प्रत्येक माणसाने आपल्या प्रभूची नित्याने सेवा करावी. भगवंताला माणसाने बांधलेल्या भौगोलिक सीमांमध्ये बंदिस्त न करता चराचरात, कणाकणात भगवंत वास करतो फक्त त्या परमेश्वराला पाहण्याकरिता दृष्टी हवी आहे आणि ती दृष्टी मिळविण्याकरिता गुरु करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील थोर संतपरंपरेत गुरुंनी दिलेल्या आशीवार्दानेच गुरुने प्रदान केलेल्या शक्तीनेच संत नामदेवाला स्वानात पांडुरंग दिसले तेव्हा गुरु शिवाय जीवनाला अर्थ नाही. अशी गुरु महिमा श्रोत्यांना ऐकवत दीपोत्सव साजरा करून, आरती व महाप्रसादानंतर तिसऱ्या दिवशीच्या कथेला विराम देण्यात आला.

## रुग्णालय संचालकाला मागितली खंडणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

एका गुंडाने ठार मारण्याची धमकी देऊन रुग्णालय संचालकाला खंडणी मागितली. धमकावून काही पैसेही घेतले. ही घटना कळमना पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत गुंडाला अटक केली. कुलजीत उर्फ बब्बू रैना (२३) रा. कळमना वस्ती असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. चित्रशालानगर येथील रहिवासी राहुल कौशलेंद्र पांडे (३०) यांचे परिसरातच एनडीए रुग्णालय आहे. आरोपी कुलजीतही परिसरातच राहतो आणि त्याच्याविरुद्ध अनेक गुन्ह्यांची नोंद आहे. २९ ऑगस्ट रोजी राहुल रुग्णालयाच्या कॅबिनमध्ये बसलेले होते. रात्री ८ वाजताच्या सुमारास आरोपी त्यांच्या कॅबिनमध्ये घुसला. परिसरातील डॉन असल्याचे सांगून त्यांना धमकावू लागला आणि दरमहिन्याला १५ हजार रुपये मिळाले नाहीतर रुग्णालय बंद करण्याची धमकी दिली. ५ सप्टेंबरच्या रात्री तो पुन्हा राहुल यांच्या कॅबिनमध्ये घुसला. चाकूचा धाक दाखवून ठार मारण्याची धमकी दिली आणि खंडणीची मागणी केली. चाकू पाहून घाबरलेल्या राहुल यांनी त्याला २ हजार रुपये दिले. उर्वरित पैसे घेण्यासाठी पुन्हा येईन असे म्हणत कुलजीत निघून गेला. राहुल यांनी परिसरात त्याच्याबाबत विचारपूस केली असता त्याच्याविरुद्ध अनेक गुन्ह्यांची नोंद असल्याची माहिती मिळाली.

# फेटरीत राजस्व अभियान अंतर्गत गावभेट दौरा




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १२ :

नागपूर तालुक्यातील फेटरी ग्रामपंचायत सांस्कृतिक सभागृहात पालकमंत्री तथा महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून राजस्व अभियान २०२५ अंतर्गत गावभेट दौऱ्याचे आयोजन उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, तहसीलदार कल्याणकुमार डहाट यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी करण्यात आले.

या प्रसंगी सरपंच रविंद्र खांबलकर, उपसरपंच मुकेश ढोमणे, ग्रा.पं.सदस्य वकिल डोंगरे, हर्षाताई लंगडे, तंटामुक्त अध्यक्ष राहुल शास्त्री, मंडळ अधिकारी खान, सहाय्यक कृषी अधिकारी राठोड, पोलीस पाटील निमजे,सुनील दोडेवार, विलास श्रीखंडे, प्रकाश लंगडे व इतर गावकरी, कर्मचारी, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन ग्रामपंचायत अधिकारी बालाजी गुट्टे यांनी केले.

कार्यक्रमात पांधण रस्ता, झुडपी जंगलावरील निवासी अतिक्रमण तसेच इतर स्थानिक समस्यांवर चर्चा करण्यात आली. अधिकारी वर्गाने नागरिकांच्या तक्रारी ऐकून उपाययोजना सुचविल्या.

# वर्ल्ड फिजिओथेरपी डे चे उदय फिजिओथेरपी मेडिकल कॉलेजतर्फे भव्य आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १२ :

द्रुगधामना येथील उदय फिजिओथेरपी मेडिकल कॉलेजतर्फे जागतिक फिजिओथेरपी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून नागपूर जिल्हा फिजिओथेरपिस्ट महिला सेलच्या प्रमुख डॉ. मेघा लड्ढा उपस्थित होत्या.

सर्वप्रथम संस्थेचे संचालक उदय टेकाडे यांनी डॉ. मेघा लड्ढा यांचे शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि फुलझाड देऊन स्वागत केले. त्यानंतर त्यांनी प्रास्ताविकातून औषधाशिवाय आरोग्य सुधारण्याचा एकमेव अभ्यासक्रम म्हणून फिजिओथेरपीचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. मुख्य अतिथी डॉ. मेघा लड्ढा यांनी आपल्या मनोगतात फिजिओथेरपीचे सामाजिक महत्त्व, तसेच डॉक्टरांबरोबर फिजिओथेरपिस्टची भूमिका यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, आजच्या युगात फिजिओथेरपी केवळ रोगचिकित्सेसाठी नाही तर समाजाच्या आरोग्य संवर्धनासाठीही अत्यंत आवश्यक आहे. फिजिओथेरपिस्टना डॉक्टरांप्रमाणे समाजात सन्मान मिळू शकतो.या कार्यक्रमात संचालिका डॉ. अनिता टेकाडे, प्राचार्या डॉ. रश्मि माहुलकर, प्राध्यापिका डॉ. सुप्रिया तांबे, पार्श्वनाथ पब्लिक स्कूलच्या प्राचार्या अन्नू पाल आणि श्री साई ताज पॉलिटेक्निकचे प्राचार्य कृष्णा विश्वकर्मा यांनी शुभेच्छा व्यक्त करून सहकार्य केले. जागतिक फिजिओथेरपी दिन दरवर्षी ८ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. १९५१ मध्ये वर्ल्ड कॉन्फेडरेशन फॉर फिजिकल थेरपीची स्थापना झाल्याच्या स्मरणार्थ १९९६ पासून हा दिवस साजरा केला जात असून, वेदना व्यवस्थापन, पुनर्वसन आणि रोगप्रतिबंधात फिजिओथेरपीचे महत्त्व पटवून दिले जाते. कार्यक्रमाचे संचालन प्रणय खैरे यांनी तर आभार सलोनी खोब्रागडे यांनी मानले.

आयोजनासाठी विद्यार्थ्यांपैकी ध्रुव चंगाणी, हिमांशी ढोले, श्रुतीका वानखेडे, रिया कोहले, साक्षी मदनकर आणि रुचिका ढाले यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी गणेशोत्सवानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## विजांच्या कडकडाटासह जोरदार वाऱ्यासह पाऊस

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

हवामान विभागाच्या येलो अलर्टनंतर गुरुवारी विजांच्या कडकडाटासह जोरदार वाऱ्यासह पाऊस झाला. सकाळपर्यंत वातावरण मोकळे असताना दुपारी १२ च्या सुमारास अर्धा तासपर्यंत पावसाने हजेरी त्यानंतर ३.३०च्या सुमारास पाऊस झाला. रात्री ८ वाजता पुन्हा पाऊनतासपर्यंत मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने रस्त्यांवर पाणीच पाणी झाले होते. एकीकडे उकाडा वाढला असताना मुसळधार पाऊस झाल्याने वातावरणात बदल दिसून येत आहे. १४ सप्टेंबरपर्यंत येलो अलर्ट असल्याने पावसाचे सावट कायम आहे. तापमानात २.३ अंशाची घट होत ३२.२ अंश सेल्सिअस तर तापमान २४.४ अंशापर्यंत नोंदविण्यात आले.

मुख्यतः गुरुवारी सकाळी सूर्यदर्शन दिल्यानंतर उकाडा जाणवायला लागला होता. त्यानंतर सकाळी वातावरण मोकळे असताना दिवसभरात तीन वेळा चांगला पाऊस झाला. दुपारी २ वाजताच्या दरम्यान मध्यम तीव्रतेने पाऊस सुरू झाला तर ४ वाजतापर्यंत ही रिपरिप कायम राहिली. सायंकाळी ५.३० पर्यंत शहरात ११ मि.मी. पावसाची नोंद हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील दोन दिवस नागपूरसह विदर्भाच्या बहुतेक जिल्ह्यात विजाच्या व गडगडाटासह मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे.

दक्षिण ओरिसा व उत्तर आंध्र प्रदेश किनारपट्टी दरम्यान ३.१ किमी. उंचीपर्यंत चक्रीय वाऱ्याची स्थिती तयार झाली असल्याने मान्सूनी वारे सक्रिय झाले आहेत. त्यामुळे विदर्भातील सर्व ११ मध्य महाराष्ट्रातही पावसाळी स्थिती निर्माण झाली आहे. त्यानुसार येत्या १४ सप्टेंबरपर्यंत विदर्भात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढचे दोन दिवस विदर्भात मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे.

# नागपूरला येत होता ३.८८ क्विंटल गांजा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

दुर्ग पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे ओडिशाहून नागपूरला पाठवलेला ३.८८ क्विंटल गांजा जप्त केला. ही खेप गुजरातला जाणाऱ्या कंटेनरमध्ये पाठवली जात होती. कंटेनरमधील माल जप्त करण्यासोबतच दुर्ग पोलिसांनी शहरात शोध मोहीमही राबवली. या प्रकरणात २ आरोपींना अटक करून दुर्गला नेण्यात आले, तर मुख्य आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. नागपूरहून अटक केलेल्या आरोपींमध्ये मुश्ताक अहमद आणि फय्याज अन्सारी यांचा समावेश आहे, तर शाहिद अहमदचा शोध सुरू आहे. दुर्गमार्गे रायपूरहून नागपूरला जात असलेल्या कंटेनर ट्रक क्र. एनएल-०१/एएच-९५२४ मध्ये मोठ्या प्रमाणात गांजा असल्याची माहिती ७ सप्टेंबर रोजी दुर्ग पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी कुम्हारी टोल नाक्याजवळ नाकाबंदी केली आणि वरील क्रमांकाचा कंटेनर पकडला. ट्रक चालक उमेश यादव (रा. बिहार) याने सांगितले की त्याने कोलकाताहून कंटेनरमध्ये माल भरला होता जो गुजरातला नेला जाणार होता. तो ओडिशातील देवघर येथे राहुल नावाच्या ओळखीच्या व्यक्तीला भेटला.

राहुलने त्याला नागपूरच्या शाहिदला १३ पोती गांजा पोहोचविण्यास सांगितले. त्याला प्रति पोती ५,००० रुपये मिळणार होते. कंटेनर सील असतानाही, उमेशने लोभापोटी नट-बोल्ट उघडले, गांजा भरला आणि नागपूरसाठी निघाला. याआधीही शाहिदने त्याच्याकडून माल मागवला होता. दुर्ग पोलिसांना १३ पोत्यांमध्ये ३८८ पाकिटे गांजा आढळला, ज्यांचे वजन ३ क्विंटल ८८ किलो होते.

## १७० वाहन चालकांवर कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण १७० वाहन चालकांवर कारवाई करून १,७७,२०० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारू बंदी कायद्यान्वये ७ प्रकरणात ९ आरोपींवर कारवाई करून १,९०,९०३ रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ३ प्रकरणात २० आरोपींवर कारवाई करून १,७७,९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन करण्यात आले आहे.

# महसूल पंधरवड्याचा लाभ घ्या

## तहसीलदार दत्तात्रय निंबाळकर यांचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. १२ :



सर्वसामान्यांसाठी महसूल विभागाच्या सेवा अधिक सोप्या आणि पारदर्शक बनवण्यासाठी १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'महसूल पंधरवाडा' आयोजित करण्यात आला आहे.

जमीन, घर, वारस नोंदणी, सातबारा आणि फेरफार यांसारख्या महसुलाशी संबंधित प्रलंबित अर्ज आणि दावे जलद गतीने निकाली काढणे, 'डिजिटल स्वाक्षरीत सातबारा', आणि 'ऑनलाईन फेरफार' यांसारख्या आधुनिक सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे, प्रत्येक गावात शिबिरे आयोजित केली जातील, जिथे नागरिकांना उत्पन्न, जातीचा, रहिवासी आणि नॉन- क्रिमीलेअर यांसारखे आवश्यक दाखले एकाच ठिकाणी मिळतील.

प्रशासनामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणून ते अधिक लोकभिमुख बनवणे, तसेच नागरिकांचा सहभाग वाढवणे. जुन्या नोंदी, वारस नोंदी आणि फेरफाराच्या नोंदी अद्ययावत करण्यासाठी मोहीम राबवली जाईल. महसूल अधिकारी आणि कर्मचारी प्रत्येक तालुक्यात आणि गावात शिबिरे घेऊन नागरिकांच्या समस्या जागेवरच सोडवतील. सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी विशेष कारवाई केली जाईल, जेणेकरून सार्वजनिक जागांचा योग्य वापर होईल. शेत रस्ते, पादन रस्ते, अतिक्रमण झालेल्या ठिकाणी खुले करून देण्यावर जास्तीत जास्त भर राहणार आहे. हे प्रकरणे सहजासहजी खुले न झाल्यास पोलीस संरक्षणात खुले केले जातील. या पंधरवड्याची सांगता २ ऑक्टोबर, महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी केली जाईल. मौदा तालुक्यातील सर्व नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपली प्रलंबित कामे पूर्ण करावीत, असे आवाहन तहसीलदार दत्तात्रय निंबाळकर यांनी केले आहे.

# लाव्हयात बाल संरक्षण समितीने केली दोन अल्पवयीन मुलांची सुटका

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १२ :

सरपंचाच्या हस्ते बाल संरक्षण समितीचा सत्कार



लाव्हा येथे बाल संरक्षण समितीने दोन अल्पवयीन मुलांची सुटका करून समाजासमोर आदर्श निर्माण केला. त्याबद्दल लाव्हा ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच जोत्सना नितनवरे यांच्या अध्यक्षतेखाली बाल संरक्षण समितीच्या कायार्चा गौरव करण्यात आला. लाव्हा येथील सूर्यवंशी पाटील यांची दोन मुले गुरुरत्न (वय ८) व सुरज (वय ७) यांना त्यांच्या आईकडून गेल्या तीन वर्षांपासून घरात कोंडून ठेवण्यात आले होते. ही मुले शाळा, लसीकरण तसेच कोणत्याही सामाजिक किंवा आरोग्य सेवेपासून पूर्णतः दूर होती.

या गंभीर प्रकाराबाबत ठराव मांडून हा विषय ग्रामपंचायत लाव्हा सरपंच जोत्सना नितनवरे यांनी समितीसमोर सादर केला. या प्रकरणी मुख्याध्यापिका निलिमा राऊत यांनीही सातत्याने शाळाबाह्य मुलांचा प्रश्न समितीसमोर मांडला होता. हा विषय कमिशन ऑन द स्टेटस ऑफ वुमनच्या अश्विनी चवरे यांच्यासमोर मांडण्यात आला. त्यांनी तातडीने कारवाईचे निर्देश दिले. त्यांच्या सूचनेनुसार जिल्हास्तरीय टीम अंगणवाडीत हजर झाली व सूर्यवंशी पाटील यांच्याकडे विचारणा करण्यात आली.

२३ ऑगस्ट रोजी बालमुक्ती ट्रस्ट, पोलीस प्रशासन, व बाल संरक्षण समिती यांच्या संयुक्त प्रयत्नातून दोन्ही मुलांची सुटका करण्यात आली व त्यांना आवश्यक वैद्यकीय उपचाराकरिता पाठविण्यात आले. सध्या मुलांची स्थिती स्थिर असून त्यांना योग्य आरोग्य सेवा दिल्या जात आहेत.

या कार्यक्रमाला उपसरपंच रॉबिन शेलारे ,माजी जि. प. सदस्य सुजित नितनवरे ,वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश रा. तटकरे,पुजा तभाने, मनिषा कुंभरे,जिल्हा बाल संरक्षण समितीचे मुस्तफा पठाण,प्रसनजित गायकवाड, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी साधना ठोबरे, पोलीस पाटील जया कानफाडे, बाल संरक्षण समिती सचिव स्वाती सोनबावणे, अंगणवाडी सेविका भारती डोईफोडे, रुपाली वानखेडे, आशा वर्कर शिला पुसाम, मुख्याध्यापिका निलिमा राऊत, उज्वला तभाने, अल्का गजभीये, बाली डेहरिया, आर्यन ढवळे, प्रियंका होटे, शाहीना शेख, अश्विनी चौरे, साधना हटवार, कोमल मेश्राम ,मनिषा पाटील, सीमा चोखांद्रे, लक्ष्मी माटे, कल्पना तिवारी, प्रणाली तिरपुडे, किरण प्रितम ढोणे, साधना हाडके तसेच ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमातून बाल हक्क व संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित झाले व समितीच्या कार्याचे सर्व मान्यवरांनी कौतुक केले.

# शिक्षकांच्या समस्या निवारणासाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा पुढाकार

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १२ :



"समस्या तुमच्या, पुढाकार आमचा" या विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या उपक्रमाअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील खासगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत समस्या निवारण सभा गुरूवार११ सप्टेंबर रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृह, जिल्हा परिषद नागपूर येथे पार पडली.

या सभेत माध्यमिक शिक्षणाधिकारी, वेतन पथक अधीक्षक यांच्यासह आमदार सुधाकर अडबाले उपस्थित होते. सभेमध्ये अनेक सामूहिक व वैयक्तिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. काही प्रकरणे सभेतच निकाली काढण्यात आली. तर उर्वरित प्रकरणे २३ सप्टेंबरपर्यंत निकाली काढण्याच्या सूचना आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना दिल्या.

सभेला महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे अध्यक्ष तथा माजी आमदार व्ही. यु. डायगव्हाणे, शिक्षणाधिकारी गेडाम, वेतन अधीक्षक चव्हाण, उपशिक्षणाधिकारी वाकोडीकर, प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, प्रांतीय कोषाध्यक्ष भूषण तल्हार नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष अनिल गोतमारे, शहर अध्यक्ष विठ्ठल जुनघरे, ग्रामीण कार्यवाह संजय बारकर, शहर कार्यवाह अविनाश बडे, महानगर कार्याध्यक्ष अरूण कराळे, जिल्हा कार्याध्यक्ष विजय गोमकर, मंडळ सदस्य विश्वास गोतमारेआदींसह जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी धनराज राऊत, लक्ष्मीकांत व्होरा, सचिन इंगोले, दिलीप बांबल, संजय वांगे, शैलेश येडके, दिनेश ढगे, छत्रपाल राऊत, अभिनव ढोबळे, राजु मोहोड, प्रमोद अंधारे, राकेश दुमपल्लीवार, शंकर राऊत यांच्यासह नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समस्या ग्रस्त कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# कर्मचाऱ्यांच्या अभद्र वागणुकीने शेतकरी त्रस्त
## बँक ऑफ इंडिया काटोल शाखेतील प्रकार

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १२ :



स्थानिक बँक ऑफ इंडिया शाखेतील कर्मचाऱ्यांच्या अभद्र वागणुकीला ग्राहक संतापलेले असून या कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी यासाठी शेतकरी व प्रहार संघटनेने लेखी तक्रार दिलेली आहे.

संघटनेने दिलेल्या तक्रारीनुसार बँकेच्या शेतकरी ग्राहकांना कृषी वरती कर्ज घ्यायचे असल्याने त्यांनी काटोल येथील बँक ऑफ इंडिया शाखेत रीतसर अर्ज केलेत, कर्जासाठी लागणाऱ्या संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता केली तरीदेखील बँक ऑफ इंडिया येथील कृषी अधिकारी अर्चना गोतमारे शेतकऱ्यांना नाहक त्रास देत असून बँकेच्या चकरा मारायला लावतात, त्यांना काही विचारले तर त्या ग्राहकांशी अभद्रपणे बोलतात, शाखेत अनेक कृषी कर्ज प्रकरणे प्रलंबित असून बँक कर्मचाऱ्यांच्या अडेलतट्टू धोरणामुळे शेतकऱ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

याबाबत जाब विचारण्यासाठी शेतकरी संघटना व प्रहार संघटनेचे पदाधिकारी गेले असता शाखा व्यवस्थापकांसमक्ष त्या महिलेची उर्मट वागणूक बघायला मिळाली त्यामुळे शेतकरी व प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सदर महिलेच्या विरोधात लेखी तक्रार करून त्या महिलेवर कायदेशीर कारवाई करण्याची तक्रार यावेळी अन्यथा आंदोलनाचा पवित्रा घ्यावा लागेल असा सुचक इशारा यावेळी शेतकरी संघटनेचे पूर्व विदर्भ अध्यक्ष सागर दुधाने, प्रहार संघटनेचे काटोल-नरखेड विधानसभा प्रमुख दिनेश निंबाळकर, प्रफुल ठाकरे, वैभव पाटोळे, अंकित केने, राहुल हिवसे, विनोद काळे, अभिनय सातपुते यांनी यावेळी शाखा व्यवस्थापक रुपेश मोहोळ यांना दिला.

## डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडियाचे रविवारी पदग्रहण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडियाच्या नागपूर शाखेचा पदग्रहण सोहळा रविवारी 14 सप्टेंबरला सकाळी 10 वाजता रामदासपेठेतील हॉटेल सेंटर पॉइंट मध्ये आयोजित करण्यात आला असल्याचे नवनियुक्त अध्यक्ष डॉ. नितीन वडस्कर व मानद सचिव पूजा जाधव यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. महसूल व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे प्रमुख पाहुणे तसेच भुवनेश्वरचे प्रख्यात एंडोक्राइनोलॉजिस्ट प्रो. डॉ. अभयकुमार साहू, बंगळुरूचे डॉ. के. एम. प्रसन्न उपस्थित राहतील. दिवसभर चालणाऱ्या वैज्ञानिक कार्यक्रमात मधुमेह व्यवस्थापनाच्या आव्हानात्मक पैलूंवर केस सादरीकरण होईल. मधुमेह व अंतःस्रावी काळजीमधील नवीनतम उपचार पद्धती विषयावर डॉ. प्रसन्नकुमार व डॉ. अभय साहू यांचे व्याख्यान, मधुमेह मेलीट्समध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) परिवर्तनीय भूमिका विषयावर डॉ. नितीन वडस्कर यांचे अध्यक्षीय व्याख्यान होईल.

# आयसीएआय तर्फे जीएसटी खटल्यांमध्ये एआयचा कर आकारणी वर चर्चासत्र संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :



आयसीएआय नागपूर शाखेने आयसीएआयच्या व्यावसायिक विकास समितीच्या वतीने जीएसटी खटल्यांमध्ये एआयचा कर आकारणी आणि वापर या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.आयसीएआयचे पाच माजी अध्यक्ष, वरिष्ठ मान्यवर, माजी अध्यक्ष आणि २५० हून अधिक सदस्य उपस्थित होते.

आयसीएआय नागपूर शाखेचे अध्यक्ष सीए. दिनेश राठी, यांनी सर्वांचे स्वागत केले आणि शुभेच्छा दिल्या. आयसीएआयच्या पाच माजी अध्यक्षांनी व्यासपीठावर उपस्थित राहून हा ऐतिहासिक कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केला.

आयआरएस, आयकर महासंचालक (प्रशिक्षण), एनएडीटी, नागपूर यांनी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.आयसीएआय - सीएचे पाच माजी अध्यक्ष - अशोक चांडक,सीए जयदीप शाह, सीए.सुनील तलाटी, सीए अतुल गुप्ता आणि सीए. निहार जंबुसारिया यांच्या उपस्थितीने सेमिनार अधिक समृद्ध झाला. प्रमुख पाहुणे आयसीएआयचे माजी अध्यक्ष सीए अशोक चांडक यांनी पाच माजी अध्यक्षांना एकाच व्यासपीठावर आमंत्रित करून इतिहास घडवल्याबद्दल नागपूर शाखेचे कौतुक केले. आणि सदस्यांना मौल्यवान अंतर्दृष्टी आत्मसात करण्याचे आवाहन केले.आयसीएआयचे माजी अध्यक्ष जयदीप शाह यांनी अशा ज्ञान-चालित कार्यक्रमांचे आयोजन केल्याबद्दल शाखेचे कौतुक केले, अध्यक्ष सीए जितेंद्र सगलानी यांनी त्यांच्या संक्षिप्त भाषणात नागपूर शाखेचे या हाय-प्रोफाइल सेमिनारचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल कौतुक केले. सीए आय सी ए आय चे माजी अध्यक्ष सुनील तलाटी यांनी कर आकारणी आणि उत्तराधिकार नियोजनाची गुंतागुंत ज्यामध्ये मृत्युपत्र समाविष्ट आहे" यावर भाषण दिले. सीए आय सी ए आय चे माजी अध्यक्ष अतुल गुप्ता यांनी " टीएसी जिएसटी खटले आणि एआय चा वापर" या विषयावर एक व्यापक सत्र दिले. सीए.आयसीएआयचे माजी अध्यक्ष निहार जंबुसारिया यांनी नवीन आयकर कायदा, २०२५ ची महत्त्वाची वैशिष्ट्ये यावर सादरीकरण केले. तांत्रिक सत्रांचे समन्वय सीए अंकुश केशरवानी, सीए. विनोद अग्रवाल आणि सीए. प्रणवकुमार लिमाजा यांनी केले, तर आयसीएआय नागपूर शाखेचे माजी अध्यक्ष - सीए संजय एम. अग्रवाल, सीए किरीट कल्याणी आणि सीए राजीव दमानी यांनी कार्यवाहीचे अध्यक्षपद भूषवले, त्यांच्या निरीक्षणांनी चर्चा समृद्ध केली.

## राष्ट्रीय लोक अदालत न्यायाधीशांचे जनतेस आव्हान

■ महासागर प्रतिनिधी
सावरगांव, दि. १२ :

सम्माननीय सर्वोच्च न्यायालय आणि सम्माननीय उच्च न्यायालय यांचे निर्देशानुसार दिवाणी न्यायालय नरखेड येथे विधी सेवा प्राधिकरण द्वारे राष्ट्रीय लोक अदालतचे आयोजन केले गेले आहे. या लोकदालतचे ठळक वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत यामध्ये न्यायाधीश, तज्ञ वकील व सामाजिक कार्यकर्ते यांचे मंडळ आपणास मदत करेल. कोणत्याही प्रकारची फी भरावी लागणार नाही. लोकन्यायालयाच्या निवाड्याविरुद्ध अपीलही नाही. न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोक न्यायालया होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी कोटामार्फत करता येते. खटल्यांमध्ये साक्षी पुरावा, उलट तपासणी, दीर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात लोक न्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणामध्ये कायद्यानुसार कोटीची रक्कम परत मिळते. नरखेड तालुक्या अंतर्गत येणाऱ्या सर्व बँका, वित्तीय संस्था, न्यायालयातील प्रलंबित दिवाणी तसेच फौजदारी प्रकरणे, वादपूर्व प्रकरणे अशा अनेक प्रकरणांचा या लोकन्यायालया मध्ये समावेश केला गेला आहे.

याप्रसंगी दिवाणी तथा फौजदारी न्यायाधीश रोहन विजयकुमार थाईल यांनी संबंधित पक्षकारांना त्यांचे प्रकरणे सामंजस्याने संपुष्टात आणावेत असे जाहीर आव्हान केल्याची माहिती एडवोकेट सुदेश मानकर, विधी सेवा समिती पी एल व्ही यांनी आमचे वार्ताहर यांना दिली. मग वाट कसली पाहत आहे, चालून आलेल्या संधीचा त्वरित लाभ घ्या आणि परस्परातील वादांना पूर्णविराम द्या.

# नागपूर मंडळातर्फे माजरी जंक्शन येथे तक्रार निवारण शिबिराचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :



कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी तक्रार निवारणासाठी सुलभ व्यासपीठ उपलब्ध करून देण्यास मध्य रेल्वे, नागपूर मंडल वचनबद्ध आहे. या उद्देशाने 12 सप्टेंबर 2025 रोजी माजरी जंक्शन येथे तक्रार निवारण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा उद्देश कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पारदर्शक आणि प्रभावी व्यवस्था निर्माण करणे तसेच प्रशासनावर कर्मचाऱ्यांचा विश्वास दृढ करणे हा होता.

या शिबिरात 85 लाभार्थ्यांनी सहभाग घेतला. एकूण 23 तक्रारी नोंदविण्यात आल्या, ज्यापैकी 17 तक्रारी - मुख्यतः एचआरएमएस, उमिड आणि इतर नियमित बाबींशी संबंधित - यांचे त्वरित निवारण ठिकाणीच करण्यात आले. उर्वरित 6 तक्रारी योग्य प्रकारे नोंदविण्यात आल्या असून त्यांचे लवकरात लवकर निवारण करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

अशा तक्रार निवारण शिबिरांमुळे कर्मचारी यांना अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळते तसेच संस्थेमध्ये काळजी, पारदर्शकता आणि जबाबदारीची संस्कृती बळकट होते. या शिबिरांमुळे स्थानिक स्तरावर समस्या सोडविण्याला चालना मिळते आणि कर्मचारी यांना ऐकले जात आहे, त्यांना महत्व दिले जात आहे आणि त्यांना सहकार्य मिळत आहे असे भासते. नागपूर मंडळ, मध्य रेल अशा नियमित उपक्रमांद्वारे कर्मचारी कल्याणाला प्राधान्य देत असून प्रेरित कामगार शक्ती निर्माण करून रेल्वे कामकाजाच्या एकूण कार्यक्षमतेत भर घालत आहे.

## तलवारीच्या धाकावर हैदोस

**नागपूरः** तलवारीचा धाक दाखवून परिसरात हैदोस घालणाऱ्या गुंडाला पाचपावली पोलिसांनी अटक केली. आतिश गरीबदास शेंडे (३०) रा. शोभाखेत, गोंडपुरा असे अटकेतील गुंडाचे नाव आहे. आतिश हा सराईत गुन्हेगार आहे. त्याची एक टोळीही आहे. आतिश आणि त्याच्या टोळीविरुद्ध अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. एप्रिल महिन्यातच परिमंडळ क्र. ९ च्या पोलिस उपायुक्तांनी त्याच्या संपूर्ण टोळीला तडीपार केले होते. यापूर्वी या टोळीला बनावट नोटांच्या खरेदी विक्रीतही अटक झाली आहे. तडीपार असतानाही आतिश सोमवारी रात्री लाकडीबागच्या बुद्ध मूर्ती चौकात आला. तेथे तलवार हवेत फिरवत हैदोस घालू लागला. रस्त्याने ये-जा करणाऱ्यांसह परिसरातील नागरिकांना धमकावू लागला.

# राज्यस्तरीय ज्ञान स्पर्धेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १२ :



येथील द्वारकाधीश मंदिर समितीच्या वतीने खडगाव रोड स्थित श्रीमती विमलताई तिडके विद्यालय केंद्रात ३ ऑगस्ट रोजी अखिल भारतीय पंचकृष्ण प्रबोधन परिषद श्री क्षेत्र यांच्या वतीने श्रीमद भगवद्गीता वर आधारित राज्यस्तरीय ज्ञान स्पर्धेचे आयोजन केले होते स्पर्धेत एकूण ७४ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

नुकताच प पु आमान्य आचार्य लोणारकर बाबा महानुभाव यांनी निकाल घोषित केला यात प्रसन्न अंजनकर,रवींद्र नरडे हे प्राविण्यासह उत्तीर्ण झाले तर प्रथम श्रेणीत ज्योत्स्ना ढुबराज लांबट, वंदना नरेंद्र आममेर व गोपाल येवले हे प्रथम श्रेणीत झाले आहे.

या केंद्राचा निकाल शंभर टक्के लागला आहे. सर्व विजयी स्पर्धकांचे परम परमेश्वर गोविंद प्रभू यांच्या जन्मदिनाच्या शुभपर्वणी पत्रकार सुरेश फलके यांच्या अध्यक्षतेखाली तसेच ज्ञानसेवक दादा येळमकर, द्वारकाधीश समितीचे पदाधिकारी नरेंद्र आममेर,विजय भरभत, प्रभाकर साबळे यांच्या हस्ते सर्व विजयी स्पर्धकांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी राजेश देवडे, प्रशांत पोहकर, यश मोहोळ निखिल नानवटकर, ढुबराज लांबट, शरद भोयर, नंदलाल लांबट,अर्चना मानकर, वर्षा पोहकर, साक्षी भरबत, स्वाती लांबट, रूपाली नानवटकर उपस्थित होते.

# बेलदा येथे बँक ऑफ इंडियाचे ग्राहक सेवा केंद्र सुरू

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १२ :



आदीवासी बहुल भाग देवलापार परिसरातील सुमारे ४० गावांमध्ये बँक ऑफ इंडियाची केवळ एकच शाखा असल्याने नागरिकांना अडचणी येत होत्या. अनेक वेळा बँकेशी संबंधित कामांमध्ये खूप अडचणी येत होत्या.

ही समस्या लक्षात घेऊन रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा माजी सरपंच उमेश भांडारकर यांनी बेलदा येथील त्यांच्या निवासस्थानी बँक ऑफ इंडियाचे ग्राहक सेवा केंद्र सुरू केले आहे. बँक ऑफ इंडिया देवलापार शाखा व्यवस्थापक कर्णके, माजी जिल्हा परिषद सदस्या शांता कुमरे, सरपंच स्नेहा भांडारकर,माजी उपसरपंच तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उमेश भांडारकर सह आदींच्या उपस्थितीत या सेवा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. यामुळे आदिवासी बहुल देवलापार परिसरातील नागरिकांना मोठी सुविधा मिळाली आहे.

# साक्षी नागदवनेची विभागीय च्याकांडो शालेय स्पर्धेसाठी निवड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :



क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर व नागपूर शालेय आंतर जिल्हा शास्त्रांग मार्शल आर्ट (च्याकांडो) स्पर्धेत एडिफाय स्कूलच्या इयत्ता सातवीतील साक्षी जितेंद्र नागदवने हिने उज्वल कामगिरी करत सुवर्ण पदक पटकावले. या उल्लेखनीय यशामुळे साक्षीची विभागीय च्याकांडो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिच्या या उत्तुंग यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. साक्षीने आपल्या यशाचे श्रेय शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता देव, मॅनेजर आणि सर्व शिक्षकवृंदांना दिले आहे. तिच्या पुढील वाटचालीसाठी क्योशी हरीश चौबे, रेंशी प्रमोद जांभुळकर, सेंसाई किरण यादव, सुमित नागदवणे आणि सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## क्रेडिट कार्डच्या माध्यमातून लाखोंचा चुना

**नागपूर :** सायबर ठकबाजाने एका व्यक्तीला जाळ्यात अडकवत क्रेडिट कार्डमधून ३.२१ लाख रुपये उडविले. या प्रकरणी सीताबर्डी पोलिसांनी स्वप्निल जनार्दन देशमुख (३८) रा. मिहानच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. स्वप्निल यांचे सिव्हील लाईन्सच्या गुप्ता टॉवरमध्ये इपोरॉक मायनेरिंग इंडिया प्रा. लि. कंपनीचे कार्यालय आहे. ८ ऑगस्टच्या दुपारी ते कार्यालयात बसलेले होते. या दरम्यान त्यांच्या मोबाईलवर ९६८२०७०८९७ या क्रमांकावरून कॉल आला. फोन करणाऱ्याने ॲक्सिस बँक क्रेडिक कार्ड विभागातून बोलत असल्याची बतावणी करीत त्यांच्या कार्डची मुदत संपल्याची माहिती दिली. तसेच कार्डची मुदत पुन्हा वाढविण्यासाठी वेबसाईटवर जाऊन काही प्रक्रिया करावी लागेल असे सांगितले.

स्वप्निलला बोलण्यात अडकवून आरोपीने त्यांना क्रेडिट कार्ड आणि त्याचा पिन नंबर मागितला. याचा वापर करीत त्यांच्या खात्यातून ३ लाख २१ हजार रुपये काढले. खात्यातून पैसे निघाल्याचा मॅसेज मिळाल्यानंतर स्वप्निलला फसवणूक झाल्याचे समजले. त्यांनी सीताबर्डी पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आयटी ॲक्ट आणि फसवणुकीसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# विद्यार्थ्यांनी साकारलेल्या गोंड चित्रकलेच्या प्रदर्शनीचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने बॅनियन ट्री फाऊंडेशन तर्फे गोंड चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन नागपूर येथील जवाहरलाल दर्डा आर्ट गॅलरीमध्ये दिनांक १३ व १४ सप्टेंबर रोजी भरविण्यात येणार आहे. प्रदर्शन सकाळी ११ ते रात्री ८ पर्यंत चालू राहील.

या प्रदर्शनात पेंच परिसरातील ४ शाळांमधील २८ विद्यार्थ्यांनी साकारलेली चित्रे प्रदर्शित केली जाणार आहेत. गोंड चित्रकला ही मध्य भारतातील सर्वात मोठ्या आदिवासी गोंड परंपरेचा महत्त्वपूर्ण प्रकार आहे. रेषा, बिंदू व झगमगत्या नैसर्गिक रंगांच्या वापरामुळे ही चित्रशैली विशेष उठून दिसते. निसर्ग, वन्यजीवन, लोककथा आणि सांस्कृतिक परंपरा ही या चित्रांची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. बॅनियन ट्री फाऊंडेशन गेल्या दोन वर्षांपासून पेंच व्याघ्र प्रकल्प परिसरातील ४० निवडक शाळांमध्ये पर्यावरण जनजागृतीचे कार्य करत आहे. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून या प्रदर्शनीचे आयोजन केले जात आहे. विशेष म्हणजे केवळ चार महिन्यांत ज्यांना या चित्रशैलीबद्दल काहीही माहिती नव्हती, त्या विद्यार्थ्यांनी आता कल्पकतेच्या जोरावर आकर्षक व प्रभावी चित्रे साकारली आहेत. ही सर्व विद्यार्थी सातवी ते बारावीच्या वर्गातील आहेत.

विद्यार्थ्यांना या कलाशैलीची तंत्रशुद्ध माहिती, व सांस्कृतिक महत्त्व याबाबत नागपूरचे ज्येष्ठ कलाकार धनंजय पाठक यांनी मार्गदर्शन केले. या विशेष प्रदर्शनाला जास्तीत जास्त संख्येत नागरिकांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला दाद द्यावी आणि या पारंपरिक कलेच्या जतनात आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन बॅनियन ट्री फाऊंडेशनतर्फे संजय करकरे यांनी केले आहे.

# राजेंद्र हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय मल्लखांब स्पर्धेसाठी निवड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

महाल येथील श्री राजेंद्र हायस्कूलमधील चार विद्यार्थ्यांनी क्रीडा आणि युवा सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर यांनी आयोजित केलेल्या महानगरपालिका स्तरीय शालेय मल्लखांब स्पर्धा २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. विजेत्यामध्ये शाल्मली सुर्जीकर, सई बर्डे, वंश कुलकर्णी, खुशी कानडे आहेत.त्यांची नागपूर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेतील मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व शिक्षकांनी अभिनंदन केले



# ३.७४ लाखांचा नायलॉन मांजा जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

नंदनवन पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर शासनाकडून प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीच्या घरावर धाड टाकून त्याला अटक केली. त्याच्याकडून ३ लाख ७४ हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित मांजा जप्त करण्यात आला. हुसेन खान सरफराज खान (३२) रा. हसनबाग कब्रस्तानजवळ, गल्ली क्र. २ असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी नंदनवन पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान हुसेन याने त्याच्या घरी मोठ्याप्रमाणात नायलॉन मांजा साठवून ठेवला असल्याची गोपनिय माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांची त्याच्या घरावर धाड टाकली. झडतीमध्ये दोन प्लॅस्टिकच्या पोत्यांमध्ये मोनो फिल गोल्ड मांजाच्या १९२ आणि मोनो काईट लेबलच्या २४० चक्री नायलॉन मांजा मिळाला. या मांजाची एकूण किंमत ३ लाख ७४ हजार रुपये आहे. पोलिसांनी सर्व माल जप्त केला.

# लहान मुलांकरिता सदर येथे मनपाच्या इंग्रजी शाळा सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

नागपूर महानगरपालिका आणि आकांक्षा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राय बहादूर गोवर्धनदास गोपीकिशन राजारामका (अग्रवाल) इंग्रजी माध्यमाची शाळा (आर बी.जी.जी.आर.(ए)) सदर येथील शाळेचे नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सोमवारी (ता.२) शाळेच्या पहिल्या दिवशी पालकांसह विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला असून, ज्युनिअर व सिनीअर के.जी साठी अद्याप प्रवेश प्रक्रिया सुरूच आहे.

विद्यार्थ्यांना निःशुल्क आणि उत्तम दर्जेदार शिक्षण इंग्रजी माध्यमातून या शाळेत मिळणार असून, नागरिकांनी आपल्या पाल्यांना शाळेत प्रवेश देऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी यावेळी केले.

याप्रसंगी मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी,. शाळेकरिता मनपाला जागा दान करणारे अग्रवाल कुटुंबातील कुंजबिहारी अग्रवाल आणि कुमकुम कुंजबिहारी अग्रवाल, माजी नगरसेवक सुनील अग्रवाल, मनपाच्या शिक्षणाधिकारी साधना सयाम, नोडल अधिकारी विनय बगले, शाळा निरीक्षक प्रशांत टेम्भूर्णे, पीएमयूचे सुनील सोनवणे, शाळेच्या मुख्याध्यापिका शारदा खंडागळे, आकांक्षा फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौरभ तनेजा, बोर्ड मेंबर समीर बेंद्रे, संचालक सोमसुर्व चॅटर्जी यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले की, मनपाने आकांक्षा फाऊंडेशनच्या सहकार्याने नागपुरात एकूण सहा शाळा सुरू केल्या असून, आर बी.जी.जी.आर.(ए) ही इंग्रजी माध्यमाची सातवी शाळा आहे. नागपूर महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी इतर शाळांच्या विद्यार्थ्यांशी स्पर्धा करण्यात कुठेही मागे राहू नयेत, तसेच त्यांना निःशुल्क आणि शिक्षण इंग्रजी माध्यमातून त्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे, या उद्देशाने ही शाळा सुरू करण्यात आली आहे. या शैक्षणिक वर्षापासून ज्युनिअर के.जी. व सिनीअर के. जी. मध्ये प्रवेश सुरू करण्यात आले आहेत. तसेच पुढीलवर्षी इतर वर्ग सुरू करण्याचा मनपाचा मानस आहे. ही नवीन शाळा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाशी संलग्नित आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेत प्रवेश करून घेण्याची ही उत्तम संधी असून, अधिकाधिक पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नागपूर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी यावेळी केले.

याप्रसंगी मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांनी सांगितले की, आर बी.जी.जी.आर.(ए)) या शाळेत मुलांचा सर्वांगीण विकास होईल व त्यांना उत्तम शिक्षण मिळणार आहे. विद्यार्थ्यांचा पाय मजबूत होऊन भविष्य त्यांना उत्तम शिक्षणाची संधी मिळेल. मनपा शाळेतील शिक्षक नव्या व कौशल्यपूर्ण पद्धतीने, गाणे /नाट्य यांच्या मदतीने विद्यार्थ्यांना शिकवितात. पालकांनी देखील मुलांना दररोज शाळेत पाठवावे, त्यांच्या शिक्षकणाकडे लक्ष द्यावे,असे अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांनी यावेळी सांगितले. यावेळी त्यांनी शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले. या शाळेत अजूनही प्रवेश सुरु असल्याची माहिती दिली. तर या विषयी इतरांना पण माहिती देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या शाळेकरिता मनपाला जागा दान करणारे अग्रवाल कुटुंबाचे श्री कुंजबिहारी अग्रवाल यांनी ही शाळा सुरु झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. हे एक शैक्षणिक अभियान असून, याला पुढे नेणे हे मोठे काम असल्याचे अग्रवाल यांनी सांगितले. यावेळी माजी नगरसेवक सुनील अग्रवाल यांनी मनपाने शाळा सुरू केल्याबद्दल आभार मानले.

# वंचित दिव्यांगांचे युडीआयडी कार्ड तयार करण्यासाठी एसओपी तयार करा : आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

नागपूर महानगरपालिकेद्वारे दिव्यांगांचा एकत्रित डाटा संकलित करण्यासाठी मनपाच्या आरोग्य विभागाच्या वतीने महात्मा गांधी सेवा संघ यांच्या माध्यमातून आशा सेविकांमार्फत दिव्यांग सर्वेक्षण करण्यात आले. हे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, त्याच्या अहवालानुसार युडीआयडी कार्ड पासून वंचित दिव्यांगांचे युडीआयडी कार्ड तयार करण्याकरिता तातडीने एससोपी तयार करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले.



महात्मा गांधी सेवा संघ यांचेद्वारे दिव्यांग सर्वेक्षणाचा अहवाल गुरुवारी (ता. ११) मनपा आयुक्तांना सुपूर्द करण्यात आला. यावेळी अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., उपायुक्त डॉ. रंजना लाडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर उपस्थित होते. महात्मा गांधी सेवा संघ चे श्री. विजय कान्हेकर यांनी मनपा आयुक्तांकडे अहवाल सोपविला. आयुक्त सभाकक्षात या अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये, अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे, डॉ. स्नेहल शंभरकर, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. नितीन शेंडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. समता भटनागर, डागा रुग्णालयाच्या डॉ. एस.एन. खानम, सीआरसी नागपूरचे संचालक श्री. प्रफुल्ल शिंदे, दिव्यांग समन्वयक श्री. अभिजीत राऊत आदी उपस्थित होते.

मनपाच्या आशा सेविकांमार्फत २१ प्रकारच्या दिव्यांगत्वाची ओळख करून घेण्यासाठी दहाही झोनमध्ये एप्रिल ते जून २०२५ या कालावधीमध्ये दिव्यांग सर्वेक्षण करण्यात आले. याकरिता आशा सेविकांना प्रशिक्षण देखील देण्यात आले. त्यानुसार आशांनी शहरातील ५ लाख २० हजार ३६० घरांतील ९२ हजारावर दिव्यांगांचे सर्वेक्षण केले. यातील १४९१६ दिव्यांगांकडे आधार कार्ड तर ७० हजार ८८४ संभाव्य दिव्यांगांकडे युडीआयडी कार्ड नसल्याची माहिती पुढे आली आहे. याशिवाय मतदार कार्ड, बँक खाते तसेच शासकीय योजनांपासून देखील अनेक दिव्यांग वंचित असल्याचे स्पष्ट झाले. दिव्यांगांना मनपा व शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी युडीआयडी कार्ड अनिवार्य आहे.

त्यामुळे युडीआयडी कार्डपासून वंचित दिव्यांगांचे लवकरात लवकर कार्ड तयार करण्यासाठी एसओपी निर्धारित करण्यासाठी समिती गठीत करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. अतिरिक्त आयुक्तांच्या देखरेखीत गठीत समितीमध्ये वैद्यकीय आरोग्य अधिकारी, दिव्यांग समन्वयक यांचा समावेश असावा, असेही त्यांनी सूचित केले. युडीआयडी कार्ड तयार करण्यासाठी ४० टक्क्यांच्या वर दिव्यांगत्व असलेल्यांचा व युवा दिव्यांगांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने प्रक्रिया केली जाणार आहे.

याशिवाय दिव्यांगांना संजय गांधी पेन्शन योजना व यासारख्या अनेक अन्य शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी योजनानिहाय संबंधित विभागाचे प्रतिनिधींचा समावेश असलेली समिती गठीत करण्याची देखील सूचना आयुक्तांनी केली.

आधार कार्ड तयार करण्याकरिता वंचित दिव्यांगांच्या नजीकच्या आधार केंद्रांची माहिती एसएमएस द्वारे पाठविण्याचे निर्देश आयुक्तांनी समाज विकास विभागाला दिले. मतदार कार्ड पासून वंचित दिव्यांगांचे मतदार कार्ड तयार करण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयासोबत समन्वय साधण्याबाबत देखील आयुक्तांनी सूचित केले. सीआरसी द्वारे दिव्यांगांना सहायक साधने प्रदान केली जातात. शहरातील दिव्यांगांना या साहित्याचा लाभ मिळावा यासाठी मनपाद्वारे सीआरसी ला आवश्यक सहकार्य करण्यात येईल व त्याकरिता अर्थसंकल्पात देखील तरतूद करण्यात येईल याबाबत आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी आश्वस्त केले. दिव्यांगांना एकाच ठिकाणावरून सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी सुविधा तसेच त्यांना आवश्यक सेवा प्रदान करण्यासाठी वन स्टॉप सेंटर तयार करण्याची गरज यावेळी आयुक्तांनी व्यक्त केली व त्यादृष्टीने कार्यवाही करण्याबाबत त्यांनी सूचना केली.

# महिलेचे अपहरण करून ठार मारण्याचा प्रयत्न

## मरणासन्न अवस्थेत रस्त्यावर फेकून आरोपी पसार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :

लग्नासाठी दबाव टाकत असल्यामुळे आरोपीने साथीदारांसोबत मिळून तिला संपविण्याची योजना बनवली. भेटायच्या बहाण्याने बोलावून कारमधून तिचे अपहरण केले. या दरम्यान तिला कारमध्येच जबर मारहाण करण्यात आली. ठार मारण्याच्या उद्देशातून तिच्यावर लोखंडी रॉडने वार केले. गंभीर जखमी होऊन ती निपचित पडली. कोणतीही हालचाल होत नसल्याने तिचा मृत्यू झाल्याचे समजून आरोपींनी तिला रस्त्यावर फेकले आणि पसार झाले. परिसरातील नागरिकांकडून सूचना मिळताच तहसील पोलिस घटनास्थळी पोहोचले.

तत्काळ तिला रुग्णालयात दाखल केले आणि तिचे प्राण वाचले. तिच्या जबाबावरून पोलिसांनी गुन्हा नोंदवत दोन आरोपींना अटक केली, तर त्यांचा तिसरा साथीदार फरार आहे. इरशाद अहमद (२६) रा. टिपू सुल्तान चौक, यशोधरानगर आणि शेख इमरान शेख रशीद (३८) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. दस्तगीर आलम (२२) रा. बांजरा असे फरार आरोपीचे नाव असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, इरशाद हा विवाहित असून भंगारचा व्यवसाय करतो तर शेख इमरान हा कॅब चालक आहे. पीडित महिला मूळची उत्तरप्रदेशातील आहे. लग्नानंतर ती नागपुरात राहायला आली. डिसेंबर २०२४ मध्ये तिच्या पतीचे निधन झाले. आधार गेल्याने ती एकटी पडली. आरोपी शेख इमरानच्या माध्यमातून पीडितेची ओळख इरशाद सोबत झाली. नेहमी फोनवर बोलत असल्याने त्यांची घट्ट मैत्री झाली. एमेकांसोबत भेटीगाठी सुरू झाल्या. पीडितेला आधार नसल्याने आरोपी इरशादने तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकवले. लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषण करू लागला. त्यामुळे पीडिता इरशादवर लग्नासाठी वारंवार दबाव टाकत होती.

याप्रकाराला तो संतापला होता. त्याने इमरान आणि दस्तगीरसोबत मिळून तिला धडा शिकवण्याची योजना बनवली. ७ सप्टेंबरला इरशादने पीडितेला फोन करून एलआयसी चौकात भेटायला बोलावले. कारमध्ये बसवून तिला घेऊन गेला. दिवसभर तिला फिरविले. रात्री तो तिला ताजबाग परिसरात घेऊन गेला. तेथे तिन्ही आरोपींनी पीडितेला कारमध्येच बेदम मारहाण सुरू केली. लोखंडी रॉडने मारल्याने ती रक्तबंबाळ होऊन बेशुद्ध पडली. कोणतीही हालचाल होत नसल्याने तिचा मृत्यू झाल्याचे आरोपींना वाटले. ते तिला तहसील ठाण्याच्या हद्दीतील गार्ड लाईन परिसरात घेऊन गेले. निर्जन रस्ता पाहून तिला कारमधून बाहेर फेकले आणि पसार झाले. ती रात्रभर रस्त्यावरच पडून होती.

सकाळी नागरिकांची वर्दळ वाढल्यानंतर ही घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच तहसील पोलिस घटनास्थळी पोहोचले. तत्काळ तिला उपचारार्थ मेयो रुग्णालयात भरती केले. पोलिसांनी जरा देखील उशीर केला असता तर पीडितेचा जीव वाचणे कठीण होते, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. पीडिता शुद्धीवर आल्यानंतर पोलिसांनी तिचा जबाब नोंदविला. विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून इरशाद आणि इमरानला अटक केली. फरार दस्तगीरचा शोध सुरु आहे.

# दीक्षाभूमी आणि ड्रॅगन पॅलेस येथे येणाऱ्या अनुयायांच्या आवश्यक सुविधांचे नियोजन करुन खातरजमा करा

## जिल्हास्तरीय प्रशासकीय आढावा बैठकीत निर्देश



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :

प्रशासनासाठी दीक्षाभूमीवरील धम्मचक्र प्रवर्तनदिनाचे आयोजन महत्वपूर्ण असून या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक अनुयायांना आरोग्य, सुरक्षा, स्वच्छता, खानपान सुविधांचा योग्य वापर करता यावा, याद्दष्टीने तातडीने नियोजन करुन याची खातरजमा प्रत्येक विभागाने करावी, अशा सूचना आज प्रशासकीय आढावा बैठकीत देण्यात आल्या.

पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांनी आयोजनाच्या तयारीचा विभाग प्रमुखांकडून आढावा घेतला.

पुढील महिन्यात दीक्षाभूमी येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे आयोजन होत आहे. त्यासाठीच्या व्यवस्थेसंदर्भात आढावा बैठकीला माजी मंत्री अॅड. सुलेखाताई कुंभारे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर दीक्षाभूमी स्मारक समितीचे डॉ.सुधीर फुलझेले, डॉ. राजेंद्र गवई यांच्यासह प्रशासनाच्या विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. स्वच्छता, आरोग्य, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, स्नानगृहे, शौचालये, सुरक्षा आदी व्यवस्थेसह अनुयायांच्या आरोग्याची काळजी घेण्यात यावी.

दीक्षाभूमी आणि ड्रॅगन पॅलेस येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने अभिवादनासाठी येणाऱ्या राज्याच्या विविध भागांसह देश-विदेशातील अनुयायांना सर्व प्रकारच्या आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासनातर्फे करण्यात आलेल्या नियोजनाबाबत यावेळी विभागनिहाय माहिती देण्यात आली.

दीक्षाभूमी व परिसरात पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था, स्वच्छतेची विशेष काळजी घेत दीक्षाभूमी व ड्रॅगन पॅलेस परिसरात स्वच्छता कर्मचाऱ्यांची व्यवस्था तसेच, रेल्वे स्थानक व बसस्थानकांवरही स्वच्छतेची काळजी घेण्यात येणार आहे.

# राष्ट्रीय लोक अदालत १३ सप्टेंबर रोजी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने १३ सप्टेंबर रोजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण डी.पी.सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यामध्ये जिल्ह्यातील हजारो न्यायालयीन प्रलंबित व दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. तरी सर्व संबंधित पक्षकारांनी लोक अदालतीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश प्रविण उन्हाळे व जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष रोशन बागडे यांनी केले आहे.

लोकअदालतीचा मुख्य उद्देश न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे, दाखलपूर्व प्रकरणे त्वरीत निकाली काढून पक्षकारांना त्वरीत न्याय देणे हा आहे.

## निर्माणाधिन इमारतीत सुरू होता जुगार

# ४ अटकेत, २ फरार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :

ठाण्यांतर्गत एका निर्माणाधिन इमारतीत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर हिंगणा पोलिसांनी धाड टाकली. यावेळी ४ आरोपींना पोलिसांनी जुगार खेळताना रंगेहात अटक केली. मात्र दोन जुगारी फरार होण्यात यशस्वी झाले. आकाश राजू बोरघरे (४८) रा. बुटीबोरी, कौशिक संजय सावंत (२४) रा. मनीषनगर, प्रशांत गोपालराव वाठ (३५) रा. साईनगर, हुडकेश्वर आणि नीलेश किशोर कोचे (३५) रा. रामटेकनगर टोली अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

जामठाच्या वैनगंगा लेआऊट येथील एका निर्माणाधिन इमारतीत काही जुगारी गोळा झाले असून ताशपत्त्यांवर हार-जीतची बाजी लावली जात असल्याची माहिती सोमवारी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास हिंगणा पोलिसांनी मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी रात्री ९.१५ वाजताच्या सुमारास इमारतीत धाड टाकली. पोलिसांना पाहताच दोन युवकांनी तेथून पळ काढला, मात्र उर्वरीत चारही आरोपींना रंगेहात पकडले. पोलिसांनी आरोपींकडून रोख २४,१००, २ दुचाकी वाहन, २ चारचाकी वाहन, ऑटो, फॅन आणि इतर साहित्यांसह एकूण १४.५९ लाख रुपयांचा माल जप्त केला.

# नागपूर जिल्ह्यातील सभेत ९ प्रकरणे ऑन द स्पॉट निकाली

## आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने प्रलंबित प्रकरणांस मान्यता



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १२ :

आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील खासगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्यांबाबत समस्या निवारण सभा ११ सप्टेंबर २०२५ रोजी खेडेकर सभागृह, जि.प. नागपूर येथे पार पडली. या सभेत विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने ९ प्रकरणे "ऑन द स्पॉट" निकाली काढण्यात आली. सभेत वैयक्तिक मान्यता, वरिष्ठ/निवड श्रेणी प्रकरणे व अन्य प्रकरणे कार्यालयात अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याची बाब आमदार सुधाकर अडबाले यांच्या लक्षात आली. यावर आमदार अडबाले यांनी आजच्या आज मान्यता देण्याचे निर्देश शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना दिले.

त्यानुसार सभा संपताच माधव मनिराम ठावरी (ऋखडाश्रय विद्यालय, कुही) यांना उपमुख्याध्यापक पदावरील उन्नतीस कार्योत्तर मंजुरी, नेहा राजेंद्र कानडे (बनारसीदास रुईया हायस्कूल काटोल) यांना निवड श्रेणी, माधवी जयसिंग खिंची (बनारसीदास रुईया हाय. काटोल) यांना निवड श्रेणी, अनिल भुरे (साईनाथ विद्या मंदिर (हाय) व कनिष्ठ महा. प्रगतीनगर नागपूर) यांना मुख्याध्यापक पदाचे आर्थिक व प्रशासकीय अधिकार, रुपी प्रदिप कठ्ठा (जीवन विकास विद्यालय उमरेड) यांना सेवासातत्य, दुर्योधन उमराव चौधरी (पुण्यश्लोक विद्यानिकेतन खुमारी) यांना आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ, अरुण हरिश्चंद्र केळवदे (पंडित नेहरू हाय. जगदीश नगर, मकरधोकडा काटोल) यांना आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ, संजय सदाशिव ठवकर (पुण्यश्लोक विद्यानिकेतन खुमारी) यांना वरिष्ठ श्रेणी, दिनेश कृष्णाजी बारापात्रे (गौतम विद्यालय, डोंगरमौदा कुही) यांना वरिष्ठ श्रेणीस 'ऑन द स्पॉट' मान्यतेचे पत्र देण्यात आले. नागपूर जिल्ह्यातील अनुकंपा तत्वावरील नियुक्तीची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे सभेत निदर्शनास आले. अनुकंपा प्रकरणाबाबत तात्काळ कॅम्प लावून प्रलंबित प्रकरणे २३ सप्टेंबरपूर्वी निकाली काढा, अश्या सूचना आमदार सुधाकर अडबाले यांनी दिल्या. वेतनेत्तर अनुदान येऊनही पाच महिन्यांचा कालावधी झाला तरीही वेतनेत्तर अनुदान शाळांना मिळालेले नाही. त्यामुळे वेतनेत्तर अनुदान १५ दिवसांत वितरीत करण्याबाबत सूचना दिल्या. मान्यता वर्धित व मंडळ मान्यताबाबत कॅम्प लावून निकाली काढण्यात याव्या, २०२३-२४ मध्ये अतिरिक्त झालेल्या शिक्षक - कर्मचाऱ्यांचे समायोजन कुठे व कधी केले, याबाबतची संपूर्ण माहिती देण्यात यावी, शिक्षण विभाग (माध्य.) कार्यालयातील प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याच्या सूचना आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना दिल्या.

# राजेंद्र सांभारे यांना मातृशोक

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. १२ :



तालुका पत्रकार संघाचे जेष्ठ सदस्य राजेंद्र सांभारे यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई हरिभाऊ सांभारे (वय ८२)यांचं आज (१२) दुपारी चार वाजताच्या सुमारास त्यांच्या पैतृक गावी गळपुरा,काटोल येथे निधन झालं. त्यांच्या पार्थिवावर उद्या (१३) सकाळी ११ वाजता काटोल येथे अंत्यसंस्कार करण्यात येईल.

# ब्रह्माकुमारीज नागपूरच्या विश्व शांती सरोवरचा सातवा वर्धापन दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १२ :



ब्रह्माकुमारीज नागपूरच्या विश्व शांती सरोवर चा सातवा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यामध्ये मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहिलेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ब्रह्माकुमारीज हे व्यक्तीच्या कल्याणाचे कार्य राष्ट्रहिताचे कार्य करीत आहेत आणि हे संपूर्ण जगाला सुख-शांतिमय व सुंदर बनविण्याचे कार्य आहे.

ब्रह्माकुमारीज शील व चारित्र्य जागवण्याचे काम करते आणि चारित्र्य जागवण्याचा आधार म्हणजे शरीर-मन-बुद्धीच्या पलीकडे जाऊन आपल्या अंतर्यात्रेला प्रारंभ करणे. संघही सांगतो की बनायचे असेल तर आतून बना. चारित्र्यात शील असते. बाहेरचे बोलणे, वागणे, वर्तन योग्य ठेवायचे असेल तर आतली प्रवृत्ती योग्य असली पाहिजे. त्यासाठी अंतरंगात खोल उतरून आपण स्वतःला शुद्ध केले पाहिजे.

प्रत्येकाचा मार्ग वेगळा असतो, पण मूलभूत उद्देश एकच आहे. अंतर्गत शक्ती जागृत करणे. समान उद्देश असणाऱ्यांनी एकमेकांचे पूरक बनले पाहिजे. परस्पर सहकार्याने चालले पाहिजे, अडथळा निर्माण करून नाही. आज जगाला भारताकडूनच मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे.

त्यांनी स्पष्ट केले की जगातील बहुतांश संघर्ष स्व चा आहे. मला हवे आहे ही भावना निर्माण झाली की दुसऱ्याच्या हिताचा विचार होत नाही. जगात सतत हा भीतीचा प्रश्न असतो की हा मोठा झाला तर आमचे काय होईल?

भारत मोठा होईल तर आमचे स्थान कुठे राहील - या भावनेमुळे इतर देश अडथळे निर्माण करतात. पण खरे समाधान मी आणि माझे म्हणजे आम्ही आणि आमचे या भावनेत आहे. जेव्हा हा दृष्टिकोन जागृत होतो तेव्हा सर्व समस्या संपतात. जगाला आज सोल्यूशन हवे आहे. डॉ. भागवत म्हणाले की शरीराच्या पलीकडे जे अमर तत्व आहे तेच सत्य आहे. आपल्या पूर्वजांनी आपल्याला हे अक्षरज्ञान दिले आहे.

# १० चोरीच्या दुचाकी जप्त

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १२ :

वाडी पोलिसांनी वाहनचोरीच्या मोठ्या प्रकरणाचा पदार्फाश करत एक आरोपीला अटक केली. आरोपीकडून तब्बल १० चोरीच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या असून त्यांची एकूण किंमत सुमारे ७ लाख ५० हजार रुपये इतकी आहे. या कारवाईत आतापर्यंत ५ गुन्ह्यांचा उलगडा झाला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव विजेंद्र उर्फ विजय रंजीत सोनबरसे (२३), रा. सावर्गाव, ता. नरखेड, जि. नागपूर असे आहे. फियार्दीचे नाव शुभम ब्रिजलाल शर्मा (२२), रा. आठवामैल असे आहे. या प्रकरणी वाडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ५४०/२०२४ भा. दं. सं. २०२३ कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीकडून खालील १० दुचाकी हस्तगत करण्यात आल्या : बजाज पल्सर 220 (MH-31-FZ-0495) 1,20,000/- बजाज पल्सर 150 (MH-40-2-6941) 1,00,000/- बजाज पल्सर 220 (MH-31-ऐ-0085) 1,20,000/- हिरो स्प्लेंडर प्रो (MH-40-AF-6030) 60,000/- होंडा शाइन (MH-40-BA-5332) 60,000/- बजाज डिस्कव्हर 100 50,000/- हिरो स्प्लेंडर 50,000/- होंडा शाइन (नंबर प्लेट नसलेली, चेसिस नंबर खोडलेला) 60,000/- होंडा ड्रीम युगा 60,000/- टीव्हीएस अपाचे 70,000/- एकूण किंमत 7,50,000/ आरोपीने कबुली दिली की, तो चोरीच्या गाड्या सेकंडहँड असल्याचे सांगून लोकांना विकत असे.

## महासागर प्रभाग वार्ता

# संजय गांधी मैदान येथे कचऱ्याचे साम्राज्य

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि. १२

## स्थानिक नागरिक संतप्त



प्रभाग क्रमांक ७ इंदोरा मेट्रो स्टेशन च्या मागे संजय गांधी मैदान कचऱ्याच्या साम्राज्याखाली दबले गेले आहे. मैदानावर ठिकठिकाणी कचरा पडलेला असून, त्यातून दुर्गंधी पसरत आहे आणि डास-माश्यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे परिसरात आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता असून, स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.स्थानिक सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक प्रभू गजभिये, राजरत्न टेंभुर्णे, प्रवीण नाईक, राजेश वासनिक, अजय सहारे आणि प्रशांत साखरे, विनय घरडे यांनी प्रशासनाकडे नियमित साफसफाई आणि कचरा व्यवस्थापन करण्याची जोरदार मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, इतक्या मोठ्या प्रमाणावर कचरा जमा होणे हे प्रशासनाच्या दुर्लक्षाचे स्पष्ट उदाहरण आहे.आम्ही वारंवार तक्रारी करूनही कुणी लक्ष देत नाही. कचऱ्यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढतो आहे,असे राजरत्न टेभुर्णे यांनी सांगितले.नागरिकांनी लवकरात लवकर स्वच्छता करावी आणि दररोज नियमितपणे साफसफाई करावी अशी मागणी केली आहे. अन्यथा, स्थानिक नागरिक अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देत आहेत.

# अपघाताला आमंत्रण ठरणाऱ्या उघड्या गटारी नागरिक त्रस्त

किरण बेलुरकर,
नागपूर दि. १२

धंतोली झोन मधील प्रभाग क्रमांक ३५ बेसा रोड फुलमती लेआऊट कडे जाणाऱ्या वळणावर दोन्ही कडेला असलेल्या रस्त्यावर पादचारी मार्गावर उघड्या गटारीत पावसाचे पाणी साचल्याने स्थानिक रहिवासीच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.





या रस्त्यावरून नागरिकांचे येणे जाणे असून वळणावर रात्रीला पादचारी, स्कूटर, चार चाकी गाडी चालवताना भीती निर्माण झाली आहे.गटारीमध्ये पाणी साचल्यामुळे मच्छर, डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे . यामुळे परिसरातील लोक त्रस्त आहेत.या खड्ड्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. पायी जाणारे वृद्ध, महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले यांना खूप त्रास होत आहे.

या परिसरातील नागरिकांची मागणी आहे की त्वरित दुरुस्ती चे कामे करून लोकांना दिलासा द्यावा.